

दिर्घकथा संग्रह

# अभिसार

## संजीवनी देशपांडे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

दिर्घकथासंग्रह

# अभिसार

## लेखिका : संजीवनी देशपांडे

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# अभिसार

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अभिसार

## लेखिका : संजीवनी देशपांडे

फोन नंबर : 9860787611

ईमेल : chaafa9@gmail.com

ब्लॉग/वेबसाइट: www.chaafa.com

पत्ता: 'गोकुळ', , विवेकानंदपुरम, लातूर-४१३५१२

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www.esahity.com
www.esahity.in
esahity@gmail.com

प्रकाशन : २४ जुलै २०२१ (आषाढ वद्य प्रतिपदा)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**संजीवनी देशपांडे**. मराठी ब्लॉगर असून त्यांचा ‘चाफा’ हा ब्लॉग मराठी वाचकांच्या मनात स्थान राखून आहे. चतुरंग, लोकसत्ताच्या कथादालन या सदरात लेखिकेची ‘बकुलावली’ ही कथा एप्रिल २०२० मध्ये छापून आली होती. लघुकथा, दीर्घकथा, कविता, ललित इ. विविधांगी लेखन लेखिकेने आजवर केलेले आहे.




बहुतांश लेखन त्यांच्या वेबसाइटवर वाचकांसाठी खुलं आहे.


संपर्क : **संजीवनी देशपांडे**

फोन नंबर : 9860787611

ईमेल : chaafa9@gmail.com

ब्लॉग/वेबसाइट: www.chaafa.com



**‘माझे आजोबा,**

**कै. डॉ. मनोहरराव पाटील**

**यांना अर्पण’**

# अभिसार

## प्रेमाचा प्रवास

## आणि प्रवासातलं प्रेम उलगडणाऱ्या कथा..

‘आरसा’ आणि ‘दिगंत’ या दोन अतिशय तरल दिर्घकथांचा ‘अभिसार’ हा संग्रह आहे.

‘आरसा’ ही एक वेगळ्या ढंगाची प्रेमकथा आहे. मनाचा ठाव घेणारी आगळी आणि अत्यंत तरल अशी ही कथा शेवटाकडे येता येता प्रेम आणि लग्न या दोन्ही संकल्पनांविषयी एक वेगळाच विचार आणि नवा दृष्टीकोण वाचकांना देऊन जाते.

तर ‘दिगंत’ ही दिर्घकथा ‘प्रवासवर्णन आणि कथा’ अशा ताज्या आणि रोचक फॉरमॅट मध्ये लिहलेली असून दोन मैत्रिणींच्या प्रवासाची ही गोष्ट आहे.

# अभिसार

## कथानुक्रम


| | |
|---|---|
| आरसा | 10 |
| दिगंत | 55 |


**सदरील कथासंग्रहामधील सर्व कथा ह्या काल्पनिक असून कथेतील नावं, स्थळं आणि पात्रं हे देखील काल्पनिक आहेत. या कथेतील नावे आणि पात्रे वास्तवातील कोणाशी जुळत असतील तर तो निव्वळ योगायोग समजावा.**

# आरसा

तिने तिची ती आवडीची अंजिरी रंगाची साडी नेसली. कधी नव्हे ते काजळही रेखलं जरासं डोळ्यांखाली. आणि आरशात स्वत:कडे पाहू लागली.

ती साड्या तशा कमीच नेसायची. एखादा ढगळ सूती कुर्ता आणि त्याखाली तशीच ढगळ जीन्स हा तिचा स्थायी वेश होता. लहानपणापासून घरात झालेले चंगळवादाला शरण न जाण्याचे संस्कार आता तिच्या अंगवळणी पडले होते. पूर्वी, मनाला नवे पंख फुटण्याच्या वयात, वाटायचं तिलाही बरे कपडे घालावेसे, नाही असं नाही. त्यातच, त्या काळात तिच्यावर टिकायला लागलेली त्याची नजर तर तिला अजून अजून त्या मोहाकडे ढकलायची. पण मग आपल्या भोवतीचं 'समाजवादी' वर्तुळ, तत्वनिष्ठ आई-वडील काय म्हणतील या विचाराने ती त्या मोहाला बळी मात्र पडायची नाही. पुढे चंगळवादाचं वावडं नसलेला तो, नवी क्षितिजं धुंडाळत पार साता-समुद्रापार निघून गेला. आणि त्यासोबत 'छान'

राहण्याचा हट्ट करणारा तिच्या मनाचा तो एक कोपराही मूक झाला. पुढे मग तिलाच त्या कशात रस उरला नाही. आपलं काम, अभ्यास, व्यासंग यावरुन आपली ओळख निर्माण व्हावी असं वाटण्याच्या मानसिक टप्प्यावर ती एव्हाना येऊन पोचली होती. उगाच खळखळ करणारं वयाचं ते नाजुक वळणही आता मागे पडलं होतं. मुक्त आणि सुधारणावादी घरात वाढल्यामुळे ‘लग्नाचं वय’ वगैरे संकल्पनांना फारसं सामोरं न जाता ती तिच्या कामात व्यग्र होती. वाड्या-वस्त्या धुंडत ‘जगण्याचा’ संघर्ष पाहत होती, तो कमी व्हावा यासाठी तिला शक्य तितके प्रयत्न करत होती. तिचे स्तंभ वर्तमानपत्रांतून झळकत होते. नावाजले जात होते. परखड, मनस्वी, संवेदनशील, आणि अभ्यासू लेखणी कोणाच्या मनाचा ठाव घेणार नाही?

कॉलेजच्या त्या दिवसातही ती अशीच लिहायची. बरंच काही. विचार करायला भाग पाडणारं. मनाचा ठाव घेणारं. एरवी अतिशय बुजरा स्वभाव असलेल्या तिच्याकडे कोणाचही लक्ष जायचं नाही. त्यात तिचा तो ढगळ अवतार. आपल्याच तंद्रीत असणं. कॉलेजमधले ते तिचे सुरूवातीचे दिवस लायब्ररीत आणि वर्गात अतिशय निमूटपणे जात होते. पण त्यावर्षीच्या इंटर-

कॉलिजियेट लेखन स्पर्धेत, प्रथम परितोषिक मिळवलेल्या कथेपेक्षा द्वितीय पारितोषिक मिळवलेल्या तिच्या कथेनेच साऱ्यांचं लक्ष वेधून घेतलं. रुढ विचारांना धक्के देणारी ती कथा भुवया उंचवणारी होती. कथेसोबत मग आपसूक तिच्या लेखिकेकडेही साऱ्यांच्या नजरा वळायला लागल्या. आपल्याच कोशात जगण्याची सवय असणाऱ्या तिला मात्र याने फार कानकोंडं व्हायला व्हायचं. ‘कित्ती मस्त लिहतेस गं तू!’ पासून ‘बापरे हे असं कसं लिहू शकते ही’ इथपर्यंत दोन टोकांच्या प्रतिक्रिया देणारे बरेच जण रोज तिला भेटू लागले. ‘खूप बोलणं’ हा तिचा स्वभावच नसल्याने ती बरेचदा या साऱ्यांना टाळायची. ‘लिहणं’ एकवेळ सोप्पं पण ते वाचणाऱ्यांना भेटणं तिला अधिक कठीण वाटू लागलं. जुजबी हसून ती वेळ मारून न्यायची. तिला भेटायला येणाऱ्यांची मात्र तिला भेटून जराशी निराशाच व्हायची. इतकं स्फोटक लिहणारी ही मुलगी नक्कीच  तितकीच बेधडक असणार असा वाचणाऱ्याचा समज असायचा. पण प्रत्यक्षात ती मात्र अतिशय कमी बोलणारी, गर्दीत न मिसळणारी, पुस्तकात तोंड खुपसून बसणारी वगैरे आहेसं दिसल्यावर ‘हे सगळं नक्की हिनेच लिहलंय का’ अशी शंका इतरांच्या मनात आल्याविणा राहायची नाही. तिला मात्र मग प्रश्न पडायचा ‘मी जे लिहते त्याहून वेगळ्या स्वभावाची मी असू शकत नाही का?’

या प्रश्नाचं उत्तर तिला त्याने दिलं.

सगळीकडे चर्चा होत असलेली तिची ती कथा त्यानेही वाचली होती. आणि अर्थातच प्रभावित झाला होता. पण इतरांसारखा तो लगेच तिला येऊन भेटला नव्हता. कधीतरी लायब्ररीत टाइमपास करत असताना कोपऱ्यात एकटीच काहीतरी वाचत बसलेल्या तिच्याकडे बोट दाखवून त्याला कोणीतरी म्हणालं होतं, ‘अरे ते बघ ती त्या कथेची रायटर..’ तेव्हा, मागून तिचा केसांचा बॉबकट आणि तिकडे त्या कोपऱ्यात एकटं बसणं एवढच त्याच्या डोळ्यात भरलं होतं. तो खूप बडबडा नसला तरी जे काही बोलायचा ते प्रभावी असायचं. जात्याच हुशार. डोळ्यात भरेल असं व्यक्तिमत्व. त्यात distinction मिळूनही जाणीवपूर्वक आर्ट्स निवडलेल्यांपैकी तोही एक होता. कॉलेज मधल्या इतरांना होती तशीच तिलाही त्याची तोंडओळख होती. पण केवळ तोंडओळखच. स्वत:हून कोणाशी जाऊन बोलण्याचा तिचा स्वभाव नव्हता. ‘तो’ प्रांत काही आपला नाही म्हणत निमूटपणे ती पुस्तकात स्वत:ला मिटून घ्यायची.

एका दिवशी कुठलंस लेक्चर चांगलच रंगलेलं होतं. प्राध्यापक अतिशय रस घेऊन शिकवत होते. त्यांनी वर्गाला उद्देशून प्रश्न विचारला,

‘मानवी इतिहासातली सर्वात आदिम आणि नैसर्गिक गोष्ट कुठली?’

सारे विचारात पडले. बरीच उत्तरं पुढे आली. पण प्रश्नकर्त्याचं समाधान काही होईना. सर्वात शेवटी तिने हात वर केला. सरांनी इशारा केल्यावर ती उठली आणि अतिशय निर्विकारपणे तिने उत्तर दिलं,

‘स्त्री-पुरुष संबंध!’

क्षणात साऱ्यांच्या माना वळल्या. त्याचीही वळली. त्यादिवशी त्याने तिला नीट पाहिलं. ती सुंदर होती की नाही हा प्रश्न नव्हता. पण, तिच्याकडे पाहिल्यावर ‘सौंदर्याची’ एक नवीन व्याख्या त्याच्या मनात मूळ धरू लागली हे मात्र नक्की! इतर मुलींसारखे ‘नटणे-लाजणे-मुरडणे’ वगैरे प्रकार ती करायची नाही. आणि अगदी बिनधास्त पोशाख किंवा बोलणं-चालणं ठेऊन तथाकथित पुढारलेपणाही दाखवायची नाही. तिचं वेगळेपण तिच्या बुद्धीत आणि विचारांमध्ये होतं. पण तिला स्वत:लाच अजून त्याची जाण नव्हती. ती का कोणास ठावूक स्वत:ला कमी समजायची. आदर्शवादी, बुद्धिवादी घरात वाढली असल्याने इतर मुलींसारखी स्वत:च्या दिसण्या-असण्याचे चोचले पुरवत ती मोठी झाली नव्हती. त्याबद्दल एक छुपं आकर्षण तिच्या मनात होतं.

आणि मग त्या कळत्याही म्हणता येऊ नये आणि न कळत्याही म्हणू नये अशा वयाच्या अल्लड टप्प्यावर ‘आकर्षक न राहणं, पार्लर, ट्रेण्ड्स वगैरेची जाण नसणं’ या सगळ्यापाई तिला स्वत:मध्ये काहीतरी न्यून आहे असं वाटत राहायचं.

तिचं उत्तर ऐकून प्राध्यापक खुश झाले. ते त्यांना अपेक्षित असंच उत्तर होतं.

त्या दिवशीपासून त्याचं लक्ष तिच्याकडे थोडं जास्तच जायला लागलं. तिचं एकटं-एकटं राहणं, ठरलेल्या एक-दोन मित्र मैत्रिणींव्यतिरिक्त इतर कोणाशीही पाच मिनिटांच्या वर फारसं न बोलणं, अतिशय साधं राहणीमान, आपण ‘कसे दिसतोय’ याची अजिबातचं फिकीर नसणं, हे सगळं त्याच्या मनात नोंदवलं जात होतं. आणि या साऱ्यामुळे तो अधिकाधिक तिच्याकडे ओढला जात होता. आपल्याकडे कोणाची तरी नजर सारखी वळतेय हे मुलींना लगेच उमजतं. तसं ते तिलाही समजायला लागलं. पण ‘छे, हे सारे आपल्या मनाचे खेळ आहेत. कितीजणींचा घोळका असतो त्याच्यामागे सतत. तो कशाला आपल्याकडे पाहील.’ असं काहीतरी म्हणत ती तो विषय पार डोक्यातून काढून टाकायची. तिचं अलिप्त आणि त्याचं लोकप्रिय वलय त्या दोघांना एकमेकांपासुन दूर ठेवत होतं.

--

कधी नव्हे ते तीन-तीन वेळा तिने आरशात पाहिलं. ऋतूचं म्हणजे कॉलेज मधल्या एका जुन्या मैत्रिणीचं लग्न. आणि त्यासाठी आपण आज चक्क 'तयार' वगैरे झालोय या गोष्टीचं तिलाच थोडसं नवल वाटत होतं. निमंत्रण द्यायला आल्यावर ऋतूने तीन-तीन वेळा, 'आपला पूर्ण ग्रुप येणार आहे. तूही नक्की ये. कितीही व्यस्त असलीस तरी नक्की ये' असं तिला बजावलं होतं. 'पूर्ण ग्रुप' वर तिने मुद्दाम दिलेला जोरही तिला जाणवला. तो परत आलाय हेही तिला तिच्याच कडून समजलं. त्यादिवशी पासून तिचं मन थाऱ्यावर नव्हतच तसं. आज इतक्या वर्षांनी तो तिच्या समोर येणार होता. तिला खूप आतून मोहरल्या सारखं वाटत होतं. पूर्वी वाटायचं तसच. अजून काही बदललं नाहीये तर! तिचं मन स्वत:लाच कबुली देऊ लागलं. थोडसं लिपस्टिक लावावं का? क्षणभर तिला मोह झाला. पण दुसऱ्याच क्षणी तिने तो विचार झटकून टाकला. आणि मग एव्हाना रक्तात भिनलेली समज तिच्या मनात आणि चेहऱ्यावर उमटली. स्वत:च्या पोरकटपणावर हसून तिने पर्स उचलली आणि जायला निघाली.

--

एका दिवशी ती जराशी लवकरच कॉलेज मध्ये आली. तिला लायब्ररी मधलं एक पुस्तक अतिशय तातडीने हवं होतं. आल्या आल्या तिने लायब्ररी गाठली. पण लायब्रेरीयन कडून समजलं ते पुस्तक दोन महिन्यांपासून कोणीतरी घेऊन गेलय. हिचा जीव खालीवर होऊ लागला. तिला हवे ते संदर्भ त्याच पुस्तकात होते. आणि असा एखादा किडा डोक्यात शिरला की मग तिला त्या विषयाचा फडशा पाडल्याशिवाय चैनच पडायचं नाही. बरीच विनंती केल्यावर तिला त्या लायब्ररियन कडून कळलं, पुस्तक ‘त्या’च्याकडे आहे. आता झाली की पंचाईत! पुस्तक हवं असेल तर त्याच्याशी जाऊन बोलावं लागणार. ‘त्यात काय होतय, एवढा कोण लागून गेला तो, जा जाऊन बोल’ एक मन म्हणू लागलं. ‘नाही. नको!’ दुसरं मन. याच विचारांमध्ये ती क्लास पाशी येऊन पोचली. तिच्या ठरलेल्या बेंचवर जाऊन बसली. लेक्चरला अजून वेळ असल्याने गर्दी नव्हती. तिने इकडे तिकडे पाहिलं. आणि एकदम चकित झाली. दाराच्या अलीकडे तो त्याच्या चार-दोन मित्रांसोबत गप्पा मारताना तिला दिसला. जाऊन बोलावं की नको या विचारात ती त्याच्याकडे पाहत होती. तेवढ्यात त्याचीही नजर तिच्याकडे गेली. लगेच आपली नजर इकडे-तिकडे वळवत तिने तिचं लक्षच नसल्या सारखं दाखवण्याचा प्रयत्न केला. पण तो सपशेल फसला. तिच्या चेहऱ्यावरचा गोंधळ त्याने ओळखला.

आणि किंचित गालात हसून पुन्हा गप्पांमध्ये गुंगला. हिची इकडे चिडचिड व्हायला लागली. जाऊन पुस्तक मागायचं ही इतकी साधी सोपी गोष्ट. पण त्यासाठीही आपली इतकी तारांबळ उडावी. त्यात तिला त्याच्याकडे पाहताना त्याने पकडलं होतं याने तर तिचा अजूनच तिळपापड होऊ लागला. शेवटी आता काही होऊदे, जाऊन विचारायचच असं ठरवून ती आता उठणार इतक्यात तिने त्यालाच तिच्याकडे येताना पाहिलं आणि पुरती गार पडली. पुन्हा गोंधळून उगाच पुस्तकं खाली-वर करण्याचा आव आणत बसून राहिली.

तो तिच्या जवळ आला आणि ग्रेसफुली म्हणाला,

"हाय!"

तिने मान वर करून त्याच्याकडे पाहिलं.

आणि किंचित हसून "हाय.." म्हणाली।

"आज लवकर आलीस!"

"हो, ते लायब्ररी मध्ये काम होतं थोडसं." ती जराशी गडबडलीच.

"अच्छा!" तो शांतपणे म्हणाला.

त्याने पुन्हा एकवार तिच्याकडे नीट पाहिलं. बोलके डोळे, ठसठशीत नाक, लक्ष वेधून घेणारी जिवणी, प्रसाधनं या गोष्टीशी

दुरान्वयेही संबंध नसलेला नितळ रंग, आकाशी रंगाचा खादीचा कुर्ता, मानेपर्यन्त प्रयासानेच पोचणारे भुरभुर केस, डोळयांत विलक्षण चमक, पण देहबोलीत एक प्रकारचं प्रचंड अवघडलेपण, कपाळावर जमा झालेले बारीक घर्मबिन्दु.. तो अनिमिष डोळयांनी तिच्याकडे पाहत होता.

ती अजून अवघडली. जरासं हसून मग तो म्हणाला,

“आणखी नक्की किती मिनिटं विचार केल्यावर बोलणार आहेस जे बोलायचंय ते?”

त्यावर अजून चकित होत ती म्हणाली,

“तुला कसं कळलं मला काहीतरी बोलायचय तुझ्याशी?”

“जादू..” पुन्हा तसंच हसून तो म्हणाला. असा हसला की त्याच्या डाव्या गालात खळी पडते हे तिला नव्यानेच समजलं.

त्याच्याकडे एक हलका कटाक्ष टाकून मग तीही हसली.

नंतर मग ती शोधत होती ते पुस्तक त्याने तिला आणून दिलंच. पण, पूर्ण दिवसभर दोघे सोबतच राहिले. लेक्चर, कॅंटीन, लाईब्ररी सगळीकडे. दिवस अखेरपर्यंत तिच्यातलं अवघडलेपण जाऊन ती छान खळखळून हसायला लागली होती. एरवी खूप कमी बोलणारी ती, त्याच्यासोबत बऱ्याच मुद्द्यांवर हिरीरीने तार्किक वादही घालू लागली होती.

त्यादिवशी रात्री तिने कधी नव्हे ते आरशात पाहिलं. आणि त्यात तिला तिच्या चेहऱ्या ऐवजी, तिच्यावरून प्रचंड कुतुहलाने फिरणारी त्याचीच नजर पुन्हा पुन्हा दिसायला लागली. मनाला दिलेली भूल जाऊन संवेदना जाग्या व्हाव्या तसं काहीसं तिला वाटायला लागलं होतं..

----

तिने मला वेड लावलं वगैरे मी म्हणणार नाही. पण, ती भेटल्यापासून मी तिच्याकडे नकळत ओढला जाऊ लागलो होतो. त्याआधी मी माझ्याच धुंदीत असायचो. माझी बौद्धिक कुवत, एकूण व्यक्तिमत्व, मेडिकलला सहज अडमिशन मिळत असतांनाही कला शाखा निवडली या गोष्टीचा नकळत चढलेला 'माज', सुरुवातीच्या काही दिवसातच कॉलेज मध्ये लोकप्रिय होणं, सतत मागे-पुढे घोळके, बहुतेक सर्व मुलींमध्ये माझ्याविषयी निर्माण होणारं एक छुपं आकर्षण या साऱ्याच्या कैफात वावरायचो मी. पण हा माझा सगळा माज तिच्या त्या एका कथेने उतरवला! कथा वाचून भारावून गेलो होतो मी. माझ्याच वयाची ही मुलगी आणि इतकं अफाट लिहू शकते?

त्या दिवशी पासून मी पुन्हा जमिनीवर यायला लागलो. तिला दुरून न्याहाळत राहिलो. त्या दिवशी वर्गात तिने दिलेलं उत्तर देण्याचा कोणी विचार देखील केला नसता. पण तिने ते दिलं. कसलाही अभिनिवेश न आणता. केवळ शास्त्रीय दृष्टीकोणातून त्या साऱ्याकडे पहात. हे खूप कमी जणांना जमतं. ती त्यापैकि एक होती. कधी कुठे पुढे-पुढे नाही. ‘मला हे हे येतं’, ‘मी अशी अशी आहे’ वगैरे काहीही ‘दाखवण्याचा’ तिने कधी प्रयत्न केला नाही. हे सगळं मला मनोमन आवडायला लागलं होतं. तिच्या येण्याची मी वाट पाहू लागलो. कुठेही गेलो तरी नजर तिला शोधू लागली. मी तिच्याकडे पाहतोय हे तिलाही कळायला लागलं होतं. पण वळत मात्र नव्हतं. तिच्या त्या एक-दोन मित्र मैत्रिणीच्या चमूत तिसरा कोणी सहज जरी आला तरी ती लगेच तिथून पळ काढायची. चित्रपट-नाटकाचे प्लान्स ठरायला लागले की ही ‘मला नाही जमणार’ म्हणत लाईब्ररि मधल्या कुठल्या तरी कोपऱ्यात जाऊन बसायची. ती स्वत:च स्वत:ला मागे ओढतेय असं वाटत राहायचं. राहणं तर इतकं साधं की ही कधी आरशात पाहते तरी की नाही असा संशय यावा. पण जस-जशी ती मला कळत गेली तसं-तसं तिचं ते साधेपणच तिचा खरा दागिना आहे हे समजायला लागलं. ती आतून-बाहेरून ‘खरी’ होती. इतर कुठेही मग माझं मन रमेनासं झालं.

त्यादिवशी पुस्तकाच्या निमित्ताने आमची औपचारिक भेट झाली. आणि मग आम्ही ‘भेटतच’ राहिलो. सगळीकडे. सतत. तिच्याशी दर्जेदार चर्चा करता याव्यात म्हणून मी पूर्वीपेक्षा जास्त वाचायला लागलो. आमचा विषय तसा मानववंशशास्त्र! उत्क्रांती, उत्खनन, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र.. चर्चेसाठी विषयांच्या सीमा धुरकट होऊ लागल्या. माझा आवाका वाढत गेला. तिच्या मुद्द्यांनी बहुतेक वेळा अवाक व्हायला व्हायचं. पण तसं मी तिला भासवायचो नाही. स्तुती वगैरे गोष्टी तिला झेपायच्याच नाहीत. तसं काही केलं की ती पळ काढते हे एव्हाना मला उमगलं होतं. ती इतर मुलींसारखी उठता-बसता ‘चहा पिलास का?, ‘जेवण केलंस का?’ वगैरे प्रश्न विचारणाऱ्यांपैकी नव्हती. टायनबी, इरावती कर्वे, सेपीएन्स, एप्स, आस्ट्रेलोपिथेकस, सामू, टागोर, दुर्गा भागवत असे सारे तिचे विषय असायचे. हो पण कधी माझ्या आवडीची भाजी असली तर डब्यात आवर्जून ती थोडी जास्त आणायची. आग्रह वगैरे करायची नाही. पण मला सोडून जेवायचीही नाही.

आमचं एकत्र असणं एव्हाना कॉलेज मध्ये सगळ्यांच्या नजरेत यायला लागलं होतं. आमच्या मागे आमची नावंही जोडली जात होती. खरं सांगायचं तर मला ते आवडायचही. पण, तसं काही नव्हतं हेही तितकच खरं. तिच्या मनात काय आहे हे ती कधीच कळू द्यायची नाही. तिच्या नजरेतून कधी कधी व्हायची जाणीव.

पण, त्याला शब्दांचा दुजोरा कधीच मिळाला नाही. तिला समोर बसवून विचारण्याचं धाडस पहिली दोन वर्षं मीही केलं नाही. तिचा स्वभाव पाहता तिला ते पटलं नसतं तर तिने पुन्हा स्वत:ला आपल्याच कोशात मिटून घेतलं असतं. आणि मला ती रिस्क नको होती.

शेवटच्या वर्षी एकदा तिच्या घरी जाण्याचा योग आला. कॉलेज संबंधी काही काम होतं. तिने सरळ घरीच बोलावलं. मी गेलो. घर सुबक होतं पण अतिशय साधं! दिवाणखाण्यात भारतीय बैठक होती. नजर जाईल तिथे पुस्तकंच पुस्तकं दिसली. ती ठेवलीही सुंदर पद्धतीने होती. तिने तिच्या आई-बाबांशी ओळख करून दिली. तेही अतिशय साधे आणि मोकळे वाटले. आमच्या बऱ्याच गप्पा झाल्या. 'विद्वत्ता' त्यांच्या प्रत्येक शब्दातून व्यतीत होत होती. शहरात त्यांचं बरचसं नाव ही होतं. आधी मी थोडा दबूनच बोलत होतो पण नंतर त्यांचा मोकळेपणा पाहून मीही खुलायला लागलो. ती मात्र पूर्णवेळ शांतच होती. नंतर मग थोड्यावेळाने ती मला आत घेऊन गेली.. तिच्या आई-बाबांनी अजिबात आक्षेप दर्शवला नाही. या साऱ्यात काहीच विशेष नसल्या सारखं तीही वागत होती. आमचं काम झालं. तिच्या आईने बनवलेला कुठलासा लाडू खाऊन मग मीही तिथून निघालो.

माझ्या घरापेक्षा तिच्या घरातलं वातावरण खूपच वेगळं होतं. तिच्या घरी तांब्याच्या फुलपात्रात रम पित असल्याचा फील यायचा आणि माझ्या घरी वाइनच्या ग्लासात कोकम सरबत पिण्याचा! माझं घर चार-चौघांसारखं होतं. आमच्याकडे पुस्तकांपेक्षा सिरियल-नाटकांवर जास्त चर्चा व्हायच्या. सणावाराला सोवळ्यात स्वयंपाक व्हायचा तरी होटेलिंग, आउटिंग वगैरे कस्टम्सही रुळलेले होते. तिच्या घरी हे दोन्ही नव्हतं. ना कर्मकांडांवर विश्वास ना बाहेरच्या चंगळवादावर!

माझ्या घरी माझ्या मित्र-मैत्रिणींच छान स्वागत व्हायचं पण आलेल्या मैत्रिणीकडे हिचं ह्याच्यासोबत 'तसं' काही आहे का वगैरे शंका मनात ठेऊन पाहिलं जायचं. हालचालीकडे, हावभावांकडे लक्ष वगैरे गोष्टी आल्याच. 'तसं' काही नाही याची खात्री झाली की मग उगाच मनातल्या मनात मला तिच्यासोबत जोडून 'जोडा' कसा दिसेल याची चाचपणी पण केली जायची. माझ्या बहिणीच्या मात्र मैत्रिणीच यायच्या फक्त. तिचे मित्र अगदी क्वचित. आले तरी त्यांना परत यायला नको वाटावं इतकं त्यांच्यावर लक्ष ठेऊन आणि निरखून वगैरे पाहिलं जायचं. दिवाणखाण्याच्या पलिकडे त्यांना प्रवेश तसा निषिद्धच असायचा. तिच्या घरी अगदी उलट. तिथे माझ्याकडे मित्र किंवा मैत्रीण म्हणून नाही तर 'फ्रेंड' म्हणून पाहिलं गेलं. तिच्या खोलीत सुद्धा मला

अगदी सहज प्रवेश होता. अतिशय मोकळं वातावरण. इतकं मोकळं की त्या मोकळेपणाचंच नंतर दडपण यावं.

रिलेशनशिप, फ्युचर वगैरेचा फार गंभीरपणे विचार करण्याचं ते वय नव्हतं. तेव्हा केवळ एकमेकांसोबत असण्याचीच धुंदी वाटायची. मी तरी त्याच धुंदीत होतो. हळू-हळू मला कळायला लागलं होतं की तिच्या प्रेमात पडलोय. पण, तिचं काहीच कळायच नाही. बाकीचे म्हणायचे तीही आहे तुझ्या प्रेमात, तुझ्यामुळे ती बदलायला लागलीये वगैरे. पण, मला का कोणास ठावूक ते खरं वाटायचं नाही. मला हे सगळं तिच्याकडून ऐकायचं होतं. शेवटच्या वर्षी तर मला खूप घाई व्हायला लागली ते ऐकण्याची. पदवी नंतर उच्च-शिक्षणासाठी परदेशी जाण्याचं माझं चालू होतं. तिनेही माझ्या बरोबर यावं किंवा निदान मनातलं माझ्या बरोबर शेअर तरी करावं असं मला खूप आतून वाटायला लागलं. मी वेगवेगळ्या पद्धतींनी तिला अडून अडून पुढचे प्लान्स विचारत होतो. पण, देश सोडण्याचा तिचा विचार अजिबातच नव्हता असं जाणवलं. ती मला एकदा घेऊन गेली होती त्या आदिवासींसाठी काम करणाऱ्या ngo मध्ये तिला उच्च शिक्षण घेत घेत काम करायचं होतं. मी मात्र चांगल्या विद्यापीठात पुढचं शिक्षण घेऊन मानववंशशास्त्रात पुढे संशोधन किंवा एखादी ‘चांगली’ नोकरी करुन ‘सेटल’ होण्याच्या विचारात होतो. तिच्या आयुष्यात ‘सेटल’ होणे ही संकल्पनाच

नव्हती. घर घेणे, गाडी घेणे, संसार थाटणे, आई होणे वगैरे तिची स्वप्नंच नव्हती कधी. तिचं विश्वच माझ्यापेक्षा खूप निराळं होतं. मला ती हवी होती पण मला माझी चौकटही सोडायची नव्हती. मी प्रचंड दुविधेमध्ये जगत होतो त्या काळात. माझी उगाच चिडचिडही व्हायला लागली होती.

दरम्यान, माझ्या वाढदिवसा निमित्त माझ्या आईने एकदा सगळ्यांना घरी जेवायला बोलावलं. तीही आली. पहिल्यांदा. माझा वाढदिवस होता म्हणून. त्यादिवशीही तिचा वेश काडीमात्रही बदलला नाही. फक्त कुर्त्याचा रंग मात्र कधी नव्हे तो गुलाबी होता. पण तेवढ्यानेही नुकत्याच उमललेल्या पांढरट गुलाबी गुलाबासारखी नाजुक आणि उत्फुल्ल दिसत होती. इतर सारे छान गप्पा वगैरे मारत होते. घरच्यांशी बोलत होते. ती मोजकंच बोलत होती. तेही माझ्याकडे पाहत पाहत. थोडी गडबडल्या सारखीही वाटत होती. माझ्या घरातलं वातावरण तिच्यासाठी नवं होतं. ते विषयही तिच्यासाठी नवे होते.

का कोणास ठावूक पण त्या दिवशी मी तिच्याशी बोलायचं ठरवलं. तिला घरी सोडायला म्हणून तिच्यासोबत निघालो. रात्रीचे दहा वगैरे झाले होते. रस्त्यात सामसुम होती. मी बाईक दूरच्या रस्त्याने नेली. वाटेत आमच्या ठरलेल्या टेकडीच्या पायथ्याशी

गाडी थांबवली. ती गोंधळली. मी बाईक वरुन उतरलो. तिने विचारलं,

"काय रे काय झालं? बंद पडलीये का?"

मी तिच्याकडे एकवार पाहिलं. चंद्राच्या प्रकाशात ती आणखीच सुंदर वाटत होती. एक दीर्घ श्वास घेऊन मी तिला म्हटलं,

"बाईकला काही नाही झालं. जे काही झालय नं ते मला झालय!"

"म्हणजे? काय झालय?" तिच्या आवाजा वरुन तिला आता अंदाज येतोय असं वाटलं. मी पुढे म्हणालो,

"तुला ते माहितीये.. आपण बोललो नाही कधी यावर. पण, तुला नक्कीच माहितीये मला तू किती आवडतेस."

तिची नजर खोल गेली. गाल थोडे अजूनच गुलाबी वाटायला लागले. मी तिचा हात हातात घेत म्हटलं,

"या नात्याला नाव द्यायचय गं मला.. मला सांगायचय तुला, हे तुझे डोळे मला किती आवडतात, तू तुझ्याही नकळत माझ्या मनातली 'सौंदर्याची' व्याख्याच कशी बदलून टाकलीयेस, मला सांगायचय तुला, तू सोबत असताना मी कधी अनुभवलं नाही असं वेगळंच काहीतरी कसं अनुभवतो.. मला 'तू' किती आवडतेस.. हे सगळं मला तुला रोज.. रोज सांगायचय!"

हातात घेतलेल्या तिच्या हाताकडे पाहत मी खूप मनापासून बोलत होतो. त्या स्पर्शाची जादू असेल कदाचित.. पण मला खूप बोलावसं वाटत होतं. क्षणभर थांबून मी तिच्याकडे पाहिलं. तिच्या डोळ्यात टचकन पाणी आलं होतं. मी थांबलो. तिच्या बोलण्याची वाट पाहू लागलो. दोन-तीन मिनिटं तशीच शांततेत गेल्यावर ती म्हणाली,

"तुला काय वाटतं, मला हे सगळं ठाऊक नाही? मी कधी दाखवत नाही, मला ते जमतही नाही पण पहिल्यांदा भेटले ना तेव्हापासूनच प्रेमात आहे तुझ्या.."

मला अपेक्षित तेच मी ऐकत होतो, आतून मोहरलो.. ती पुढे बोलू लागली,

"..पण कसंय नं, आपले मार्गच मुळात वेगळेयत रे.. तुला दूर जायचय. स्थिर व्हायचय. माझं तसं नाही. तुला आयुष्यकडून वेगळ्या गोष्टी हव्या आहेत आणि मला वेगळ्या.. आपलं करियर अजून व्हायचय. ओळख निर्माण व्हायचिये. इतक्यात तू माझ्यासाठी तुझं स्वप्न सोडून इथे थांबण किंवा मी माझी ध्येयं सोडून तुझ्यासोबत येणं दोन्हीही शक्य नाहीये. तसं केलं जरी नं आपण तरी तडजोडी करून सांधलेलं हे नातं कधी ना कधी तडे गेल्यावाचून राहणार नाही! जे आत्ता आहे तेही हरवेल. म्हणून

बोलायचं टाळत होते.. माझ्यासाठी तू बदलावस असं मला वाटत नाही. तू जा.. तुझी स्वप्नं पूर्ण कर."

"पण मग आपल्या नात्याचं काय?" न राहवून मी विचारलं.

"ते जुळणार असेल तर जुळल्यावचून राहणार नाही. आत्ता नको घाई करायला. आज मी तुझ्या घरच्यांना भेटले. सगळे खूप चांगले आहेत पण वेगळे आहेत आमच्यापेक्षा. मला नाही वाटत मी दीर्घकाळ त्यांच्या अपेक्षांना खरी उतरू शकेन. तूच सांग उद्या यावरून आपल्यात वाद होणार नाहीत?"

"काहीतरी मार्ग काढू ना आपण. उद्या लग्न नाही करायचय आपल्याला." मी.

"कधीतरी ते करण्याचा विचार करतोच आहेस ना तू. मी नाही करतय. आणि हाच आपल्यातला फरक आहे. नको. सगळंच विस्कटेल. थांबू आपण आत्ता इथे. नको करूया एकमेकांचा विचार." ती।

तिचा शब्द अन शब्द खरा होता पण तरी मला त्या सगळ्याचा खूप राग येत होता. विचार नको करूया म्हणजे? शक्य होतं ते? ही असं कसं म्हणू शकते! मी चिडलो. ती हळवी झाली होती पण शांत होती. माझं चिडणही तिने शांतपणे स्वीकारलं. मला तिच्या त्या

शांतपणाचीही चीड यायला लागली. एक अक्षरही न बोलता मी तिला घरी सोडलं आणि निघून आलो.

त्यानंतर मी निघून गेलो विदेशी. सुरूवातीला खूप धुसफूसलो. पण, हळू-हळू समजायला लागलं तिचं बरोबर होतं. तेव्हा घाई केली असती तर सगळं विसकटण्याची भिती होती. तिने ते होऊ दिलं नाही!

आज उगाच धडधडतय. जवळपास पाच-सहा वर्षांनी ती समोर येणार आहे. कशी असेल. कशी दिसत असेल. मी परत येऊन आता महिना होत आला. खुपवेळा वाटलं करावा तिला फोन पण नाहीच केला. करायला हवा होता का. तिने वाट पाहिली असेल का. की मुव ऑन झाली असेल. कोणी दुसरं असेल तिच्या आयुष्यात?

--

असे सारे विचार डोक्यात चालू असताना कधीतरी तो गाडीत बसला आणि लग्नाला जायला निघाला..

----

स्कूटीवर बसून हॉल कडे जाताना पूर्णवेळ तिच्या मनात जुन्या गोष्टी तरळत राहिल्या. तेव्हा, शहाणपणाचा मोठा आव आणत तिने त्याला जाऊ दिलं खरं पण, नंतर मात्र तो निर्णय निभावता निभावता तिचं मन मेटाकुटीला येत होतं. तो सोबत असताना तिला येणारं विशेष फीलिंग, 'एकटं' नसण्याची जाणीव, केव्हाही काहीही बोलण्याची मुभा, 'ऐकलं' जाण्याची खात्री हे सारं ती मिस करत होती. आपण केलं ते योग्य की अयोग्य हा प्रश्न तर तिला बराच काळ सतावत राहिला. त्या रात्रीनंतर तो अबोल होत गेला आणि नंतर तर निघूनच गेला. नंतर ना काही निरोप ना कधी फोन! 'मी मारे म्हणेन, नको करूया एकमेकांचा विचार. पण त्याने तरी ते असं इतकं ऐकयलाच हवं होतं का?' मनातल्या मनात ती लटकी खंत व्यक्त करायची पण, मग आपण तेव्हा जे केलं ते खरं आणि योग्य होतं म्हणत स्वत:च्या वेड्या मनाला समज द्यायची.

लग्न गोरज मुहूर्तावर होतं. ठरलेल्या वेळेच्या काही मिनिटं आधी ती पोचली आणि स्कूटी पार्किंग मध्ये लाऊन आत जायला वळली. क्षणभर थांबून तिने पुन्हा एकदा आरशात पाहिलं. साडी एकसारखी केली. तिची धडधड आता वाढली होती. तो समोर आल्यावर आपण काय बोलायचं, कसं वागायचं याचे उगाच वेडे आडाखे तिचं मन बांधत होतं. पण पुन्हा भानावर येत तिने तिच्या मनाला साफ बजावलं. तो आता पूर्वीचा 'तो' नाहीये. बदललेला

असू शकतो. कदाचित त्याच्या आयुष्यात आता दुसरं कोणीतरी आलेलंही असेल. आपला वेडेपणा आपल्यापाशी ठेवायचा. शक्य तितकं फॉर्मली वागायचं. मनातली धडधड चेहऱ्यावर दिसू द्यायची नाही.. आणि मग चेहरा नेहमीसारखा कोरा करून ती आत आली.

गर्दीच्या ठिकाणी तिला जरासं अवघडल्या सारखंच व्हायचं. अशा ठिकाणी ती एकतर जायचीच नाही. आणि गेली तरी पटकन कुठलातरी एक कोपरा गाठून कोणाच्या नजरेत न येता बाकीच्यांची गडबड, धावपळ बघत शांतपणे बसून राहायची. आजही तिने तेच केलं. हॉलच्या मध्यावर भिंतीच्या जवळची कोपऱ्यातली एक रिकामी खुर्ची पाहून तिथे जाऊन बसली. पूर्ण हॉल वरुन तिने एक नजर फिरवली. समोरच्या रांगेत तिला कॉलेज मधले एक-दोन ओळखीचे चेहरे दिसले. बघता बघता तिथे कॉलेजमधला घोळका तयार झाला. थट्टा-मस्करी, खूप दिवसांनी भेटल्याचा आनंद वगैरे सारं त्यांच्या देहबोलीतून जाणवत होतं. क्षणभर तिला वाटलं जावं आपणही. पण ती तिथेच बसून राहिली.

लग्न आता कुठल्याही क्षणी लागणार होतं. स्टेजवर धावपळ सुरू होती. तिने पुन्हा एकदा सगळीकडे पाहिलं. तो कुठेच दिसत नव्हता. तिच्या नकळत तिची नजर आल्या क्षणापासून त्यालाच शोधत होती. पण तो कुठेच दिसत नव्हता. जरासं खट्टू होत तिने

तिची नजर आता स्टेज कडे वळवली. ऋतु आणि तिचा होणारा नवरा दोघेही तिथे आलेले होते. दोघांमध्ये आंतरपाट धरलेला होता. नऊवारी पायघोळ साडी, नाकात नथ, कपाळावर चंद्रकोर, ऋतु विलक्षण सुंदर दिसत होती. सनईचे सुर सभागृहात घुमतच होते. प्रसन्न, मंगल असं वातावरण होतं चोहीकडे. हा आज इथे होणारा संस्कार या दोघांना कायमचा एकमेकांशी बांधून ठेवणार. नवी स्वप्नं, नवं आयुष्य, सोबत, सारं काही. तिच्या मनात विचार येत होते. त्या दोघांच्या चेहऱ्यावरून आनंद, उत्साह ओसंडून वाहत होता. तेवढ्यात वेधक, सुरेल आणि भारदस्त अशा पंडिती स्वरात मंगळाष्टकांचे सुर सभागृहात घुमू लागले.. ***गंगा सिंधु सरस्वतीच यमुना,गोदावरी नर्मदा*** ती आता एकाग्र होऊन त्या सोहळ्याकडे पाहत होती.. ***कावेरी शरयू महेंद्रतनया शर्मण्वति वेदीका ।***.. वेगळाच माहोल तयार व्हायला लागला होता. तिला तिच्या आजूबाजूला थोडीशी हालचाल होत असलेली जाणवली. पण तिकडे दुर्लक्ष करून तिने पुन्हा तिचं लक्ष स्टेजवर केन्द्रित केलं.. ***शिप्रा वेत्रवती महासूर नदी,ख्याता गया गंडकी।***.. ती कितीही विज्ञाननिष्ठ वगैरे असली तरी मंगळाष्टकांचे हे सुर ऐकून आज तिला खूप छान वाटत होतं.. इतक्यात तिला शेजारी बसलेलं कोणीतरी आपल्याकडे एकटक पाहतय असं जाणवलं. तिने मान वळवून शेजारी पाहिलं, आणि अवाक झाली. अनिमिष नजरेने

तिच्याकडे पाहत तिथे 'तो' बसलेला होता! तिने पाहिल्यावर त्याने एक छान स्मित केलं.. मंगलाष्टकाचे सुर समेवर येत होते.. ***पुर्णा पुर्ण जलै, समुद्र सरीता। कुर्या सदा मंगलम, शुभ मंगल सावधान।।..*** सगळीकडे अक्षतांचा पाऊस पडला. एकमेकांकडे सुखदाश्चर्याने पाहणाऱ्या या दोघांवरही अक्षता पडल्या.

भानावर येत ती त्याच्याशी बोलण्यासाठी शब्द शोधू लागली. पण, तिला ते सापडेचनात. आनंद तिच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता..

“अरे तू केव्हा येऊन बसलास इथे.. काय.. म्हणजे.. तू..” ती काहीतरी म्हणत होती.

तिचा तो सारा गोंधळ पाहत तो तिच्याकडे पाहून हसत म्हणाला,

“तू मन लाऊन मंगलाष्टक ऐकत होतीस तेव्हा..”

यावर त्याच्याकडे पाहत ती नुसतीच हसली. मग पुढे केव्हातरी ते स्टेजवरच लग्न लागलं. पण, या दोघांना आता त्याचं गम्य उरलं नव्हतं. एकमेकांमधले वरकरणी दिसणारे बदल न्याहाळत दोघेही गप्पांमध्ये कधी गुंगून गेले त्यांचं त्यांना कळलं नाही. मनातले सारे प्रश्न, शंका, पण, परंतू क्षणभरासाठी गळून पडले होते. ती पूर्वीची ‘ती’ झाली होती आणि तो पूर्वीचा ‘तो’!

‘मी तुझे लेख वाचतो..’ किंवा ‘तुझ्या संशोधना विषयी मीही ऐकलंय’ वगैरे वगैरे अंगांनी संभाषण पुढे जात असतानाच डोळयातल्या डोळयात दोघांचं एक वेगळं संभाषणही चालू होतं. आणि वरवरच्या औपचारिक बोलण्यापेक्षाही ते अधिक खरं होतं. तिच्या डोळयातला आनंद पाहून त्याला कळलं, ही नक्कीच माझी वाट पाहत होती. आणि त्याचे ते पूर्वीसारखे शांत डोळे पाहून तिलाही तो पूर्वीचाच ‘तो’ असल्याची जाणीव झाली. तिला साडीत पाहून तो खरतर क्लीन बोल्ड झाला होता. पण, त्याने वरवर तसं दाखवलं नाही. तिथल्या इतर झगमगाटात तिची ती साधी पण सुरेख साडी, साडीला शोभणारी मोजकी नाजुक accesary, पूर्वीसारखेच मानेवर रूळणारे केस, डोळयांचं सौंदर्य अधोरेखित करणारं काजळ, तिचा मूळचाच पण आता साडीमुळे उठून दिसणारा रेखीव बांधा, पूर्वीचा बुजरेपणा जाऊन देहबोलीत जाणवणारा नवा आत्मविश्वास.. हे सारं त्याच्या नजरेने टिपल होतं. आणि त्याने ते टिपलय हे तिलाही त्याच्या उत्सुकतेने तिच्यावरून फिरणाऱ्या नजरेतून उमगलं होतं.

पुढे मग इतर भेटी, गप्पा, ऋतुला शुभेच्छा देणं वगैरेही पार पडलं. पण, हे सारं जोडीने. पूर्वीचा तो कडवट भाग सध्यापुरता तरी बाजूला टाकायचं असं मनातल्या मनात ठरवून दोघही एकमेकांशी खूप वर्षांनी होत असलेली भेट, सहवास अनुभवत होते. एकमेकांचं

वागणं न्याहाळत होते. एकमेकांच्या आयुष्यात 'दुसरं' कोणी आहे का वगैरेचा 'मग, बाकी सारे मजेत?' किंवा 'काय म्हणतय आयुष्य?' सारखे प्रश्न पुन्हा पुन्हा विचारून धांडोळाही घेत होते. बाकीचा ग्रुप त्यांच्याकडे उत्सुकतेने पाहत होता.

बऱ्याच वेळाने खूप सारा आनंद मनात घेऊन आणि उद्या भेटायचं ठरवून दोघही घरी परतले. तिने त्याला दुसऱ्या दिवशी तिच्या घरीच बोलावलं होतं.

परत येताना आणि घरी पोचल्यावर सुद्धा कितीतरी वेळ ती दिवसभरतले सगळे क्षण आठवत उगाच मनातल्या मनात मोहरत होती. आपण कसे गडबडलो इथपासून तो अजूनही पूर्वी इतकाच ग्रेसफुल कसा वागत होता इथपर्यंत सारं तिचं मन पुन्हा पुन्हा अधोरेखित करत होतं. आज तिला पुन्हा तिच्यातल्या ‘सौंदर्याची’ जाणीव झाली. आरसा पुन्हा जवळचा वाटू लागला. कामात लक्ष लागेना. उद्याच्या भेटीची उत्सुकता वाटू लागली.

रात्री झोपण्या आधी मात्र दिवसभराचा आनंद उशाशी घेताना मनातल्या प्रश्नांनी पुन्हा डोकं वर काढायला सुरुवात केली. हे असं एखाद्या टीनेजर सारखं वागणं आपल्याला शोभत का असही क्षणभर वाटून गेलं. वास्तवाची जाणीव व्हायला लागली.

त्याची अवस्थाही काही वेगळी नव्हती. आज तिला पाहून तो पुन्हा नव्याने तिच्या प्रेमात पडला होता. आजची ही रात्र तरी का मध्ये आहे असं त्याला वाटायला लागलं. पुढे काय? हा दत्त प्रश्न समोर असला तरी तिच्यासोबत असणं त्याला हवंहवंसं वाटत होतं. बाकी कुठलेच विचार आत्ता नको असंही वाटत होतं. इतक्या वर्षांचं खूप काही बोलायचं राहून गेलेलं बोलायचं होतं, नवे अनुभव तिला सांगायचे होते.. मन पुन्हा पूर्वी सारखं झालं होतं.

मनात खूप सारी उत्सुकता, आनंद आणि त्याच्या पार्श्वभूमीला खूप सारे धूसर प्रश्न घेऊन दोघेही ‘उद्याची’ वाट पाहू लागले होते..

दुसऱ्या दिवशी तिन्हीसांजेला ठरलेल्या वेळेच्या क्षणभर आधीच तो तिच्या दारासमोर उभा होता. त्याने पूर्वीच कधीतरी तिच्यासाठी म्हणून घेऊन ठेवलेली द गोल्डन नोटबूक नावाची कादंबरी आणि तिच्या आवडीची लिलीची फुलं आज सोबत आणायलाही तो विसरला नव्हता. पूर्वी एकदा ग्रुपसोबत कास पहायला गेल्यावर तिथल्या वॉटर लिलीज तिला प्रचंड आवडल्या होत्या. कितीतरी वेळ त्यांना पाहत फुलपाखरा सारखी त्यांच्या

आसपासच बागडत होती. इतर कुठे आली नाही तरी ट्रेक्स किंवा अशा निसर्गाच्या कुशीतले स्पॉट्स ठरले की ती आवर्जून यायची. तिथेही आपला एक स्वत:चा कोपरा शोधून शांतपणे निसर्ग अनुभवायची. हो, पण सगळयांच्या मिळून मैफिली रंगल्या की मात्र अशा एक एक  कविता म्हणायची की ऐकणाऱ्यांनी मुग्ध होऊन जावं. तिच्या कविताही खूप खोल असायच्या. एकदा अशीच तिने तिची एक कविता गायली होती. ती वरकरणी उदास होती. पण अर्थ सुंदरच होता. तिने जेव्हा ती गाऊन दाखवली तेव्हा खरंच ती दुपार मंतरलेली वाटायला लागली होती.. तिचा क्षणात मधुर वाटणारा, क्षणात खर्जात तर क्षणात टिपेला पोचणारा आवाज, त्या कवितेला जीवंत करत गेला होता. दारात उभं असताना त्याला का कोणास ठाऊक त्या कवितेची धुन पुन्हा पुन्हा आठवायला लागली पण शब्द काही आठवेनात.

शेजारच्या वेलीवर बसलेल्या पाखरांच्या किलबिलाटाने भानावर येत  त्याने दारावरची बेल वाजवली.

तिने त्याला बोलावलं होतं खरं पण ऐनवेळी तिच्याकडे संस्थेचा, संबंधित आदिवासींच्या ऐतिहासिक वाटचाली संबंधी शास्त्रीय विश्लेषणाचा लेख हवा असल्याची विनंती करणारा मेल येऊन पडला होता. वार्षिक अंक उद्याच छपाईस जाणार असल्या

कारणाने आजच लेख मिळाला तर बरं होईल अशी विनंतीही त्यात होती. नियोजित प्राध्यापकांना ऐनवेळी काहीतरी इमरजन्सी आल्यामुळे ते काम हिच्यावर येऊन पडलं होतं. त्यामुळे दुपार पासूनच तिचं संदर्भ, माहिती, काळ, दाखले गोळा करणं चालू होतं. दिवस कलायला लागल्यावर कुठे कागदांच्या-पुस्तकांच्या गठ्ठयातून हवे ते संदर्भ मिळवण्यात तिला यश आलं.

विजयीमुद्रेने ती त्या पसाऱ्याकडे पाहत असतानाच दारावरची बेल वाजली. आणि क्षणात तिला आठवलं, आज तो येणार होता! तिची एकदम प्रचंड धांदल उडाली. केसांच्या वेटोळयात खुपसलेला पेन, एका हातात पेन्सिल आणि एका हातात मगाचचा कागद घेऊन ती तशीच दार उघडायला धावली. दार उघडलं. समोर एका हातात लिलीची फुलं आणि दुसऱ्या हातात छानपैकी रंगीत कागदात रॅप केलेलं पुस्तकवजा काहीतरी घेतलेला तो उभा. स्वत:चा गोंधळ सावरत ती त्याला हसून ये म्हणाली.

तिच्या त्या अवताराकडे आणि सवयीच्या गोंधळाकडे पाहून तो मनातल्या मनात हसला. आत आला. घर अगदी पूर्वीसारखच होतं. काही किरकोळ बदल सोडले तर विशेष काही बदललेलं नव्हतं.

"बस हां.. मी आलेच" म्हणत ती आत गेली आणि आतली पुस्तकं नीट रचून बाहेर आली.

घरात इतर कोणाची चाहूल लागली नाही म्हणून त्याने विचारलं,

"आई-बाबा?"

बैठकीवरच्या दुसऱ्या कोपऱ्यातल्या लोडला टेकून बसत ती म्हणाली,

"ते एका कॉन्फ्रेंस साठी मुंबईला गेलेयत काल. उद्या येतील."

"ओह अच्छा!" तो मागे टेकत म्हणाला.

तिने एकवार त्याच्याकडे पाहिलं. तब्येत किंचित सुधारली होती. पूर्वीपेक्षा कणभर जास्तच गोराही वाटत होता. बाकी व्यक्तिमत्व पूर्वीसारखंच चार-चौघात सहज उठून दिसेल असं. चटकन लक्ष जाईल असं, रुबाबदार. पुरुषी. काहीतरी आठवल्या सारखं त्याने एकदम आजूबाजूला पाहिलं. आणि मग शेजारी ठेवलेली फुलं आणि पुस्तक तिला देत तो मिष्किलपणे म्हणाला,

"रिकाम्या हाती आलो तर घराबाहेर काढशील असं वाटलं, म्हणून हे घेऊन आलोय सोबत. बघ आवडतय का.."

त्याच्या पूर्वीसारख्याच मजेशीर बोलण्याकडे पाहून मनातल्या मनात सुखावत तिने फुलं हातात घेतली आणि त्यांना हलकेच हुंगत ती म्हणाली,

“आजचं माहीत नाही पण इथून पुढे येताना ही फुलं आणली नाहीस तर नक्की काढेन घराबाहेर.. कुठे मिळाली तुला? किती सुंदर आहेत!”

यावर ‘तुझ्यासारखीच’ वगैरे त्याच्या तोंडात आलं होतं पण त्याने तसं काही म्हटलं नाही.

“पुस्तक पण छान वाटतय. नोबेल विनिंग म्हणजे छानच असणार. वाचते.” पुस्तक चाळता चाळता ती म्हणाली.

“पूर्वी एकदा लंडनला जाणं झालं होतं तेव्हा तिथे एका बूकस्टोअर मध्ये हे दिसलं. आवडलं. मग सवयीने तुझ्यासाठीही एक घेऊन टाकलं होतं.” तो म्हणाला.

“अरे नवीन कशाला घेतलस? तुझीच प्रत वाचली नसती का मी? काय तू नुसती उधळपट्टी करतोस. सवयी बदलल्या नाहीत अजून तुझ्या.” ती पटकन बोलून गेली. पूर्वीही त्याने असं काही केलं की ती नेमकं हेच बोलायची.

दोघही मग एकमेकांच्या त्या जुन्या सवयीच्या वागण्याकडे पाहून हसलेही आणि सुखावलेही.

नंतर मग एकमेकांचे गेल्या काही वर्षातले अनुभव एकमेकांना सांगताना, एकमेकांचं काम समजून घेता- घेता वेळ कसा निघून गेला दोघांनाही समजलं नाही. घड्याळाकडे लक्ष गेल्यावर ती एकदम गडबडीने उठत म्हणाली,

“अरे मी साधं पाणीही विचारलं नाही तुला अजून. काय घेशील सांग. किंवा खायला करू का मी मस्त काहीतरी?” ती उत्साहाने विचारत होती.

“तुला येतं?” तो हसत म्हणाला.

“गप हां.. आता येतं मला बरचसं.” ती ओशाळून म्हणाली.

“बरचसं म्हणजे नक्की काय काय येतं मॅडम आपल्याला?” तो.

त्यावर लहान मुलीच्या उत्साहात ती म्हणाली,

“कांदेपोहे, दडपे पोहे, केळीचं शिकरण, काकडीची कोशिंबीर, आणि कणीक मळलेली असेल तर पोळ्यासुद्धा!!”

“अर्रे व्वा!! इतकं सगळं??” तो हसत म्हणाला.

“तुला इतकं तरी येतं का?” ती.

“येतं आता. बाहेर राहिल्यामुळे शिकलोय. आय मीन शिकावच लागलं.” तो.

“काही नकोय गं मला.. बस तू ये बोल माझ्याशी. सध्यातरी इतकच हवय मला.” तो पुढे म्हणाला.

आणि मग एकदम काहीतरी आठवल्यासारखं,

“ती कविता म्हण नं तुझी.. कधीची मनात रेंगाळतेय माझ्या पण शब्द काही केल्या आठवत नाहीयेत.”

खाली बसत तिने विचारलं,

“कोणती.. तुला आठवतात अजून माझ्या कविता?”

त्यावर तिच्या डोळ्यांत पाहत तो म्हणाला,

“सगळं आठवतं मला!”

ती क्षणभर शांत झाली. आणि मग, “सांग कोणती कविता.. म्हणते मी!”

“शिवथर घळ पहायला गेलो होतो तेव्हा म्हणाली होतीस ती..”

तिला आठवलं. जुनी डायरी आणून त्यातलं नेमकं पान शोधून ती पूर्वीच्याच जागी येऊन बसली. आणि कविता गायला लागली..

***उन्हातल्या अंगणाला***
***सावलीचा भार***

***आसवांच्या तळ्याकाठी***
***सुखाचाच सल***

ती डायरीत पाहून गात होती. तो तिच्याकडे पाहत होता.

***कुठे कधी कशी सरली***
***जाणिवांची ओल***
***वाढणाऱ्या वयाला रे***
***खुंटण्याचा शाप***

***गाव गेलं मागे, त्याची***
***वाट सुनसान***
***हिरव्या आठवांचं मनी***
***हलणारं पान***

***गंध मोगऱ्याचा आता***
***साहवेना फार***
***काटयांतल्या बाभळीची***
***फुंकर ती गार***

***वेगळाच ध्यास, त्याचं***
***वेगळंच वेड***
***वेड्या गोष्टींमध्ये आता***
***जगण्याचं सार***

***उन्हातल्या अंगणाला***
***सावलीचा भार***
***आसवांच्या तळ्याकाठी***
***सुखाचाच सल..***

कविता संपली. तिने डायरी मिटली. त्याच्याकडे पाहिलं. तो डोळे बंद करून ऐकत होता. डोळे उघडून त्यानेही आता तिच्याकडे पाहिलं. आणि डोळ्यांत एक प्रकारची वेगळीच आर्तता घेऊन म्हणाला,

"शब्द अन शब्द खरा आहे अगदी. आत्ता कळतोय बघ अर्थ!"

एक शांत सुस्कारा सोडत ती म्हणाली,

“मलाही आत्ताच कळतोय.. तेव्हा कशी सुचली का लिहली माहीत नाही.”

दोघांनी एकमेकांकडे पाहिलं.

इतका वेळ टाळत असलेल्या विषयाला हात घालण्याची वेळ आता येऊन ठेपलीये हे दोघांनाही उमगलं होतं.

सुरुवात कोणी करायची हा प्रश्न होता. बराच वेळ त्या शांततेत गेल्यावर शेवटी तोच म्हणाला.

“तुझ्या आयुष्यात दुसरं कोणी?..”

त्यावर जरासं हसून आणि डोळयांच्या ओल्या कडा घेऊन ती म्हणाली,

“तशी सोबत पुन्हा मिळालीच नाही कुठे..”

त्याला आत प्रचंड आनंद झाला. पण, तो शांत राहिला.

तिने विचारलं,

“तुझ्या?”

नजर स्थिर ठेऊन तो म्हणाला,

“तसे एक-दोन प्रसंग आले होते.. पण मी पुढे जाऊ शकलो नाही. नेमकं कारण सांगू शकणार नाही. पण इतकं म्हणू शकतेस

की मी आत कुठेतरी ‘आपल्या’ एकत्र येण्याची कायम मनापासून वाट पाहत होतो..”

हे ऐकून तिच्या मनातला तो जुना हळवा कोपरा पुन्हा संवेदित होत होता. पण, मनातलं चेहऱ्यावर उमटेल या भीतीने ती कॉफी आणण्याचं निमित्त करून आत जायला निघाली. तिला थांबवत तो म्हणाला,

“किती दिवस दूर पळणार आहेस तू माझ्यापासून.. स्वत:पासून..?”

ती थांबली. तो पुढे बोलू लागला.

“कधी कधी नं आपलं एखाद्याशी न जुळवता असं काही विशेष नातं जुळतं ना की तो माणूस अंतर्बाह्य ‘आपला’ वाटायला लागतो. तसं वाटतं मला तुझ्या बद्दल आणि मला खात्रीये तुलाही तसंच वाटतं माझ्याबद्दल. मग का सतत ‘उद्याचा’, जर-तरचा विचार करून स्वत:ला मागे ओढत असतेस तू? .”

ती वळली. त्याच्याजवळ बसली. तिच्या डोळ्यांत पुन्हा पाणी साचलं होतं. ते पुसत म्हणाली,

“ठीके. करते तू म्हणतोयस तसं. माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे वगैरे वाक्य मी बोलून दाखवणार नाही. ते तुला कळतच असेल माझ्या डोळ्यांतून. तू सांग, काय करायचं? हे नातं कसं पुढे

न्यायचं? लग्न वगैरे करण्याची माझी इच्छा नाही. मी माझं घर सोडून तुझ्याकडे येऊ शकत नाही. डोक्यात एखादी गोष्ट शिरली तर मी चार-चार दिवस झपाटल्या सारखी लिहत बसते.. खोलीच्या बाहेरही येत नाही. कधी वाटलं तर अगदी कुठल्याही वेळेला लायब्ररी गाठते. तिथे कोणी डिस्टर्ब केलेलं मला आवडत नाही. पैसे म्हणशील तर ते मला माझ्या दोन वेळच्या गरजा भागतील इतकेच कमवायचे आहेत. इतरवेळी मी दऱ्या-खोऱ्यातुन भटकत असते. मागच्याच आठवड्यात मेळघाटातल्या एका दिवस भरलेल्या आदिवासी अठरा वर्षाच्या मुलीला, केवळ येण्या-जाण्याचं साधन नाही म्हणून, चार माणसं झोळीत घालून खांद्यावर उचलून घाट चढून वर आले पण तोवर अतिरक्तस्त्राव आणि वेदनांमुळे तिने जीव टाकला. पोटातल्या बळासकट. ही अशी चित्रं मी रोज पाहते. अस्वस्थ होते. आपली ही बेगडी सुख-दुक्खं त्यासमोर क्षुद्र वाटायला लागतात मग. त्यासाठी खारीचा वाटा म्हणून काहीतरी आयुष्यभर करत राहायचय मला. सांग, चालणारे तुला? थोड्या काळासाठी हे सगळं खूप फॅसिनेटिंग वाटू शकतं. पण रोज डील करायला लागलं तर कसं मॅनेज करणार आहेस तू? आणि मी तरी?"

त्याने शांतपणे सारं ऐकून घेतलं. आणि म्हणाला,

"मी चालणारे म्हटलं तर?"

तिने चमकून त्याच्याकडे पाहिलं.

"हो. पण फक्त माझ्या एका प्रश्नाचं उत्तर दे." तो.

"कोणत्या?" ती.

"लग्न का करायचं नाहीये तुला?"

"कारण हे जे सगळं मला करायचय ते लग्न झाल्यावर मला करता येणार नाही. कितीही पुरोगामी वगैरे आपण झालो तरी लग्न झाल्यावर मुलींवर मर्यादा येतात. आणि मला माझ्या आयुष्यात कसल्याच मर्यादा नको आहेत. घर-करियर-passion यांचा मेळ घालता-घालता मेटाकुटीला येतात साऱ्याजणी. सगळी एनर्जि गोष्टी बॅलेन्स करण्यात जाते. बेडशीट बदलण्यापासून स्वयंपाक, मूल, त्याची वाढ नंतर शाळा-शिक्षण या साऱ्याची जबाबदारी एकट्या स्त्रीवर येऊन पडते. कितीही पुढारलेला पुरुष असला तरी त्याने केलेलं काम हे तिला त्याने केलेली 'मदत' म्हणूनच पाहिलं जातं. समज उद्या आपण लग्न केलं, कशीतरी मूल होईपर्यंत करिअर्स पण सांभाळली एकमेकांची पण मूल झाल्यावर काय? 'तू वेळ देत नाहीस.' 'तुझं त्याच्याकडे लक्षच नाही' 'सगळं मी एकट्याने करायचं का?' वगैरे वाद दोन्ही बाजूंनी सुरू व्हायला लागतील मग काय करायचं!."

तो शांत झाला. विचार करू लागला.

थोड्या वेळाने त्याचा हात हातात घेत ती म्हणाली,

"मला हवा आहेस रे तूही! पण, काय करू सांग. हे सारे विचार मग एकापाठोपाठ एक डोक्यात यायला लागतात. आणि मग मला उत्तर मिळत नाही कशाचच. अस्वस्थ होते. थकलेय रे मी आता या जीवघेण्या द्वंद्वाशी तोंड देऊन देऊन.. तू सांग, काय करू? कसा काढूया आपण यातून मार्ग?"

काहीतरी ठरवल्या सारखं तिचा हात हातात घेत तो शांतपणे म्हणाला,

"लग्न करूया आपण!"

ती प्रश्नार्थक नजरेने त्याच्याकडे पाहू लागली. तो पुढे बोलायला लागला,

"हो लग्न! पण वेगळ्या पद्धतीचं."

"म्हणजे कसं?" ती.

"म्हणजे लग्न करायचं. नंतर तू तुझ्या घरी राहायचं आणि मी माझ्या. तू तुझं आयुष्य जग. मी माझं जगेन. एकमेकांकडून प्रेमाव्यतिरिक्त इतर कसल्याही अपेक्षा आपण ठेवायच्या नाहीत. भेटत आपण राहुच. बाहेर. घरी. कधी तू माझ्या घरी ये. कधी मी तुझ्या घरी येईन. सगळं पूर्वी होतं तसच. फक्त लग्न झालेलं असेल."

तिला आता यात ‘लॉजिक’ दिसायला लागलं. हे म्हणजे लग्न करुनही कायम एकमेकांचे मित्र-मैत्रीण/प्रियकर-प्रेयसी राहण्यासारखं होतं. लग्ना संबंधीच्या रूढ संकल्पना बाजूला ठेऊन केवळ ‘दोन मनांनी एकत्र येणं’ या अंगाने या साऱ्याकडे पाहिलं तर हा मार्ग खरच खूप लॉजिकल आणि सुंदर वाटला तिला. थोडसं अंतर जपल्याने एक्मेकांविषयीची ओढही टिकणार होती आणि अतिपरिचयाने येणारं कंटाळवाणेपणही टाळता येणार होतं. गरज होती ती फक्त ‘लग्न’ या गोष्टीकडे रूढार्थाने न पाहता केवळ आपल्या सोयीच्या नव्या, सुखावह आणि सोप्या दृष्टीने पाहण्याची.

तिला क्षणभर त्याच्या या विचाराचं प्रचंड कौतुक वाटलं. चावी हरवलेल कुलूप कुणीतरी सहज येऊन उघडावं तसं वाटायला लागलं.

“हे शक्य आहे? किती छान होईल खरच असं झालं तर.” ती.

“शक्य आहे की नाही ते आपल्या हातात आहे. तू हो म्हण, होईल शक्य.” तो.

“हो.. हो.. हो... हजारवेळा हो.” आनंदाने ती लहान मुलीसारखी त्याला जाऊन बिलगली.

“तुला कसं सुचलं रे हे? मी इतके दिवस नुसतीच चाचपडत राहिले या प्रश्नांसमोर” ती

"अगं मला काहीच नाही सुचलं.. हे सारे तुझेच तर विचार आहेत. मी फक्त आरसा दाखवलाय तुला. तू आत्ता मगाशी जे काही बोललीस ते ऐकूनच तर आलं माझ्या मनात."

आनंदाने हलकी होत होत ती तिच्या 'आरशाकडे' पाहतच राहिली..

लग्नाची रूढ संकल्पना दोघांना मानवणारी नव्हती. दोघांना एकमेकांसोबत 'जगायचं' होतं, 'रहायचं' नव्हतं! या एकत्र जगण्याला रूढ लग्नाची जोड देणं तिला मान्य नव्हतं. पण, त्याला मात्र लग्न करायचं होतं. शेवटच्या निर्णया पर्यंत येताना दोघांनीही एक एक पाऊल पुढे टाकलं. त्याने तिचं स्वतंत्र आयुष्य आणि अस्तित्व अबाधित राखलं आणि तिने लग्नाचा विधी स्वीकारला. यामागे नाईलाज दोन्ही बाजुंकडून नव्हता. त्याला तिचं म्हणणं पटलं होतं आणि तिलाही आपल्या नव्या आयुष्याची सुरूवात चार आप्तांच्या साक्षीने करण्यात काहीही गैर वाटलं नाही.

दोघांनीही 'लग्न' या गोष्टीकडे, कोणीतरी कोणाकडे जाऊन राहण्याची किंवा मुळातच दोन जीवांनी 'एकत्र राहण्याची' 'व्यवस्था' म्हणून पाहिलं नाही. तर, 'दोन मनांचा एकत्र येण्याचा' 'सोहळा' अशा अर्थाने पाहिलं.

समस्या सगळ्या नात्यात असतात. पण आपण नातं नक्की कुठल्या मार्गाने जाऊ द्यायचं, त्याच्याकडे कसं पाहायचं हे ज्याचं त्यानं ठरवायचं असतं. त्या दोघांनीही त्यादिवशी त्यांच्या पद्धतीने त्यांच्या समस्यांमधून मार्ग काढायचा असं ठरवलं. ती त्यांच्या आयुष्यातल्या नव्या बदलांची नांदी होती..

एक सुंदर पहाट आता दोघांचीही वाट पाहत होती..

# दिगंत

"काय? एक एक मिनिट. राजेश तू असं ऐनवेळी नाही सांगू शकत मला प्रेझेंटेशन इन्कम्प्लिट आहे म्हणून!! केलस काय तू काल दिवसभर? आज शार्प 11ला मीटिंग आहे. तुला माहितीये हे..

.. वेट वेट, मला एक्सक्युजेस नकोयत. काय कसं ते तू बघ. वीदिन ऑन अवर मला मेल आला पाहिजे! दॅट्स इट."

गडबडीत एका हाताने ट्राऊजरला इस्त्री करत, दुसऱ्या हाताने ओम्लेटचा रोल घशाखाली उतरवत, स्पीकर ऑन असलेल्या फोन वरून संहिता राजेशवर अक्षरश: खेकसत होती. तो कॉल कट केला न केला की लगेच वर्माचा कॉल तिच्या फोनवर झळकला. वर्मा म्हणजे तिचा बॉस! कपाळावरच्या आठ्या मिटवत, श्वास एकसारखा करत तिने तो रिसिव्ह केला. पलिकडून इंक्वायरी सुरू झाली.

“सो संहिता, यॉर टीम इज रेडी फॉर टूडे’ज प्रेझेंटेशन? सी धिस क्लाईंट इज वेरी हाय प्रोफाइल अँड वेरी इम्पॉर्टंट ॲज वेल. वी नीड एव्रिथिंग अप टू द मार्क. गॉट इट!”

“येस सर. आय नो. आय ॲम पर्सनली लूकिंग इंटू एव्रिथिंग..” सगळं ठीक असल्याचा आव आणत ती उत्तरली.

“गुड.. प्रेझेंटेशन तू स्वत: दे. आणि लेट मी क्रॉस चेक इट फर्स्ट.” वर्मा.

आता जास्त टेपा लाऊन उपयोग नाही हे संहिताला कळून चुकलं. ती म्हणाली,

“सर, ॲक्चुअल्ली.. प्रेझेंटेशनवर अजून काम चालूये. झालं की मी रीपोर्ट करेनच तुम्हाला.”

“काम चालूये म्हणजे? इट्स एट थर्टी ऑलरेडी संहिता! आर यू आऊट ऑफ यॉर माइंड?” वर्मा भडकला होता.

यावर शक्य तितक्या शांतपणे ती म्हणाली,

“सॉरी सर, पण राजेश आणि सोहम प्रेझेंटेशनवर काम करत होते. सोहमची आई अचानक आजारी पडली म्हणून तो लीववर आहे. राजेश एकट्याने मॅनेज करतो म्हणाला होता. कालपर्यंत एव्रिथिंग वॉज ऑन लाइन. रात्री मला प्रेझेंटेशन मिळणं अपेक्षित होतं. पण ते नाही मिळालं. व्हेन आय आस्क्ड फॉर, राजेश म्हणाला

ते अजून रेडी नाहीये. ही इज स्टिल वर्किंग ऑन इट.. बट, यू डोन्ट वरी सर. आय विल मॅनेज थिंग्ज वीदिन टाइम."

"आर यू सिरियस संहिता?? व्हेर इज यॉर प्रोफेशनलिज्म? यू कांट ईवन मॅनेज यॉर टीम अँड डेडलाइन्स! तरीच मला हा प्रोजेक्ट तुला द्यायचा नव्हता. पण हे सिनियर्स!! काय माहित या आधीचे प्रोजेक्टस नक्की कसे मिळवलेयस तू.. एनिवेज सी मी अॅट द ऑफिस. नाऊ!"

'कसे' वर छद्मी हसून वर्मा ने पलिकडून फोन कट केला.

संहिता क्षणभरासाठी स्तब्ध झाली! तिच्या कानांवर आत्ता जे काही पडलं होतं ते केवळ अविश्वसनीय होतं. वर्माच्या बोलण्यात तितकंसं तथ्य नसतं हे माहित असलं तरी आज तिला जे ऐकावं लागलं होतं ते किळसवाणं होतं.

बऱ्याच वेळाने वाजणाऱ्या फोनच्या आवाजाने ती भानावर आली. तिने इकडे-तिकडे पाहिलं. पण फोन तिचा नव्हता. रियाचा फोन वाजत होता. 'ही मुलगी ना..' मनातल्या मनात म्हणत जराशा वैतागातच ती हॉल मध्ये आली. अस्ताव्यस्त पसरलेली पुस्तकं, कॉफीचे मग्स, चालू असलेला टीव्ही, समोरच्या टी-पोयवर वाजत असलेला फोन आणि सोफ्यावर आडवी पडून केसाच्या बटेसोबत निर्विकारपणे खेळत बसलेल्या रिया कडे पाहून ती क्षणभर थांबली.

“रिया..”

शून्य प्रतिसाद!

“रिया?? अगं फोन वाजतोय तुझा..”

रिया ने क्षणभर फोन कडे पाहिलं आणि मग मान वाकडी करून संहिता कडे पाहिलं.. आणि मग बोट टीव्ही च्या दिशेने रोखलं.

हेडलाइन झळकत होती,

“केंद्रीय लोकसेवा आयोगाचा निकाल जाहीर. अमुक अमुक देशात पहिला.. वगैरे वगैरे..”

संहिता क्षणभरासाठी एकदम excite झाली. आनंदाने किंचाळत ती म्हणाली,

“रियू.. म्हणजे तू..”

आणि मग रियाच्या नकारर्थी डोलणाऱ्या मानेकडे पाहून एकदम गप्प झाली. तिला काही सुचलंच नाही. इंटरव्ह्यु बरा गेलाय हे ऐकल्यापासून यावर्षीच्या फायनल लिस्ट मध्ये रिया असणारच हे ती गृहीत धरून चालली होती. पण घडलं उलटच होतं..

दोघीही काही मिनिटं तशाच शांत बसून राहिल्या. शाब्दिक सांत्वन वगैरेची गरज नसलेली ती परिस्थिती होती आणि त्यांचं

नातंही. काही मिनिटांनी रियाने उठून रिमोटची बोटांना सापडतील ती बटणं दाबली. बातम्यांचा आवाज जाऊन welcome to the world of travel असं काहीतरी कानांवर पडल्यावर ती शांत झाली. आणि पुन्हा बसून राहिली नुसतीच.

एव्हाना संहिताचा फोन पुन्हा वाजायला लागला होता. चिडून तिने तो आधी सायलंट केला पण मग क्षणभराने काहीतरी विचार केल्यासारखा स्विच ऑफच करून टाकला.

दोघी काहीही न बोलता डोक्यात चालू असलेल्या वादळांवर हिंदकळत होत्या.

काहीवेळाने खिडकी बाहेर पाहत संहिता बोलू लागली,

"यू नो व्हॉट, या कंपनीत मी आता जवळ-जवळ तीन वर्षांपासून काम करतेय! पण माझ्याकडे अजूनही एम्प्लोयी म्हणून नाही तर 'फिमेल' एम्प्लोयी म्हणूनच पाहिलं जातंय. नो मॅटर हाऊ हार्ड आय वर्क ऑर हाऊ इफीशियंट्ली आय मॅनेज माय क्लाएंट्स!" ती आतून अक्षरश: चडफडत होती.

रियाने तिच्याकडे एक कटाक्ष टाकला.

"माझं सक्सेस असो अथवा फेल्यर.. पहिल्यांदा चर्चा कशाची होते तर माझ्या 'फिमेल' असण्याची.. पाथेटिक मोरोन्स.." अवळलेली मूठ तिने सोफ्यावर आपटली.

रियाने सहानुभूतीने तिच्या पाठीवरून हात फिरवला. आणि एक मोठा श्वास घेऊन ती काहीतरी बोलणार इतक्यात पुन्हा तिचा फोन वाजू लागला. आईचा असल्याने तिने तो उचलला. थोडं सांत्वनपर बोलणं वगैरे झाल्यावर रियाची आई मुद्द्यावर आली.

“बरं रियू, ॲज यू प्रोमिस्ड अर्लियर, आता आपण मुलं बघूया का..”

“आई, अगं पण..” रिया काही बोलणार इतक्यात तिला मध्येच तोडत तिची आई पुढे म्हणाली..

“पण वगैरे नको रियू आता.. ते राव काका त्यांच्या अनुराग साठी कधीपासून विचारतायत. एकदा भेट तरी तू.. लगेच कै होणार नाहीये लग्न. बरा वाटला तर पुढचा विचार करू.. मी नंबर दिलाय तुझा त्यांना. तो करेल तुला फोन.”

“आई हे बघ, बऱ्या-वाईटाचा प्रश्न नाहीये. अगं आज रिजल्ट लागलाय.. थोडं थांब की. पाहू आपण नंतर. आणि मी पुढचा अटेम्प्ट.. हॅलो.. हॅलो आई..”

पलिकडून फोन केव्हाच कट झाला होता. रिया अजूनच वैतागली. तिने फोन सोफ्यावर आदळला.

संहिता तिच्याकडे पाहतच होती.

तिच्याकडे पाहत रिया वैतागून म्हणाली,

"कुठेतरी निघून जावसं वाटतय यार मला.. दूर.."

"लेट्स गो टू हम्पी.. अँड एक्सप्लोर इट्स ॲन्शिएंट ट्रेझर!"

चालू असलेल्या टीव्हीवरचं वाक्य दोघींच्या कानांवर पडलं.

दोघींनी एकमेकींकडे पाहिलं. ती नजर वेगळी होती.

काहीतरी विचार केल्यासारखी जमिनीकडे पाहत संहिता म्हणाली,

"चल.. जायचं खरंच?"

रियाने क्षणभर अविश्वासाने तिच्याकडे पाहिलं.

पण, मनात रिझल्ट, आई, लग्न, मुलं.. वगैरे विचार दाटायला लागल्यावर तीही निश्चय झाल्यासारखी म्हणाली,

"चल.."

दोघींनी मग मागचा पुढचा विचार न करता लगेच थोडे कपडे, थोडं सामान sack मध्ये कोंबलं. आणि जायला निघाल्या.

रियाने गूगल मॅप ऑन केला आणि संहिता ने गाडी स्टार्ट केली..

“सो, काय प्लान आहे!”

स्टीरिंगवरचा हात गियरवर ठेवत संहिता ने रियाला विचारलं.

बराच वेळ मॅप कडे पाहून आणि थोडेफार रिव्यूज वाचून रिया म्हणाली,

“आधी पुणे-सातारा रोड तिथून मग सरळ सातारा तिथून कोल्हापूर. दुपारचं जेवण कोल्हापूरला करु. मंदिराला भेट देऊ वाटल्यास. तिथून सरळ हुबळी. हुबळीला मुक्काम. मग सकाळी उठून होस्पेट, वगैरे करत दुपार पर्यन्त हम्पी! दॅट्स इट!”

“वॉव यार सुपरफास्ट रिया! Seems good. But, you know what.. I think, we should let this unplanned road trip be unplanned only. वाटेल तिथे थांबू. वाट्टेल ते करू. मोकाट सुटायचं ठरवलंच आहे तर फुल्ल ऑन सुटू. कुठे पोचण्याची घाई नको. आणि परतण्याची चिंता. लेट्स एंजॉय द जर्नी! What’s say?”

हातातला फोन बाजूला ठेवत, सीटवर मागे रेलत रिया म्हणाली,

“actually yar.. let’s do it! असंही या प्लॅनिंग आणि टाइमटेबल्सचा मलाही वीट आलाय. Let our souls wander for a while..”

“हम्म.. येस्स! बरं मी माझा फोन बंद ठेवलाय. चालू ठेवला तर तो वर्मा आणि ते ऑफिस मधले लोक जगू देणार नाहीत मला. तू काय करतेयस?” संहिता.

“मी ठेवेन चालू. लागेल आपल्याला जीपीएस वगैरे साठी. मला नाही येणारेत फारसे कॉल्स आय नो! मातोश्री करतील बट आय विल हॅंडल हर!” रिया.

“ओक्के देन! हियर वी गो..”

दोघींनी sunglasses चढवले आणि त्यांचा प्रवास सुरू झाला. कात्रजला डेअरीपुढे थांबून त्यांनी यथेच्छ लस्सी प्यायली. नाश्ता मात्र बनेश्वरच्या अलिकडे करायचं ठरलं. घड्याळात दहा वाजत आले होते. बायपास मागे सरून घाट लागला तशा दोघी त्यांच्या त्यांच्या विचारात जरावेळ गुंगल्या.

हे असं सगळं मागे सारून कुठेतरी निघून जाणं हा परिस्थितीवरचा उपाय नाही हे दोघींना माहीत होतं. पण असा एक ब्रेक मात्र नक्कीच गरजेचा होता. काही कोडी, काही समस्या केवळ

थोड्याशा मोकळ्या हवेने आणि मनाला दिलेल्या हवापालटानेही निम्म्या हलक्या होतात, तसं काहीतरी.

मनात थोडंसं थ्रिल दाटलेलं असलं तरी आत कुठेतरी रिया प्रचंड उदास भासत होती. डोळ्यांतली सगळी स्वप्नं, उमेद सारं काही मागची दोन-तीन वर्षं तिने जिद्दीने केलेल्या अभ्यासात ओतलं होतं. क्षणाची उसंत नाही की वेगळा विचार नाही. तिच्या बाकीच्या मैत्रिणी जॉब, वीकएंड कल्चर, लग्न वगैरे गोष्टींमध्ये गुंग असताना ही मात्र झोप सोडून दिवसातले उरलेले सगळे तास पुस्तकांपुढे काढत होती. तेच तिचं विश्व झालेलं होतं. यूपीएससी म्हणजे अफाट अभ्यास इतकंच माहित असतं बऱ्याच जणांना. पण, तो अभ्यास अफाट असला तरी रोचक असतो. तो करता करता आपल्या आतली व्यक्ति घडत जाते. आपल्याही नकळत. इतिहास-भूगोलापासून विज्ञान, पर्यावरण, अर्थशास्त्र, राजकारण, राज्यशास्त्रापर्यंत कुठलाही विषय मग आपल्यासाठी वर्ज्य राहत नाही. त्या अभ्यासाची धुंदी चढत जाते. आपलं भान वाढत जातं. रिया तर अगदीच बुद्धिजीवी होती. यावर्षी पूर्वपरीक्षा-मुख्यपरीक्षा सगळं पार करत जेव्हा ती दिल्लीला संघ लोकसेवा आयोगात मुलाखत देऊन आली तेव्हा तिच्यासकट साऱ्यांच्याच तिच्या बाबतीतल्या अपेक्षा वाढल्या होत्या. पण यश थोडक्यात हुकणं का काय ते ती आत्ता अनुभवत होती. यूपीएससीची तयारी हे जितकं

बौद्धिक आव्हान आहे त्याहून अधिक ते मानसिक आव्हान आहे. अर्थात ती उमेद हरली नव्हती. पण, पुन्हा पहिल्यापासून सुरुवात करायची तेही आई-वडिलांना समजावून घेत, तर तिला थोडासा मोकळा श्वास आत्ता नक्कीच हवा होता. आणि तोच मिळवण्यासाठी ती क्षणाचाही विचार न करता लगेच संहिता सोबत निघाली.

संहिता आणि ती कॉलेज पासूनच्या मैत्रिणी. ग्रॅजुएशन नंतर रियाने वेगळी वाट निवडली पण संहिताने मात्र पुढे पोस्ट ग्रॅजुएशन केलं आणि आता ती मार्केटिंग क्षेत्रात चांगलाच जम बसवून असली तरी एक स्त्री, तेही अविवाहित म्हंटल्यावर वाट्याला ज्या काही नकोशा गोष्टी येतात त्या तिच्याही वाटेला येत होत्या आणि त्यामुळे ती हताश होत होती. पण, काही होवो हे असं पुन्हा ऐकुन घायचं नाही असं ठरवून, जाऊदे गेलीतर नोकरी म्हणत ती आज ड्रायविंग सीटवर बसली होती, स्वत:च्या केलेल्या कामावर आणि मेहनतीवर विश्वास ठेऊन..

थोड्या काळासाठी जगाला, जगण्याच्या अखंड चालू असलेल्या शर्यतीला मागे टाकत त्या निघाल्या होत्या मनातल्या क्षितिजांच्या शोधात..

कात्रज घाटातून बाहेर आल्यावर हायवेवर थांबून दोघींनी भरपेट नाश्ता केला. दोघीच तरुण मुली गाडीत पाहून वेगवेगळे लूक्स त्यांना मिळत होते. अशा लोकांच्या तोंडावर एक जबरी स्माइल फेकून त्या त्यांच्या वाटेला लागल्या.

विस्तीर्ण हायवे सुरू झाला. गाडी आता रियाने चालवायला घेतली.

संहिताने म्यूझिक ऑन केलं..

दोघींच्या डोळ्यांतलं समोर अस्ताव्यस्त पसरलेलं अवकाश त्या शब्दांवर ताल धरू लागलं..

*Lately, I've been, I've been losing sleep*

*Dreaming about the things that we could be*

*But baby, I've been, I've been praying hard*

*Said no more counting dollars*

*We'll be counting stars*

*Yeah, we'll be counting stars..*

दोघींनी एकमेकींकडे पाहिलं. नेमकं गाणं लावल्यामुळे रिया संहितावर खुश होती. गाणं पुढे जाऊ लागलं तसा रस्ता भराभर मागे पडत होता आणि दोघींच्या डोक्यातले विचारही..

*I see this life, like a swinging vine*

*Swing my heart across the line*

*And in my face is flashing signs*
*Seek it out and ye shall find*
*Old, but I'm not that old*
*Young, but I'm not that bold*
*And I don't think the world is sold*
*On just doing what we're told*

गाण्यातले शब्द, संगीत आणि त्यांचा प्रवास सारं आता एक झाल्यासारखं भासत होतं.. Ryan Tedder च्या टिपेच्या सुरांत आपलाही आवाज मिसळत दोघीही आता मोठयाने गाऊ लागल्या..

*I feel something so right*
*Doing the wrong thing*
*And I feel something so wrong*
*Doing the right thing*
*I couldn't lie, couldn't lie, couldn't lie*
*Everything that kills me makes me feel alive..*
*Said no more counting dollars*
*We'll be counting stars*
*Yeah, we'll be counting stars..*

रस्ता सुसाट धावत होता. सूर्य डोक्यावर आला होता. कोल्हापूर यायला अजून तासभर तरी लागणार होता. संगीताच्या तालावर सरणाऱ्या रस्त्याकडे पाहत संहिता सीटवर मागे रेलून बसली होती. ती न गेल्यामुळे ऑफिस मध्ये आज काय कमाल धांदल उडाली असेल, वर्मा रागाने कसा लाल झाला असेल या सगळ्याचा विचार करून तिला क्षणभरासाठी गम्मतही वाटली.

इतक्यात रिया तिला म्हणाली,

“संहिता, एक काम कर ना..”

“बोल”

“माझा फोन घे. बाबांचा नंबर काढ आणि मी सांगेन ते टाइप कर.” रिया.

काही न बोलता संहिता ने ती म्हणतेय तसं केलं. “हम्म, काय टाइप करू..”

थोडासा विचार करून रिया बोलू लागली.

“बाबा हाय.. मी आणि संहिता हम्पीला जातोय काही दिवसांसाठी. मला वेळ मिळाला की मी कॉल करेन. पण, खरं सांगू का आत्ता कोणाशी काही बोलावंस वाटत नाहीये. मी ठीक आहे. मला फक्त थोडासा वेळ हवाय. मला खात्री आहे तुम्ही समजून घ्याल.”

नजरेनेच 'झालं' असं रियाने संहिताला सांगितलं.

"sent." संहिता.

फोन बाजूला ठेवत संहिता पुढे म्हणाली,

"डोन्ट वरी, काका-काकू तसे अंडरस्टॅंडिंग आहेत. घेतील ते समजून."

"हम्म.." रिया.

दोघींनी एकमेकींकडे हसून पाहिलं.

थोड्यावेळाने हायवेला लागून असलेल्या एका रसवंती समोर रियाने गाडी थांबवली. उन्हाची लाही गाडीतल्या एसीलाही जुमानत नव्हती.

दोघी उतरून चार खुर्च्या मांडलेल्या आणि गवताच्या गंजीचं छत असलेल्या त्या रसवंती मध्ये गेल्या.

"बोला ताई काय देऊ?"

स्त्रीचा आवाज ऐकून दोघींना सुखद धक्का बसला. खुर्चीवर बसत दोघींनी दोन ग्लास ऊसाचा रस मागवला. हायवेवरच्या त्या रसवंतीत त्या एकट्या बावीस-तेवीस वर्षांच्या वाटणाऱ्या मुलीला पाहून त्यांना कुतूहल वाटल्यावाचून राहिलं नाही.

सराईतासारखं तिने मशीन मध्ये ऊसाच्या कांड्या घातल्या. तिचे हात ठरलेल्या वेगाने आणि कौशल्याने चालत होते.

चौकशी अंती त्यांना समजलं की ही शिल्पा तिच्या वडिलांसोबत ही रसवंती चालवते. तिचा भाऊ पुण्याला काहीतरी काम करतो. तो गावाकडे फारसा येत नाही. मग वडील आणि ही आलटून पालटून त्यांचा हा व्यवसाय सांभाळतात.

बोलत-बोलतच तिने दोन मोठे काचेचे ग्लास भरून रस आणला त्यात दोन बर्फाचे खडे टाकले आणि थोडासा लिंबू पिळून तिने ते दोघींसमोर ठेवले.

दोघींचे तहानलेले गळे त्या गार-मधूर रसाने तृप्त झाले. शिल्पाच्या प्रसन्न चेहऱ्याकडे बघत रियाने तिला विचारलं,

“शिक्षण किती झालंय गं तुझं?”

“बीए फायनलची परीक्षा दिली ताई यावर्षी मी.”

“अरे वा.. मग आता पुढे काय विचार?” संहिता ने विचारलं.

“पुढे काय ताई मला आमची ही रसवंती लई आवडते बघा. मला हिला वाढवायचाय. म्हणजे थोडं असं मॉडर्न वगैरे करायचंय. पन त्याला पैसे लागतात. आण्णा कडं आहेत थोडे पन तो काय माझं ऐकत न्हाई. माझ्या लग्नासाठी ठेवलेत म्हणतो. आता मला

कै लगेच लग्न बिग्न कारायचं न्हाई बरं. पन लोक बसू देत नाहीत.” ती निरागस पणे सगळं सांगत होती.

तिचं बोलणं ऐकून दोघी विचारात पडल्या. संहिता हसून म्हणाली,

“सो, शिल्पा तुझी स्टोरी काही आमच्याहून वेगळी नाही.”

रिया यावर ओळखीचं हसली. शिल्पा काही न कळून म्हणाली,

“म्हणजे ओ ताई, तुमचे आई-वडील बी लग्नाच्या मागं लागलेत का?”

“हो ना बाई, म्हणून तर पळून आलोय आम्ही.” रिया म्हणाली.

शिल्पा विचारात पडली. “पळून??”

“अगं पळून म्हणजे पळून नाही. पण कंटाळून ट्रीपला जातोय आम्ही. रिया, अगं, घाबरवू नको तिला.” संहिता हसून म्हणाली.

“अस्सं होय!” शिल्पाने हसून टेबलवरचे ग्लास उचलले.

नाही म्हटलं तरी रियाच्या मनात विचार आल्या वाचून राहिला नाही. मुलगी कुठल्याही सामाजिक स्तरातली का असेना, काही मूलभूत गोष्टी प्रत्येकीच्या बाबतीत सारख्याच असतात.

जरावेळ तिथे बसून हसऱ्या शिल्पाला मनोमन शुभेच्छा देत दोघी कोल्हापूरच्या दिशेने निघाल्या.

बऱ्याच वेळाने न रहावून रिया संहिताला म्हणाली,

"संहिता, माझं, या शिल्पाचं थोडं वेगळंय. आमची करिअर्स अजून व्हायचीयेत. ऑर इन फॅक्ट आमच्या मनाचीच तयारी अजून व्हायचीये. पण, तुझं तसं नाहीये. तू settled आहेस. तू का करत नाहीस लग्नाचा विचार?"

संहिता यावर थोडीशी शांतच राहिली.

"सांगून टाक गं. किती दिवस गोष्टी मनात ठेवणार आहेस? दरवेळी मी विषय काढला की तू अशीच गप्प बसतेस. शेअर केल्याने हलक वाटतं डियर!"

"काय सांगू रिया. माझ्या मेडिकल कंडिशन विषयी तुला माहितीच आहे. पीसीओडी अँड ऑल दॅट स्टफ. सहा एक महिन्यांपूर्वी मी नेहमीसारखी माझ्या gynac कडे गेले होते. तेव्हा काही टेस्ट्स केल्या होत्या. रीपोर्ट पाहून डॉक्टर थोड्याशा टेंस्ट वाटल्या. आधी काही बोलल्या नाहीत. पण मी खोदून खोदून विचारल्यावर म्हणाल्या, माझ्या ओवरीज मध्ये uncurable defect आहे. त्याचा अर्थ थोडक्यात मी कधीही आई होऊ शकत नाही असा होतो.

अर्थात आयव्हीएफ वगैरे बरेच options आता उपलब्ध आहेत. विज्ञान खूप पुढे गेलंय. असंही त्या म्हणाल्या. पण मी समजले काय समजायचं ते.”

रिया ऐकून स्तब्ध झाली. पण सावरत पुढे म्हणाली,

“इट्स ओके संहिता.. हे biological आहे. कोणाच्याही बाबतीत होऊ शकतं. आणि दत्तक घेण्यापासून बाकीचे बरेच पर्याय आहेत की. या साऱ्याचा संबंध तू लग्नाशी का जोडतेयस?”

“कारण मला त्यानंतरचे complications नको आहेत. लग्न करा मग मूल होत नाही म्हणून स्वत:च्या शरीरावर नको तितक्या treatmentsचा मारा करा. नो. मला नाही जायचंय त्यातून. कुटुंब, समाज साऱ्यांच्या नको त्या प्रश्नांना सामोरं जाण्याची तयारी ठेवा.. नकोच ते. मी अशीच उत्तम आहे.”

“तू नकारर्थी विचार करतेयस असं नाही वाटत का तुला?” रिया.

“नकारर्थी नाही रिया, मी प्रॅक्टिकल विचार करतेय. हे बघ, मी एकतर ही गोष्ट लपवून ठेवणार नाहीये. आणि हे कळल्यावर मला नाही वाटत कुठला मुलगा माझ्याशी लग्न करायला तयार होईल! तुला तो ऑफिस मधला अनिकेत माहितीये. तो माझ्यात इंट्रेस्ट घेऊ लागला होता. I too had feelings for him. तू मधल्या

काळात चिडवू लागली होतीस बघ त्यावरून मला. पण नंतर अचानक तो चॅप्टर संपला. का माहितीये? मी त्याला माझ्या मेडिकल कंडिशन्स विषयी सांगितलं. हे असं असतं. गोष्टी फिरून तिथेच येऊन थांबतात. सो, आता माझं ठरलंय. एकटा जीव सदाशिव!"

".. स्टिल मला वाटतं, तू ओपन रहा. हे सगळं ॲक्सेप्ट करणारा कोणीतरी नक्की येईल बघ तुझ्या आयुष्यात.." रिया.

"हाहा.. fantasies!" संहिता खिडकी बाहेर पाहत म्हणाली.

रस्त्यावर मधोमध उंच signboard झळकत होता,

"कोल्हापूर शहर तुमचं स्वागत करत आहे!"

"उदे गं अंबे उदे.."

मंदिराच्या परिसरात काही कीर्तनकरी अंबाबाईच्या नावाचा जयघोष करत होते. हात-पाय स्वच्छ धुवून रिया आणि संहिता मंदिर परिसरात आल्या. तऱ्हेतऱ्हेची दुकानं, फुलं, ओटीचं सामान घेऊन बसलेल्या बायका, दागिन्यांची छोटेखानी थाटलेली दुकानं, हळदी-कुंकवाचे रचलेले डोंगर.. दोघींनाही प्रसन्न वाटलं. ठरल्याप्रमाणे दुकानदारांची चढाओढ सुरू होती, ताई ओटीचं

सामान घ्या, ताई देवीसाठी फुलं घ्या.. संहिताने मग एका ठिकाणी थांबून ओटीचं सामान घेतलं. रियाने मात्र निशिगंध आणि चाफ्याची काही फुलं घेतली फक्त.

दुपारची वेळ असल्याने फारशी गर्दी नव्हती. रांगही अगदी नावाला. तिथे उभं असताना काळ्या पाषाणातलं ते सुंदर मंदिर, त्याची अफाट व्याप्ती, कोरीवकाम, त्याचा हजार एक वर्षांचा प्रवास सारं काही मनावर उमटत होतं. दोघींच्या मनात आपोआप लीन भाव दाटायला लागले. गर्भगृहाच्या दाराशी उभं राहून रियाने देवीकडे पाहिलं. पिवळं मळवट, त्यावर ठसठशीत लाल कुंकू, अंगावरची भरजरी लाल काठांची हिरवी साडी, आभूषणे आणि या सर्वाहून जास्त आकर्षित करणारं महालक्ष्मीचं सावळं, भेदक, आणि स्वयंभू रूप, आभा तिच्या मनाला वेगळीच अनुभूती देऊन गेली. हातातली निशिगंधाची नि चाफ्याची फुलं रियाने देवीला वाहिली. पुष्परूपी चैतन्याने शक्ती-स्वरूप चैतन्याची पुजा केली!

मनभर व्यापलेली एक वेगळीच शांती घेऊन दोघी बाहेर पडल्या. मनातले सारे कोलाहल काही काळासाठी निवळल्या सारखे वाटायला लागले.

दोघींनी मग भरपेट जेवण केलं. सोलकढी ओरपली. आणि पुढच्या प्रवासाला निघाल्या. त्यांनी कोल्हापूर सोडलं तेव्हा

घड्याळाचा काटा साडे तीन- चार च्या आसपास होता. जेवणामुळे दोघी थोड्या सुस्तावल्या असल्या तरी प्रवासाची धुंदी आता त्यांना चांगलीच चढली होती. मगाशी देवळात प्रसाद म्हणून मिळालेलं प्रसन्न मनही आता त्यांच्या सोबत होतं.

थोडावेळ नकाशाचा अभ्यास करून रिया म्हणाली,

"संहिता, इथून आपण थोडा रस्ता वाकडा केला ना तर गोकाक फॉल जवळच आहे.. जाऊया का?"

"थोडा वाकडा म्हणजे नक्की किती ते सांग."

"100 kms आहे. दोन एक तास लागतील."

संहिता ने थोडा विचार केला. आणि मग, "ओक्के, रूट ऑन कर. हुबळीला पोचायला उशीर होईल पण ठिके. असंही जाऊन झोपायचंच आहे."

निपाणीच्या बरंच पुढे आल्यावर संकेश्वरच्या अलिकडे नॅशनल हायवे वरुन डावीकडे टर्न घेत त्यांनी गोकाक-हुक्केरी-संकेश्वर रोड धरला. आणि गोककच्या दिशेने निघाल्या. रस्ता अर्थात खूप रमणीय होता. घट्प्रभा नदीची कृपा सारी. ड्रायविंग करायला संहितालाही मजा येत होती. रिया कमेऱ्याने दृश्य टिपण्याचा प्रयत्न करत होती. गोकाक जवळ येऊ लागलं. मुख्य गावापासून सहा किमीवर मुख्य धबधबा आहेसं त्यांना समजलं.

वाटेत नदीच्या खळाळत्या प्रवाहाच्या तीरावर असलेलं शिवमंदिर दोघींना भावलं. ठरलेल्या काही टुरिस्ट पॉईंट्स वरुन त्यांनी धबधब्याचं दर्शन घेतलं. पण त्यांचं समाधान होईना. जवळपास 170 फुट उंचीवरून घटप्रभा नदी खाली कोसळते. तो घोंघावणारा आवाज, शुभ्र तुषार त्यांना अधिकाधिक जवळ बोलावत होते. गोकाक धबधब्याचं एक आकर्षण म्हणजे, तिच्यावर स्वातंत्र्यपूर्व काळात बांधलेला झुलता पूल. जवळपास 210 मि. लांबीचा आणि 14 मि. उंचीवर असलेला हा लाकडी पूल रोप्सवर तोललेला आहे. दोघींना आधी काही वाटलं नाही. पण जस-जशा त्या पूलावरून पुढे चालत जाऊ लागल्या तसं त्यांना कळलं याला झुलता पूल का म्हणतात ते. पायांखाली रोरावत वाहणारी घटप्रभा आणि त्यावर झुलणारा हा पूल.. थोडीशी भीती, प्रचंड उत्सुकता आणि ते नितांत सुंदर दृश्य.. दोघी भारावून गेल्या.

सूर्य मावळायला अजून थोडा अवकाश होता।

चौकशी अंती त्यांना समजलं, एक छोटा रस्ता खालून धबधब्याच्या आणखी जवळ नेतो. क्षणाचाही विचार न करता त्यांनी तो रस्ता धरला. दोन्ही बाजूंनी गर्द झाडी, नारळीची झाडं, वडाचे जीर्ण वृक्ष.. विलोभनीय रस्ता, कललेला दिवस.. दोघींची मनं उन्मेषाने भरली होती. वाटेत काहींनी दोघीच मुली आहात पुढे

जाऊ नका वगैरे सल्ले दिले. पण अजून पुरेसा सूर्यप्रकाश असल्याने दोघींनी ती रिस्क घेतली आणि रस्ता संपून पायवाट लागते तिथे गाडी थांबवली. धबधब्याचा आवाज होताच वाट दाखवायला. पण, फारसं चालावं न लागता त्यांना नदी दिसली आणि तिच्या काठावरचे खडकही. तिथून डावीकडे बऱ्याच अंतरावर वरुन कोसळणारा गोकाक दिसत होता. नदीच्या किनाऱ्यावर झाडी होती. आणि झाडीच्या अलिकडून एक पायवाट डावीकडे धबधब्याच्या दिशेने जाताना त्यांना दिसली. काही विचार न करता दोघी त्या पायवाटेने भराभर निघाल्या. वाटेत त्यांच्यासारखा एखाद दूसरा प्रवासी त्यांना दिसला. धबधब्याचा आवाज सोबतीला होताच. विरळ झाडीतून शेजारून वाहणारी नदीही दिसत होती. चालत चालत त्या खूप पुढे आल्या. आता एकमेकींचे आवाजही त्यांना ऐकू येईनात.. रोरावणारा धबधबा त्याचं अस्तित्व सिद्ध करत होता.

पायवाट संपली. नदीच्या किनाऱ्यावरचे दगड लागले. समोर नदी आणि पंचेंद्रिये व्यापून टाकणारा अफाट गोकाक जलप्रपात! दोघी आ वासून पाहत राहिल्या. धबधब्याचे तुषार सहज त्यांच्यापर्यंत पोचत होते. तो गारवा दोघींना खोल खोल शांतवत गेला. तो भव्य जलप्रपात आणि ते त्याचं शुभ्र स्फटिकी रूप त्यांच्या डोळ्यांत मावेना. निसर्ग नावाची गोष्ट आणि आपलं त्याच्या

समोरचं अति क्षुद्र अस्तित्व दोघींना ठळक जाणवलं. रंध्रा-रन्ध्रात तो प्रपात साठवत दोघी मागे फिरल्या. त्याच पायवाटेने मागे येत झाडांतून मगाशी दिसलेल्या खडकापशी आल्या. तो महाकाय जलप्रपात पचवून नदी इथे अगदीच शांत अविचल भासत होती. पाण्यात एक-दोन पावलं टाकून दोघी त्या खाडकावर चढल्या. समोर भव्य धबधबा, बाजूला शांत नदी, सूर्याची मावळती आभा.. एक अनोखी तंद्री लागली. बराचवेळ दोघी एक शब्दही न बोलता तिथे बसून राहिल्या. काही गोष्टी शब्दांकीत करता येत नाहीत. व्यक्त करता येत नाहीत. भाषा नावाची गोष्ट अशावेळी अगदीच निरुपयोगी. तसा हा अनुभव. त्या रोरावणाऱ्या धबधब्याच्या आवाजात दोघींना कमालीची शांतता मिळात होती. निसर्ग कदाचित यासाठीच जवळचा वाटतो. तो आपला आपल्याशीच संवाद घडवून आणतो.

काहीवेळाने रिया बोलू लागली,

“अब्जो वर्षं.. अक्षरश: अब्जो वर्षं ही नदी अशीच वाहतेय.. आणि आपण तिच्या तीरावर काही वर्षं जगणार आहोत फक्त.. घडीचे प्रवासी.. काळाच्या या अतिविशाल कॅनवस कडे आणि तो काळ याचि देही अनुभवलेल्या ह्या प्राचीन प्रवाहाकडे पाहिलं ना

की आपण किती लहान, आपलं विश्व किती छोटं आणि आपले प्रॉब्लेम्स किती हास्यास्पद वाटतात ना..”

संहिता तिचं बोलणं नुसतंच ऐकत होती. रियाच्या डोळ्यांसमोर जॉग्रफी-हिस्टरी साऱ्याची सरमिसळ झळकू लागली होती. जवळपास अब्ज वर्षांपूर्वी इंडियन प्लेट गोंडवना पासून म्हणजे आत्ताच्या आफ्रिकेपासुन विलग होऊन उत्तरेकडे सरकू लागली.. युरेशियन प्लेटला येऊन मिळाली. त्या प्रचंड आघातातून हिमालय निर्माण झाला. विंध्य पर्वताच्या दक्षिणेचा भारत हा उत्तरेपेक्षा अधिक प्राचीन आहे तो याचमुळे. तेव्हापासून ही भूमी तिचं अस्तित्व राखून आहे. इथली सृष्टी उत्पत्ति-स्थिति-लय साऱ्यांतून पुन्हा पुन्हा आवर्तीत होतेय. मत्स्य-कूर्म-वराह करत मानव इथे उत्क्रांत होत गेला. प्रगत झाला. निरनिराळी साम्राज्ये स्थापली गेली, मोडून पडली.. किती हास्य, किती फुत्कार, किती अंगार, किती उल्हास या प्रवाहाने पाहिले असतील, वाहिले असतील. आज त्या दोघींच्या मनाच्या अवस्थाही  तो वाहत होताच की..

अंधार पडायला लागला तशा दोघी माघारी फिरल्या. एक वेगळाच चिरंतन अनुभव गाठीशी बांधून. गोकाक-हुबळी रोड त्यांची वाट पाहतच होता..

जीपीएस ने दाखवल्याप्रमाणे त्यांनी गोकाक-हुबळी स्टेट हायवे धरला. सात वाजून गेले होते. अंधार दाट व्हायला लागला होता. रस्ता चांगला होता पण दोघींसाठी तसा नवीनच. रस्त्यावरच्या पाटयाही आता बऱ्यापैकी कन्नड मधूनच दिसत होत्या. त्या आणि तिथली कन्नड बोलणारी माणसं पाहून संहिताला लहानपणी ती जालन्याला असताना शेजारी राहणाऱ्या कानडी प्रभा काकू आठवल्या. त्यांचं कानडी मिश्रित मराठी तिला फार गोड वाटायचं. आणि त्यांच्या घरी गेल्यावर कानावर पडणारी ती अस्सल कन्नड भाषाही. उन्हाळ्याच्या दिवसात प्रभा काकू कैरीचा कायरस बनवायच्या. तो संहिताला प्रचंड आवडायचा. तो बनवला की दरवेळी त्या संहितासाठी थोडा नक्की आणून द्यायच्या. नुसत्या आठवणीनेही ती चव संहिताच्या जिभेवर रेंगाळू लागली. प्रभा काकूंपासून सुरू झालेला तो आठवणींचा रस्ता पुढे तिचं बालपण, आई-बाबांचं व्यवसाया निमित्ताने सतत शहरं बदलण, तेव्हाची हलाखीची परिस्थिती, नंतरचं आईचं आजारपण, त्यातूनही आईने तिच्या शिक्षणाला आणि करियरला दिलेलं

प्रोत्साहन, बाबांचा पाठिंबा आणि मग काळीज पोखरवून टाकणारं आईचं जाणं, आणि त्यानंतरची पोकळी इथपर्यंत येऊन पोचला. नकळत तिच्या डोळ्यात पुन्हा पाणी दाटलं. पण निकराने ते तिने पुसलं. आणि पुन्हा लक्ष समोरच्या अंधाऱ्या पण का कोणास ठाऊक आता उगाच ओळखीच्या वाटू लागलेल्या त्या रस्त्यावर केन्द्रित केलं.

दिवसभरात दोघींचं मन जरी हलकं झालेलं असलं तरी शरीर आता थकलं होतं. गोकाक-हुबळी जवळपास तीन तासांचा प्रवास होता. ट्रॅफिक कमी आणि संहिताचा वेग पाहता त्या अडीच तासात पोचतील असं वाटत होतं. रिया जागं राहण्याचा आटोकाट प्रयत्न करत करत पेंगत होती. इतक्यात तिच्या फोनची रिंग वाजली. ती दचकूनच जागी झाली. नंबर अनोळखी होता. झोपेतच तिने तो रिसीव्ह केला आणि 'हॅलो..' म्हटलं..

"हॅलो.. रिया सामंत?" अनोळखी आवाज.

"येस.. कोण बोलतंय?" रियाने जांभई मॅनेज करत विचारलं.

"हाय, मी अनुराग. अनुराग राव." अतिशय शांत पण तितकाच भारदस्त आवाज.

"अनुराग?"

रियाच्या डोक्यातली ट्यूब पेटली. आईने सकाळी सुचवलेलं 'स्थळ'! तिने संहिता कडे पाहिलं. दोघींच्या भुवया उंचवल्या होत्या. रिया जवळपास ब्लॅंक होती. तिला समजेचना काय बोलावं.

"ओह येस.. हाय अनुराग!" शक्य तितक्या मृदु आवाजात बोलण्याचा तिने प्रयत्न केला. संहिता तिचा गोंधळ पाहत होती. आणि हसू दाबतही होती.

"सो.. कधी भेटूया आपण?" त्याने सरळ विषयालाच हात घातला.

रिया पुन्हा ब्लॅंक.

"हॅलो.. यू देअर?" पुन्हा शांत आणि वजनदार आवाज.

रिया तिच्या गोंधळातून बाहेर आली. आणि काही विचार न करता म्हणाली,

"भेटूया ना.. उद्या चालेल?"

आता संहिता ब्लॅंक झाली. तिने प्रश्नार्थक नजरेने रिया कडे पाहिलं. रियाने तिच्याकडे पाहत डोळे मिचकावले.

"उद्या.. let me see.. ok fine. कुठे भेटायचं?" अनुराग.

"हम्पी.. at 6 pm शार्प!" रिया म्हणाली.

संहिताला आता हसू आवरेना.

“हम्पी?” त्याचा आवाज जरासा curious झाला.

“येस! Any problem?” रियाने त्याची फिरकी घ्यायचा चंगच बांधला.

“हम्म.. नॉट रियली! ग्रेट चॉइस ऑफ अ प्लेस बाय द वे..”

तितक्याच शांत आवाजात रीप्लाय आला आणि पलिकडून फोन कट झाला.

रियाने गोंधळून फोनकडे पाहिलं.

“काय गं काय झालं?” संहिता ने विचारलं.

“अगं माहित नाही. फोन कट झाला. की कट केला देव जाणे..” रिया.

“हाहा.. बिचारा!”

“anyways, भेटून नाही म्हणण्यापेक्षा बरं नाही का हे. जाऊदे बरच झालं कट झाला.” रिया स्वत:चच समाधान करत पुटपुटली.

रियाने मग हुबळी मधलं एक चांगलं हॉटेल सर्च करून बूक केलं.

गप्पा, गाणी, बाहेरची शांतता आणि अंधार यांच्या जोडीने त्यांचा प्रवास थोड्याशा धाक-धुकीने पार पडला.

बरोबर 9.35ला संहिताने हुबळीमधल्या त्यांच्या नियोजित हॉटेल समोर गाडी पार्क केली. आणि त्या आत गेल्या. दिवसभराच्या थकव्याने बाकी कशाचाही विचार करण्यास त्यांना फुरसत दिली नाही. थोडं काहीतरी पोटात ढकलून त्या कधी झोपेच्या आधीन झाल्या त्यांचं त्यांनाही समजलं नाही.

दुसऱ्या दिवशी सूर्योदया पूर्वीच त्यांनी हॉटेल सोडलं. मार्चचे दिवस असल्याने हवेत तितकासा गारवाही नव्हता. आणि गूगल मुळे कुठे कोणाला रस्ता विचारत बसण्याचीही आवश्यकता नव्हती. हुबळी पासून पूर्वेकडे 167 किमीवर हम्पी आहे. 3-4 तासांचा प्रवास. रिया ड्रायविंग सीटवर बसली होती. हुबळीहून निघून हायवे लागेपर्यंत रस्ता थोडाफार खराब होता. ती अतिशय काळजीपूर्वक गाडी चालवत होती. अजून उजाडलं नसल्याने रस्त्यावर बऱ्यापैकी अंधार होता.

“रिया, आपण निघालोय खऱ्या. पण व्हॉट इज धिस हम्पी ऑल अबाऊट?” संहिता उत्सुकतेने म्हणाली.

“हम्पी.. खूप मोठा इतिहास आहे या ठिकाणाचा. रामायणा मधली किष्किंधा नगरी ती हीच. सुग्रीव आणि वाली चं राज्य. श्रीराम आणि हनुमानाची प्रथम भेट इथेच झाली. त्यानंतर मध्ययुगात हरिहर आणि बुक्क राय या दोन संगम वंशीय भावांनी मिळून इथे विजयनगर साम्राज्य उभं केलं. ते जवळपास तीन शतकं टिकलं. विजयनगर त्याच्या भरभराटीच्या उच्चांकावर असताना जगातलं बीजिंग नंतरचं सर्वात मोठं शहर होतं. तिथलं आर्किटेक्चर, जॉग्रफी सगळंच खूप वेगळंए नि अद्भूत आहे. 1986 मध्ये हम्पीला यूनेस्को साइटचा दर्जा मिळालाय. मी इतके दिवस फक्त वाचत आलेय या सगळया विषयी. पाहण्याची प्रचंड उत्सुकता आहे आता.” रिया म्हणाली.

“हम्म.. हिस्टरी ऑप्शनल हं? ग्रेट.. पहायला हवं मग.” संहिताने आधी रियाकडे आणि मग खिडकी बाहेर पाहत म्हटलं.

रस्ता मागे पडत होता.. मिट्ट काळोख जाऊन प्रकाश हळूहळू त्याचे पाय पसरत होता. कुठल्याही क्षणी सूर्योदय होईल अशी वेळ. सरळसोट रस्ता. दख्खनचं विस्तीर्ण पठार. जगातल्या सर्वात जुन्या आणि स्थिर भूभागांपैकी एक. आजूबाजूला थोडीफार शेती. समोर निमुळता होत गेलेला रस्ता. आणि तो जिथे बिंदुप्राय दिसत होता ते क्षितिज. सगळंचं डोळयांच्या कक्षेत.  श्रेया घोशाल तिच्या

अतिमधुर आवाजात ‘ओ आकाश, ओ पोलाश.. राशि राशि..’ म्हणत असतानाच बरोबर समोर पूर्व क्षितिजावर रस्त्याच्या किंचित उजवी कडे सूर्योदय झाला. सूर्याचं पिवळट केशरी बिंब क्षितिज रेषेच्यावर अवतीर्ण झालं. दोघी क्षणभर पाहतचं राहिल्या. सूर्योदय ही खरंतर रोज घडणारी घटना. पण ती आज, इथे, अशी अनुभवताना दोघींची मनं एकदम उन्मिलित झाली. आजचा सूर्योदय त्यांना कुठल्याशा खिडकीतून, घरातून, गच्चीवरून, बिल्डिंगच्या आडून, डोंगरा मागून वगैरे ‘दिसत’ नव्हता. तर तो अगदी सरळ रेषेत, समोर ‘घडत’ होता. मध्ये क्षितिजापर्यंत पसरलेली सपाट जमीन फक्त. झाडंही अगदी विरळ.

रियाने एक चहाची टपरी पाहून गाडी बाजूला घेतली. दोघींनी बरेचसे फोटोज क्लिक केले. आणि मग चहा घेत घेत तो सूर्योदय celebrate केला.

गाडीच्या bonnet वर एका हातात चहाचा कप घेतून बसत संहिता ने रियाला विचारलं,

“मग, मॅडम काय विचार आहे..”

“गाडी मीच चालवणारे.. तू विचार पण करू नकोस.” गरम चहा फुंकत रिया म्हणाली.

“अगं बावळट, त्या कालच्या अनुराग विषयी बोलतेय मी..” संहिता.

“ओहह.. त्यात काय विचार करायचाय. तो माझ्यासाठी विषयच नाहीये. माझे तीन attempts बाकी आहेत अजून. सो लग्नाचा विचार अजिबातचं नाही..

.. हम्म आईच्या फोनची वाट बघतेय बघ मी. त्या अनुराग ने कालचा प्रकार नक्कीच सांगितला असणार घरी. आता मातोश्री माझी शाळा घेणार कन्फर्म.”

दोघींनी हसत एकमेकिना टाळी दिली.

“ए पण काका-काकू तुला प्रिपेर करू नको असं कुठे म्हणतायत. लग्न करून कर इतकंच म्हणतायत ना.. मग एकदा विचार तरी कर की..” संहिता ने तिचा पॉइंट लाऊन धरला.

“seriously? हे तू बोलतेयस? तुला वाटतं लग्न झाल्यावर त्या सगळ्या responsibilities सांभाळत मला अभ्यास करता येईल?”

“का नाही? हू नोज.. तुझं हे passion समजून घेणारा कोणीतरी भेटेल तुला..” संहिता.

यावर तिच्याकडे मिश्किल हसून पाहत रिया म्हणाली,

“हाहा.. fantasies!”

आणि मग यावर दोघी हसल्या.

“आपलं आयुष्य, स्वप्नं ही त्या unknown would be partner वर किती depend असतात ना.. कळत-नकळत..”

संहिता तिच्याच विचारात हातातल्या चहाच्या रिकाम्या कप कडे पाहत म्हणाली.

“हो. पण आपली स्वप्नं, तो अनोळखी होऊ घातलेला सहचर यांना निवडण्याचं स्वातंत्र्य आपल्याकडे आहे की. कित्येकींकडे तेही नसतं. आपल्याकडे आशा आहे.. शक्यता आहेत.. बरंच काही आहे. लेट्स लुक ॲट द brighter साइड..”

उगवत्या सूर्याकडे पाहत रिया म्हणाली.

संहिताला कालच्या पेक्षा आजची रिया नक्कीच वेगळी वाटली. बदललेल्या वातावरणाचा परिणाम की आणखी काही माहीत नाही..

दोघींनी मग पुढचा प्रवास सुरू केला.

सूर्य हळू हळू डोक्यावर चढू लागला. सकाळी अकराच्या आसपास त्या होस्पेटजवळ पोचल्या. रस्ता अतिशय सुंदर होता.. तुंगभद्रा नदीचं दर्शनही झालं..

आजूबाजूचा परिसर आता हम्पी जवळ येऊ लागल्याचं निदर्शित करत होता. अजस्त्र आकाराचे पाषाण मधूनच कुठेतरी स्वागताला उभे दिसत होते..

दोघींच्या मनात आता प्रचंड उत्सुकता दाटली होती. तेवढ्यात समोर हम्पी मध्ये येणाऱ्यांचं स्वागत करणारी एक मोठी कमान दिसली. त्यावर कन्नड मध्ये काहीतरी लिहलेलं होतं.

कमानीतून आत वळत दोघींनी फायनली हम्पी मध्ये प्रवेश केला तेव्हा घड्याळात साडे अकरा वाजले होते.

.....

काही प्रवास, काही ठिकाणं आपल्या मनाला अगदी ताजं-तवानं करतात. तसं काहीसं वाटतंय आज इथे येऊन. काहीतरी मिळवायचं म्हणून डोळ्याला झापडं लाऊन पळत असतो आपण नुसते. एकेक गोष्ट मिळतही जाते. काही सुटतात देखील. आई गेली तेव्हा वाटलं आता संपलं सगळं.. सगळं शून्य आहे तिच्याविना.. तिच्याविना मी? छे! कल्पनाही करवत नव्हती. धावत येऊन बिलगायला, ए आई म्हणून हाक मारायला आता कोणीही नाही या जाणिवेनेच अंगावर काटा आला होता. ती आहे किंवा होती ही

कल्पनाच मनाला किती आधारभूत वाटायची. कुट्ट काळ्या रात्री कुशीत शिरण्याचं हक्काचं ठिकाण! आणि ते आता यापुढे कधीही नसणार होतं. कसली जीवघेणी पोकळी. तिचं नुसतं बिछान्यावर पडून असणंही दिलासादायक होतं. बाहेरच्या जगात पेललेले सगळे घाव तिच्यासमोर नकळत भरले जायचे. आता ते कसे भरायचे? दरवेळी ही अशी पाठ फिरवून निघून तर येऊ शकत नाही मी. कुठून आणि कसं आणायचं बळ अशावेळी.

आई, तू काय करायचीस गं अशा अवघड वेळा आल्यावर.. तू तर किती कशातून गेलीस. किती कष्ट. किती जखमा. कसं पेललंस सगळं? इतरांकडे न पाहता अतिशय तुटपुंज्या मिळकतीत स्वाभिमानाने जगणं, ठरलेल्या मोजक्या साड्यांवर स्वत:ची सगळी हौस भागवण, मुलांनी अमुक-अमुक गोष्ट मागितली आणि आपण ती त्यांना देऊ शकत नाही ही वेदनामय जाणीव कडू औषधा प्रमाणे गिळून टाकणं.. आपल्या नवऱ्याला कुणी टाकून बोललं तर काय वेदना होतात याची कल्पना मी आता करू शकते. वसमतला आजीकडे गेल्यावर तुला ते दरवेळी ऐकावं लागायचं. खाली मान घालून. आर्थिक परिस्थिति चांगली नसल्याने नातेवाईकांमध्ये मिळणारी दुय्यम वागणूक.. वर जिथे जाऊ तिथे अखंड कष्टांची अपेक्षा.. आणि ते तू करायचीस देखील. सगळं कसं गं सोसलंस आई? कुठून आणायचीस बळ. विचारलं तर म्हणायचीस

‘तुझ्याकडे आणि चिंटूकडे पाहिलं की आपोआप शक्ति येते बघ सारं सोसण्याची. आणि तुझे बाबा आहेतच की माझा भार हलका करायला. एकटी कुठेय मी!’

माझं आयुष्य तुझ्या मानाने बरंचसं सुकर आहे. तुझ्याच कष्टामुळे. तू मला ‘मी’ बनवलंस. पण येणाऱ्या प्रत्येक अवघड परिस्थितीला सामोरं जाण्यासाठी जे बळ लागतं ना ते नाहीये गं माझ्यात अजून.. आई झाल्यावर येतं का ते? मी ‘आई’ होऊ शकत नाही म्हणाल्या डॉक्टर. तेव्हा आत जरासं काहीतरी हललं होतं, पण फार विशेष असं काही वाटलं नाही. आता उगाच हुरहूर वाटतेय. कठीण क्षण पेलायला, भार हलका करायला हवंच असतं का कोणीतरी.. एकटीने जमू नाही शकत सगळं? की सवयीने जमायला लागेल?

संहिता.

हम्पी.

.....

संहिता ने डायरी मिटली.

त्यादिवशी दुपारी हम्पी मधल्या ठरलेल्या हॉटेलमध्ये पोचल्यावर दोघींनी आधी भरपेट जेवण केलं. जेवण झाल्यावर

रिया आजूबाजूचा परिसर पहावा म्हणून बाहेर पडली. संहिता मात्र थकल्याचं कारण सांगत रूम मध्येच थांबली. कालपासून सुरू असलेले मनाचे सारे चढ-उतार.. थोडसं स्वत:पाशी बसून साऱ्याची मनात ओळ लावायची तिला कदाचित निकड वाटत असावी. थोड्यावेळाने डायरी बाजूला ठेवत ती तशीच बेडवर आडवी झाली. नंतर कधीतरी तिचा डोळा लागला.

हम्पी मधले छोटे छोटे रस्ते. साधं खेडंच ते. पर्यटकांमुळे ठिकठिकाणी घरगुती हॉटेल्स, खानावळी दिसत होत्या. पाय फुटेल तिकडे रिया चालत जात होती. हातातल्या मोबाइलवर हम्पीचा नकाशा होता. विरुपाक्ष मंदिर.. मातंग हिल.. हम्पी बाजार.. विठ्ठल मंदिर.. सगळ्या खुणा आणि ठिकाणं त्यावर दिसत होती. ती तिच्यापासून हाकेच्या अंतरावर होती. इतिहासाचा अभ्यास करताना तिने या सगळ्या विषयी वाचलं होतं. इतिहास तिच्या आवडीचाच विषय. हम्पी विषयी वाचताना तिला कायम या ठिकाणाचं आकर्षण वाटत आलेलं होतं. पण आज उगाच मनात एक व्यर्थ पोकळी दाटली होती. काल रिजल्ट पाहिल्यावर आधी मन सुन्न झालं होतं. आणि नंतर शरीरासोबत मनालाही तिने वाहणाऱ्या वाऱ्यावर झोकून दिलं. त्यामुळे जरासं हलकं वाटायला

लागलं होतं. पण आता डोक्यावर चढलेल्या सूर्यापूढे स्वत:ची विरलेली सावली तिला पुन्हा जमिनीवर घेऊन आली. आणि वर्तमानाची जड जाणीव पुन्हा जोर धरु लागली. जो अभ्यास केलाय, जो मार्ग निवडलाय तो विफल तर ठरणार नाही ना असं वाटणारी मन:स्थिती.. अस्थिर, अधांतरी भविष्य.. स्वप्न अगदी हातात येता येता हातातून निसटलं होतं. ज्या आयुष्याची कल्पना केलीये, स्वप्न पाहिलंय ते तसं नाही घडलं तर? तडजोडी कराव्या लागल्या तर? पोटात गोळा आणनारी अनाम भीती मनात दाटत होती. पण, 'नाही. या स्वप्नाशी मी तडजोड करू शकत नाही', मनातल्या मनात तिने पुन्हा स्वत:लाच ओरडून सांगितलं. रस्त्या शेजारच्या एका अजस्त्र पाषणाला टेकून ती उभी राहिली. तिला पुढे जावसं वाटेना. मनाला आणि शरीरालाही मरगळ आल्यासारखी वाटली. बराचवेळ नुसतंच फिरून ती हॉटेलवर परतली आणि संहिताच्या बाजूला तिनेही अंग टाकलं.

दोन एक तासांनी तिला जाग आली तेव्हा संहिता फोनवर काहीतरी करत बसली होती. तोंडावर गार पाण्याचा भपकारा मारून रिया तिच्या शेजारी येऊन बसली.

"फीलिंग बेटर?" संहिताने विचारलं.

“हम्म.. थोडंफार..” रिया डोळ्यांभोवतीची काळी वर्तुळं आरशात पाहत म्हणाली.

“चल फिरून येऊ थोडसं. एखादं मंदिर वगैरे पाहू. बाकीचं उद्या. असंही पाच वाजत आलेयत.” संहिता घड्याळाकडे पाहत म्हणाली.

“हो.. चल. कोणतं मंदिर बघायचं? विरुपाक्ष?” रिया.

“नाही.. ते दगडी रथ असलेलं मंदिर कोणतं? ते पाहू. मी पाहिलंय ते फोटोजमध्ये.”

“विठ्ठल मंदिर.” रिया जॅकेट अडकवत म्हणाली.

“हम्म.. तेच ते..” संहिताने शूज चढवले.

दोघी रस्ता विचारत विचारत विठ्ठल मंदिरात येऊन पोचल्या. डोळ्यांचं पारणं फेडणारं ठिकाण. विकल उद्ध्वस्त पाषाण सौंदर्य! ठिकठिकाणी जुन्या ऐश्वर्याच्या खूणा वाहणारा परिसर. मंदिराच्या अगदी मधोमध उभा पाषाण रथ. ज्याच्याकडे पाहून आपल्या इतिहासा विषयी अभिमानाने उर भरून यावा. त्या सरून गेलेल्या काळाविषयी कुतूहल, उत्सुकता वाटत रहावी. दोघी काही न बोलता ते भव्य मंदिर न्याहाळत राहिल्या किती तरी वेळ.. संध्याकाळची सोनेरी किरणं पडू लागली तसं ते भग्न सौंदर्य

आणखी खुलायला लागलं. सभामंडपात खांबाला टेकून दोघी ती किरणं त्यांच्याही अंगावर घेत बसून राहिल्या. कॅमेरा बाजूला पडला होता. काही गोष्टी टिपता येत नाहीत. तसं काहीसं.

काहीवेळाने ती शांत तंद्री भंगत रियाच्या फोनची रिंग वाजायला लागली. तिने फोन घेतला.

"हॅलो, रिया?" थोडासा ओळखीचा वाटणारा शांत वजनदार आवाज.

"हो, बोलतेय.."

"हाय, मी अनुराग.."

रिया क्षणासाठी ब्लॅंक झाली. याने पुन्हा का फोन केला असं तिला वाटलं.

तो पुढे म्हणाला, "सो.. इट्स 6 पीएम शार्प! कुठे आहेस तू?"

रियाला काही कळेना.

"म्हणजे?"

"म्हणजे आपलं ठरलंय ना, 6 पीएम शार्प, अॅट हम्पी!"

"म्हणजे तू.. तू.. एक मिनिट कुठेयस तू?" रियाने गोंधळून विचारलं.

"हम्पी मध्ये." तितकाच शांत आणि पुन्हा वजनदार आवाज.

“काय?” आता शॉक व्हायची वेळ रियाची होती.

अनुराग खरंच हम्पी मध्ये आला होता.

तिने मग कसं बसं ती विठ्ठल मंदिरात असल्याचं त्याला सांगितलं. फोन कट झाला. रियाने संहिताकडे वळून बघितलं. फोनवरच्या संभाषणा वरुन तिला कल्पना आलीच होती घडल्या प्रकाराची. दोघी मग गोंधळून एकमेकींकडे पाहत राहिल्या नुसत्या..

“मी गमतीत जे सुचेल ते बोलले यार.. मला काय माहित हा इथे येऊन धडकेल!” रिया हताशपणे म्हणाली.

“मला तर जाम मजा येतेय.. हम्पी मध्ये ‘बघण्याचा’ कार्यक्रम! वाह.. इन केस तुमचं ठरलं ना तर मी हा किस्सा तुमच्या पोरांना रंगवून रंगवून सांगेन.” संहिता तिची मजा घेत म्हणाली.

“ए गप गं.. पोरं-बिरं काय. मला काही सुचत नाहीये इथे आणि तू मजा घे..”

“एव्हढं काय त्यात रिया. टेंशन काय घेतेयस तू. नुसतं भेटायला काय जातंय.

आणि मला काय वाटतंय सांगू, हा जो कोणी अनुराग आहे ना, त्याला तू जाम आवडलिएस. म्हणूनच डायरेक्ट इथपर्यंत येऊन धडकलाय तो.”

“अगं पण मला नाही करायचंय लग्न बिग्न!”

“कोणाला नाही करायचंय लग्न?”

दोघींनी मागे वळून पाहिलं. तिशीतला, जवळपास ‘हॅंडसम’ कॅटेगरी मध्ये मोडणारा तरुण दोघींकडे पाहत उभा होता.

“हाय.. मी अनुराग!” त्याने हात पुढे करत म्हटलं.

रियाने आवंढा गिळला. काहीतरी बोलायचं म्हणून मग संहिताच म्हणाली,

“हाय मी संहिता.. आणि ही..”

“रिया. आय नो. फोटो पाहिलाय मी.” अनुराग.

रियाने त्याच्याकडे पाहत एक जुजबी स्मित केलं. आणि गप्पच राहिली.

“सो आय गेस, लग्न न करण्याचा विषय चालू होता..” अनुराग मंदिराच्या पायरीवर बसत म्हणाला.

दोघींनी एकमेकींकडे पाहिलं. विषय कसा कुठून सुरू करावा रियाला प्रश्न पडला. आणि त्या दोघांमध्ये आपण नक्की काय

बोलायचं असा संहिताला. दोन मिनिटांच्या शांतते नंतर उठून उभी राहत संहिता म्हणाली,

“मला एक अर्जंट मेल करायचाय सो मी निघते आता.. यू गाईज कॅरि ऑन!”

पण, तिला नजरेनेच थांबवत रिया म्हणाली,

“कसला मेल? नंतर कर. बस.”

आणि मग काहीतरी विचार केल्या सारखी अनुराग कडे पाहत म्हणाली,

“अनुराग, सॉरी कालच्या प्रकारा बद्दल.. actually मी तुला कालच स्पष्टपणे सांगायला हवं होतं पण somehow मला ते जमलं नाही...”

“काय सांगायला हवं होतं, तुला लग्न करायचं नाहीये हे?” डोळ्यांवरचा goggle शर्टला अडकवत तो शांतपणे म्हणाला.

डोक्यात शब्दांची जुळवाजुळव करत रिया म्हणाली,

“तू गैरसमज करून घेऊ नकोस.. पण मला खरंच लग्न वगैरे करायचं नाहीये.. तू तुझा वेळ वाया घालवू नकोस.”

यावर अनुरागने क्षणभर रियाकडे पाहिलं. तिच्या चेहऱ्यावर मिश्र भाव होते. थोडासा गोंधळ, थोडं गिल्ट, थोडी भिती आणि

थोडी शंका. मग त्याने संहिता कडे पाहिलं. ती काही न बोलता खाली पाहत बसली होती. थोडावेळ विचार करून तो म्हणाला,

“आत्ता लग्न करायचं नाहीये, ‘माझ्याशी’ लग्न करायचं नाहीये, की लग्नच करायचं नाहीये?”

“सी इट्स नॉट अबाऊट यू.. मला ‘आत्ता’ लग्न करायचं नाहीये. तुला माहितीच असेल मी यूपीएससीची तयारी करतेय. कालच माझा रिझल्ट आलाय. and i could not make it through the interview. मी त्याच trauma मध्ये होते आणि आईने हे लग्नाचं वगैरे सुरू केलं. काही न सुचून मी सरळ निघून आले इथे. तुझ्याशी पण फोनवर नीट बोलले नाही..”

यावर काही न बोलता तो थोडावेळ शांत बसून राहिला.

ती अवघड शांतता विरघळवत संहिता म्हणाली,

“how did you manage to reach here so fast.. by air?”

“अम्म.. हो. उडून आलो!” किंचित हसून तो म्हणाला.

“तर तुला पुढे अभ्यास करायचाय. आणि म्हणून लग्न करायचं नाहीये.” रियाकडे पाहत तो म्हणाला.

“हो!”

“प्रेमात वगैरे पडलीस तरी नाही?” अनुराग.

“एक्सक्यूज मी..” रिया चमकून म्हणाली.

“यस.. तुला खात्रीये तू माझ्या प्रेमात पडणार नाहीस?”

मिष्किलपणे हसत त्याने वातावरण हलकं करण्याचा प्रयत्न केला.

यावर दोघी क्षणभर हसल्या.

हसणाऱ्या, ऊंच, किंचित सावळ्या पण रुबाबदार अनुराग कडे पाहत रियाने नकळत मनातल्या मनात स्वत:लाच विचारलं, ‘खात्री आहे?’

पण मग लगेच तिने तो विचार झटकून टाकला.

उठून उभं राहत, मंदिरावरून एक नजर फिरवत तो रियाला म्हणाला,

“frankly speaking, कालचं तुझं बोलणं ऐकून मला शंका आलीच होती, That you might not be interested.. but I don’t know why, in spur of moment I decided to come here and see you.. so I did. असो, तू स्पष्टपणे सगळं सांगितलंस, आवडलं मला.”

“look, I’m sorry.. I made you travel this far for nothing.”

“for nothing? Who told you that? माझा योगायोगांवर आणि आयुष्य नावाच्या unpredictable गोष्टीवर प्रचंड विश्वास आहे. Everything happens for a reason.

आता हेच बघ, या प्राचीन, सुंदर मंदिरात अशा एका सुरेख संध्याकाळी आपण तिघे एकमेकांना भेटणार आहोत हे काही दिवसांपूर्वी तुला कोणी सांगितलं असतं तर तू विश्वास ठेवला असतास का? But here we are..”

दोघींनी आधी एकमेकींकडे आणि नंतर त्याच्याकडे हसून पाहिलं..

“सो काय प्लान आहे आता तुझा?” रियाने विचारलं.

“लवकरात लवकर लग्न करणे इज द ओन्ली प्लान!” तो हसत म्हणाला.

“वेरी फनी! आता इथे काय प्लान आहे असं विचारतेय मी. थांबतोयस की जातोयस परत.”

“थांबतोय नक्कीच! असंही वीकएंड आहे. आणि मी कंटाळलो होतोच रूटीनला. हम्पी माझ्यासाठी थोडं स्पेशलही

आहे. I have been here for several times. लगेच निघून येण्यामागे हेही एक कारण होतं म्हणा."

"ओके. भेटून छान वाटलं..." उठून उभी राहत त्याच्याकडे आश्वस्तपणे पाहत रिया म्हणाली,

.. आम्ही निघतो आता."

तिच्या पाठोपाठ संहिताही उभी राहिली.

अनुरागने हसून त्यांचा निरोप घेतला.

त्याला बाय करून दोघी गाडीत बसल्या तेव्हा सूर्य मावळला होता..

त्यादिवशी संध्याकाळी मग इतर कुठेही न जाता दोघीही हॉटेलवर परतल्या. तिथेच जेवण केलं. सुरूवातीला संहिता झाल्या प्रकारावरुन रियाला चिडवत होती. पण नंतर तिच्या मूड कडे पाहून तिने ते सोडून दिलं. रियाच्या मनात संमिश्र भाव होते. अनुरागचं हे असं हम्पीला येणं, तिला भेटणं या साऱ्याने ती आत कुठेतरी सुखावली होती. पण मग आपल्याला असं काहीतरी वाटतय

याचाही तिला राग येऊ लागला. तिच्या मनाची ठाम समजूत होती, लग्न म्हणजे एंड ऑफ लाइफ! म्हणूनच ती त्या गोष्टीपासून स्वत:ला शक्य तितकं लांब ठेवण्याचा प्रयत्न करत होती. शेवटी, झोपेच्या आधीन होता होता तिने कधीतरी तो विषय डोक्यातून काढून टाकला. आणि सकाळी उठून आईला फोन करायचं ठरवलं.

इकडे संहिता पुन्हा डायरी उघडून बसली.

.....

Everything happens for a reason.. खरंय का हे? काही लोक अगदी कारण, संबंध नसताना आपल्या आयुष्यात येतात आणि खोलवर परिणाम करून जातात. आज त्या अनुराग कडे पाहिल्यावर अनिकेतची तीव्र आठवण आली. तो ही असाच poised, शांत, विचारी वगैरे पण तितकाच परिणामकारक. वर्माचीही बोलती बंद व्हायची त्याच्यापुढे. आमच्यात जे होतं ते विशेष होतं नक्कीच. मी घाई केली का? त्याला वेळ द्यायला हवा होता का थोडासा?

त्यादिवशी संध्याकाळी मला intuition होतंच की हा मला प्रपोज करणार. त्याने ते तसं केलंही. अगदी वेगळ्या पद्धतीने. पण मी काय केलं? मी सर्वात आधी त्याला माझी सगळी वैद्यकीय कथा ऐकवली. त्यावरच माझं मत आणि माझ्या आईपणाबद्दलचा मीच

घेऊन टाकलेला निर्णय सुद्धा. त्याच्या हावभावांवरून त्याला ते अगदीच अनपेक्षित होतं. पण विशेष धक्का बसल्या सारखा तो वागला नाही. माझ्या मनातली भिती, असुरक्षितता सारं कदाचित माझ्या बोलण्यातून बाहेर पडत असावं. थोड्यावेळाने मी शांत झाले. तो इतकंच म्हणाला की ‘या सगळ्याचा आत्ता विचार करण्याची गरज नाही. वेळ येईल त्यावेळी आपण बोलू यावर आणि मार्गही शोधू. हो एवढं नक्की, की तुला कुठल्याही प्रकारचा मानसिक अथवा शारीरिक त्रास मी होऊ देणार नाही.’ पण माझं या उत्तराने समाधान झालं नाही. मला त्याक्षणी त्याचा निर्णय हो किंवा नाही मध्ये हवा होता. पण एवढा मोठा निर्णय एका क्षणात कसा कोण घेऊ शकतो इतकी साधी गोष्टही मी गृहीत धरली नाही. ऑल थॅंक्स टू माय हार्मोनल इमबॅलेंस. मी चिडले. आदळ-आपट केली. आणि निघून आले. त्यानंतर त्याने बोलण्याचा प्रयत्न केला त्या त्या वेळी मी त्याला टाळलं.

आणि मग एक दिवस समजलं की त्याने जॉब स्विच केलाय. आता तो मला दिसणार नव्हता. आपल्यातलं न्यून समजल्यावर समोरची व्यक्ति आपल्याला सोडून जाणार हे मी माझ्या मेंदूत इतकं पक्कं केलं होतं की मला दुसरं काही दिसलंच नाही. समोरच्या व्यक्तीलाही काही बाजू असू शकते, ती आपणही समजून घ्यायला हवी हे अजिबात जाणवलं नाही. मी माझ्याच चौकटीत अडकून

राहिले. आज इथे मनावरचे इतर मळभ पुसट होत असताना या सगळ्याची जाणीव होतेय.

बोलावं का एकदा त्याच्याशी? Maybe परत गेल्यावर..

संहिता.

हम्पी.

.....

दुसऱ्या दिवशीची सकाळ लख्ख होती. दोघींचं सूर्योदय पहायला मातंग हिलवर जायचं आधीच ठरलेलं होतं त्याप्रमाणे त्या लवकर येऊन पोचल्याही होत्या. एकमेकांचा तोल सांभाळत निश्चळ उभे अचाट पाषाण आणि त्यांनी भरलेली ती टेकडी एक वेगळाच दृक-चेतन अनुभव देत होती. खालून अनिमिषपणे वाहणारी तुंगभद्रा मनाला प्रवाहीत करत पुढे जात होती. अब्जो वर्षं झीज झालेल्या पूर्वीच्या एका अखंड पर्वताचं हे आजचं रूप.. अस्ताव्यस्त पसरलेले झिजून विलग झालेले पाषाण. पलिकडून उगवू पाहणारा सूर्य त्या सगळ्या काळाचा साक्षी होता.

तो उगवता सूर्य आणि आजूबाजूचं ते विहंगम दृश्य पाहत दोघी एका भल्यामोठ्या दगडाला टेकून बसल्या. छोटे, मोठे असंख्य दगड दृष्टिक्षेपात.. सगळे एकमेकांना बॅलेन्स करत स्थिर होते. एकटा दगड इथे खूप काळ टिकून राहू शकला नसता.. त्याला तोलण्यासाठी, स्थिर ठेवण्यासाठी इतरांची मदत होत होती.. आयुष्याचंही असच असतं नाही का.. थोडा आधार देत, थोडा आधार घेत ते जगायचं असतं.

दोघी आपल्याच विचारात मग्न होत्या. इतक्यात त्यांच्या कानांवर आवाज पडला,

“तुमची खात्री आहे, तुम्ही माझा पाठलाग करत नाही आहात?”

दोघींनी मान वळवून बाजूला पाहिलं तर, तिथे गळ्यात कॅमेरा अडकवलेला आणि एका हाताने बॉटल उघडून पाणी पिणारा अनुराग दिसला.

त्याला तिथे पाहून रिया आधी चमकली आणि मग “स्वप्न बघ तू.” असं स्वत:शीच पुटपुटली..

“जोक! पण मला तरी आता असं वाटायला लागलंय की तू नक्की रियाचा पाठलाग करतोयस.” संहिता त्याला म्हणाली.

यावर डोळे मिचकावत तो म्हणाला,

“माझी तर तीच इच्छा आहे. त्यासाठी तर आलो इतका दूर. पण मॅडमना नकोय आमचा पाठलाग.. सो काय करणार..”

यावर चिडून दोघांकडे एक कटाक्ष टाकत रिया,

“चालूद्या तुमचं.. मला यात काडीचाही इंट्रेस्ट नाही” म्हणत तिथून उठून गेली.

तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत अनुराग संहिताला म्हणाला,

“ही कायम अशी वैतागलेली असते का? की हा माझा स्पेशल इफ्फेक्ट आहे?”

“हाहा.. मला तुमच्या दोघात ओढू नका बाबांनो.” संहिता हसत म्हणाली.

तिच्या बाजूच्या दगडाला टेकून बसत चेष्टेच्या सुरात तो म्हणाला,

“बाय द वे.. तुझं पण असंच आहे का.. लग्न करायचं नाही अँड ऑल अजेंडा?”

यावर ती जराशी शांत झाली. आणि मग विषय बदलत म्हणाली,

“तुला लग्न सोडून दुसरं काही सुचतच नाही वाटतं!”

“हाहा.. हो. सध्यातरी नाही. मला करायचंय बाबा लग्न. एकटं जगण्यात काही अर्थ नाही.”

यावर ती काही बोलणार इतक्यात संहिता कुठे राहिली बघायला रिया पुन्हा तिथे आली आणि त्यांचा चाललेला विषय पाहून हाताची घडी घालून दोघांकडे पाहत उभी राहिली. त्या दोघांनी तिच्याकडे पाहिलं. आणि मग मिंटाच्या शांततेनंतर तिघेही एकमेकांकडे पाहून हसले.

तिच्याकडे पाहत अनुराग म्हणाला,

“बरं, मी काय म्हणतो, मला इथली एक मस्त जागा माहितीये.. लंच करूया का सोबत?”

यावर संहिताने रियाकडे पाहिलं. रिया शांत.

“बघा विचार करा.. यू विल रिग्रेट इट.. अगदी authentic food असतं तिथे.” अनुराग पुढे म्हणाला.

पुन्हा संहिता ने रिया कडे पाहिलं. रिया पुन्हा शांत.

“प्लस मला कन्नड येतं..” अनुराग खिंड लढवतच होता..

मग दोघांकडे पाहून रिया हसून म्हणाली,

“ओक्के.. ठीक आहे.”

आणि मग अनुरागकडे पाहत म्हणाली,

“एका अटीवर.”

“कोणत्या?” अनुराग.

“नो फ्लर्टिंग आणि नो लग्नाचा विषय!”

यावर डोकं खाजवत तो म्हणाला,

“ते.. जरासं अवघड आहे..”

रियाने मान वाकडी करून त्याच्याकडे पाहिलं,

“ओके फाइन.. मान्य!” अनुराग शांतपणे हसत म्हणाला..

दुपारी अनुराग ने सांगितलेल्या ठिकाणी दोघी येऊन पोचल्या. पण, तिथे गेल्यावर आपण पत्ता चुकलो तर नाही ना असा संशय त्यांना येऊ लागला. कारणही तसंच होतं. त्या दोघी साहजिकच एखाद्या रेस्टोरंटची कल्पना मनात ठेऊन आलेल्या. पण समोर त्यांना दिसत होतं एक साधं झोपडी वजा घर, गेरुने रंगवलेलं. दारापाशी त्या जराशा घुटमळल्या. पण मग गाडीतून उतरून येत असलेला अनुराग दिसल्यावर त्यांचा जीव भांड्यात पडला.

“हे काय, अशा बाहेर का उभ्या आहात? चला की आत.” तो शूज काढत म्हणाला.

इतक्यात घरातून एक सत्तरीच्या आसपासच्या आजीबाई बाहेर आल्या. त्या दिसताच अनुराग “अम्मा..” म्हणत लगबगीने त्यांच्यापाशी गेला आणि त्याने त्यांना मिठी मारली. पुढचे संवाद कन्नड मध्ये झाले. ते या दोघींना ओ की ठो समजले नाहीत. चालू प्रकार त्या निव्वळ पाहत उभ्या होत्या. अनुराग मध्येच रियाकडे बोट दाखवत त्यांना काहीतरी म्हणत होता. त्या आजी त्यावर गोड हसत होत्या. आता मात्र त्या सडपातळ, काटक बांध्याच्या, सावळ्या, बुटक्या पण अतिशय लाघवी आणि गोड आजीबाई कोण असा प्रश्न त्या दोघींना पडायला लागला.

त्यांचं बोलणं झाल्यावर रिया आणि संहिताकडे पाहून त्या आजीबाई

“आओ, आओ..” असं मोडक्या हिंदीत म्हणाल्या.

त्या, त्यांच्या पाठोपाठ अनुराग आणि या दोघी मग आत गेल्या.

साधीशी बैठक होती. तिथेच बाजूला पाट, चौरंग, त्यावर केळीची पानं अशी जेवायला वाढायची व्यवस्था केलेलीही दिसत होती.

दोघी बैठकीवर बसल्या. आजींनी पाणी वगैरे दिलं आणि अनुराग शी काहीतरी बोलून त्या आत गेल्या.

दोघींच्या नजरा आता प्रश्नांनी भरल्या होत्या. त्यांची उत्सुकता आणखी न ताणता पाण्याचा पेला बाजूला ठेवत अनुराग म्हणाला,

“ही कुमूद आजी.. मी तिला अम्मा म्हणतो. ही यांची घरगुती खानावळ आहे. या आणि यांचा नातू मिळून चालवतात. माझ्या सारख्या येण्या-जाण्या मुळे आता आमची चांगली ओळख झालीये. हम्पी मध्ये आलो की मी इथेच जेवतो. अतिशय रुचकर आणि authentic स्वयंपाक करते अम्मा. तुम्ही बोटं चाखत राहाल..”

शक्यतो पहिल्या भेटीत ऐश्वऱ्याचा, रुबाबाचा भडिमार करणारे तरुण ठावूक होते. पण अनुरागचं वागणं त्यांना वेगळं वाटलं. पाहूया काय प्रकार आहे म्हणत दोघींनी मग माना डोलावल्या.

एकेक करून मग अम्मा आणि त्यांच्या नातवाने अतिशय सुंदर रित्या पानं वाढली. बसायला पाट ठेवलेले होते. त्यासमोर चौरंगावर केळीच्या पानामध्ये जेवण वाढलं होतं. तिघेही त्यांच्या त्यांच्या पानांवर बसले. चित्रान्न, गाजराची हिंग-कढीपत्त्याची फोडणी देऊन केलेली कोशिंबीर, पातळ-पातळ पोळया, सांबार, कैरीचा कायरस, कर्नाटकी पद्धतीने केलेली दुधीची भाजी आणि

हातांवर केलेल्या शेवयांची स्वादिष्ट खीर असा तसा पहायला अतिशय साधा मेनू होता. पण, एकेक पदार्थाची चव घेतल्यावर त्यांना कळलं अनुराग अम्माचं इतकं कौतुक का करत होता ते.. रसना तृप्त करणाऱ्या चवींनी त्यांचं पान भरलं होतं. गाजराची साधी किसून केलेली कोशिंबीरही इतकी चविष्ट लागू शकते? दोघी बोटं चाटत राहिल्या. पानात वाढलेला कायरस पाहून संहिता तर आधीच excite झाली होती. ती चव तिने पुन्हा पुन्हा जीभेवर घोळवली. आणि शेवयांची खीर? त्यात या अम्मांनी काय घातलं होतं देव जाणे पण इतकी सुरेख मधुर खीर या आधी कधीच खाल्ली नसल्याची कबुली दोघींनी दिली. अम्मा शेजारीच सारे पदार्थ घेऊन वाढायला बसल्या होत्या. त्यांनी आग्रह करून करून तिघांना यथेच्छ जेऊ घातलं. भाषा कळत नसली तरी त्यांचं अगत्य आणि प्रेम दोघींना जाणवत होतं.

जेवण झाल्यावर अम्मांशी थोड्या गप्पा मारून तिघे बाहेर पडले. पंचतारांकित गोष्टी हाताशी असताना अनुरागचे असे मातीत घट्ट रोवलेले पाय पाहून रिया दाखवत नसली तरी नक्कीच प्रभावित झाली होती. तो अम्मांशी ज्या विलक्षण सलगीने, आस्थेने वागत होता त्यावरून त्याच्यातले माणूस म्हणून असलेले गुण तिच्या नजरेतून सुटले नाहीत.

“जेवण खरंच अप्रतिम होतं. या चवी मी कधीच विसरणार नाही.” संहिता म्हणाली.

“..आणि तुम्हाला यायचं नव्हतं.” अनुराग रियाकडे पाहत म्हणाला.

“टोमणे पुरे.. जेवण खरंच छान होतं. थॅंक यू..” रिया शांतपणे म्हणाली.

“बाय द वे अनुराग, तू रियाकडे बोट दाखवत अम्माच्या कानात काय खुसुर-फुसुर करत होतास रे?”

संहिताने औत्सुक्याने विचारलं.

“हाहा.. ते आमचं सीक्रेट आहे.” तो मंद हसत म्हणाला.

हम्पी पाहत पाहत मग ते बराच वेळ फिरले. चर्चा-गप्पा-चेष्टा-मस्करी आणि प्रेक्षणीय हम्पी.. त्यांचा वेळ कसा गेला त्यांचं त्यांना समजलं नाही.

सरतेशेवटी विरुपाक्ष मंदिरात दर्शन घेऊन रिया आणि अनुराग बाहेर चौथऱ्यावर येऊन बसले. संहिता काहीतरी खरेदी करण्यासाठी म्हणून तिथले स्टॉल धुंडत होती.

मंदिराच्या कळसाकडे पाहणाऱ्या रियाला अनुराग म्हणाला,

“मग.. आता पुन्हा अभ्यास का..”

नजर त्याच्याकडे वळवत रिया म्हणाली,

“हो..”

दोघांनी एकमेकांकडे पाहून हलकसं स्मित केलं. रिया बोलायला लागली.

“सिविल सर्विसेसची तयारी करायची म्हटल्यावर अपयशाची तयारी ठेवावीच लागते. खचून चालत नाही.”

“हम्म.. हे आयुष्या बाबतीत पण खरं आहे.” अनुराग.

“म्हणजे?”

“म्हणजे, हेच बघ ना तू मला नाही म्हणालीस.. पण मी खचलो का? माझे प्रयत्न चालूच आहेत..”

अनुराग हसत म्हणाला.

“हाहा. हो का.. अनुराग तो विषय नको. आपलं ठरलंय ना.”

हसणाऱ्या गव्हाळ रंगाच्या रियाकडे तो क्षणभर पाहतच राहिला. वाऱ्यावर तिचे केस उडत होते. त्यांना सावरत सावरत बोलण्याचा तिचा यत्न त्याला अजूनच सुंदर वाटायला लागला.

तसाच तिच्याकडे पाहत तो म्हणाला,

“तुला वाटतं, मी तुझ्या स्वप्नांच्या आड येईन?” त्याच्या डोळ्यात चमक होती.

रिया काही न बोलता शांत राहिली.

“असे, चर्चा न करता, समोरच्याला संधी न देता एकतर्फी निर्णय घेऊ नयेत रिया.. ते बहुतेक वेळा चुकीचे ठरतात.”

रियाने त्याच्याकडे पाहिलं पण काही न बोलता ती फक्त हसली.

संहिता तिची खरेदी आटपून तिथे आली. अनुरागचं शेवटचं वाक्य तिच्या कानांवर पडलं. पुन्हा तिचं मन धावत मागे अनिकेत पाशी जाऊन पोचलं. त्याला तसंच ओढत आणून मग तिने कॅमेरा बाहेर काढला. तिघांनी ढीगभर फोटोज क्लिक केले..

तिन्हिसांजा झाल्यावर हातात शहाळी आणि मनात कितीतरी नव्या गोष्टी घेऊन तिघेही मुक्कामी परतले..

.. उद्याचा नवा दिवस तिघांचीही वाट पाहत होता.

आता तो प्रवास त्या दोघींचा राहिलेला नव्हता, तिघांचा झाला होता!

“मग, उद्याचा काय विचार आहे?”

बेडवर आडवं होत रियाने संहिताला विचारलं.

“’उद्या’?.. उद्याचा विचार करत बसलो तर ‘आज’ हातातून निसटून जातो..”

खुर्चीवर मागे रेलत छताकडे पाहत संहिता म्हणाली.

रियाने मान वाकडी करून तिच्याकडे पाहिलं. आणि जिवणी मुडपत म्हणाली,

“कोणत्या थोर व्यक्तिचं वाक्य आहे हे?”

सरळ होत संहिता म्हणाली,

“संत अनुराग..!!”

यावर दोघी खळखळून हसल्या.

“उद्याचा विचार वगैरे काही नाहीये फारसा.. पण, अनुराग म्हणत होता coracle ride खास असते इथली.” संहिता बेडवर बसत म्हणाली.

“हा अनुराग आपला पिच्छा सोडणारच नाहीये का?” रियाने डोक्याला हात लावला.

“हाहा.. चांगलाय गं तसा तो बिचारा..”

“अरे हो.. पण मला awkward होतं. मनावर ओझं असल्यासारखं वाटायला लागतं. नाही म्हणण्याचं गिल्ट येत राहतं तो दिसला की.”

“ओके ईफ यू आर नॉट comfortable देन..”

“नाही अगदी तसंही नाही..” हळू आवाजात रिया पुटपुटली आणि झोपण्यासाठी म्हणून विरुद्ध कुशीवर वळली. आणि शेवटी थोडीफार चुळबुळ करून म्हणाली,

“ओके फाइन, पण त्याला सांग coracle राइड झाल्यावर आपल्याला अनेगुडीला जायचंय. जवळच आहे. उद्याचा मुक्काम तिथेच.” आणि तिने lights ऑफ केले.

संहिता हलकेच गालात हसली.

उन्हाळ्याचे दिवस असल्याने आणि सूर्योदय गाठायचा असल्याने तिघेही पहाटेच ठरलेल्या ठिकाणी भेटले आणि सूर्योदयाच्या आत त्यांनी सनापूर तलाव गाठला. पहाटची मोहक हवा त्यांची मनं प्रसन्न करून गेली. रस्ताही सुरेख होता. तलाव जसजसा जवळ येत गेला तसतसे वाटेतल्या दगडांचे आकार भव्य होत गेले. प्रत्यक्ष तलाव पाहिल्यावर तर दोघींचे डोळे दीपले. डोळ्यांत मावणार नाहीत इतक्या अजस्त्र दगडांनी वेढलेला तो

तलाव पहाटच्या आंबुस प्रकाशात दैवी वाटत होता. अनुरागच्या आधीच्या ओळखी असल्याने त्याने इतक्या सकाळी एक coracle पण अरेंज केली. एका मोठ्या पाषाणआला टेकून उभी असलेली ती डोंगी उर्फ गोल बोट पाहून दोघी excite झाल्या. थोडीशी भीतीही त्यांना वाटली. आधीचा अनुभव नसल्याने ती वजन पेलू शकेल का किंवा बुडणार तर नाही ना असे प्रश्नही त्यांच्या मनाला स्पर्शून गेले. पण मग अनुराग आणि तो डोंगीवाला दादा त्यांच्या चेहऱ्यांकडे पाहून हसायला लागल्यावर भीत-बिचकत एकमेकांचे हात धरत त्यांनी त्या coracle मध्ये पाय ठेवले. पण, त्यांची कुठलीच भीती खरी न ठरता काही क्षणातच दोघी त्या सुरेख बोटीत स्थिरावल्या. नावाड्याने वल्हवत बोटीला तलावात पुढे पुढे न्यायला सुरुवात केली.

Coracle मध्ये बसण्याचं ते फीलिंग, हाताच्या अंतरावर असलेलं गार निळसर-हिरवं पाणी आणि बाजूला उभ्या पाषाण टेकड्या.. एकावर एक रचलेले भव्य पण गुळगुळीत दगड. फोटो काढावेत, की ते दृश्य डोळ्यात साठवावं की मनात कोरावं संहिताला काही कळेना. ती विस्मईत होऊन चहूकडे पहात होती फक्त. बऱ्याचवेळा इथे येऊन गेल्यामुळे हा अनुभव अनुराग साठी आता नवीन नव्हता. पण तरी त्या दोघींसोबत त्याचं मनही आनंद आणि औत्सुक्याने भरून गेलं होतं.

“शतकानुशतके इथले लोक या बोटी नदी पार करण्यासाठी वापरतात. इथे यांना डोंगी म्हणतात” अनुराग म्हणाला.

थोडसं वाकून हात बाहेर काढून ओंजळीत पाणी घेत रिया म्हणाली,

“500 वर्षांपूर्वी, Domingos Paesa नावच्या एका पोर्तुगीज प्रवाशाने हम्पीला भेट दिली होती. त्याने लिहिलय, इथले लोक तुंगभद्रा नदी पार करण्यासाठी गोल, बास्केट सारख्या दिसणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण बोटींचा वापर करायचे. ज्या की आतून वेताच्या बनलेल्या असतात आणि बाहेरून लेदरच्या. त्या इतक्या मजबूत असतात की त्यातून बऱ्याचवेळा घोडे किंवा बैलही वाहिले जायचे.”

अनुराग रियाकडे पहात राहिला. त्याच्याकडे पहात आणि रियाकडे इशारा करत संहिता म्हणाली,

“हिस्टरी ऑप्शनल..”

दोघे ओळखीचं हसले. त्यांच्या कडे पहात रिया म्हणाली, “.. आणि पुस्तकी किडा सुद्धा..”

यावर तिघे हसू लागले.

इतक्यात अनुरागने रियाचं लक्ष टेकडीच्या पलीकडे वेधलं.. सुवर्णाची आभा घेऊन केशरात न्हालेला आदित्य दगडांच्या मागून वर येत होता. ते टोकावरचे गुळगुळीत दगडही क्षणभरसाठी केशरी होऊन गेले. संपूर्ण तलावाला त्या सोनेरी किरणांचा अभिषेक घडला. निळसर हिरवं पाणी केशरी भासायला लागलं. प्रत्येक किरणातून शेकडो भासमान सूर्य पाण्यावर चमकू लागले. तो विलक्षण अरुणोदय तिघांच्या मनांवर कायमचा कोरला गेला. पुढे पुढे सरकणाऱ्या बोटीतून मनाला एका वेगळ्याच बेटावर नेणारी ती सैर तिघेही चाखू लागले. बरचंसं पुढे आल्यावर समोर दगडातून पाझरणारे धबधबे पाहून तर त्यांची मने लहान मुलांप्रमाणे बागडू लागली. नावाड्याने नाव त्यातल्या एका धबधब्याखाली नेल्यावर तर ते शुभ्र तुषार अंगावर घेताना त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही.

नाव पुढे जात राहिली. ती मोहक सकाळ, तो शांत, अद्भूत निसर्ग.. तिघेही त्या शांततेत हरवून गेले. संहिताच्या ओठी तिच्याही नकळत wordsworth च्या ओळी उमटल्या..

*marvel how Nature could ever find space*

*For so many strange contrasts in one human face:*

*There's thought and no thought,*

*and there's paleness and bloom*
*And bustle and sluggishness, pleasure and gloom.*

तिची आवडीची, पाठ असलेली ती कविता आज त्या वातावरणात नकळत तिच्यातून बाहेर पडत होती. अर्थ लागत होता का? माहीत नाही. कदाचित हो कदाचित नाही. पण काहीतरी अॅबस्ट्रॅक्ट पण तितकंच स्पष्ट असं काहीतरी त्यातून तिघांनाही प्रतीत होत होतं हे मात्र नक्की.

*There's indifference, alike when he fails or succeeds,*
*And attention full ten times as much as there needs;*
*Pride where there's no envy, there's so much of joy;*
*And mildness, and spirit both forward and coy.*

*This picture from nature may seem to depart,*
*Yet the Man would at once run away with your heart;*
*And I for five centuries right gladly would be*
*Such an odd such a kind happy creature as he…*

"one.. two.. three.. jump right away!!"

अनुरागचं कौंटिंग ऐकत संहिता ने मोठा श्वास घेऊन त्या उंचावरच्या मोठ्या दगडावरून पाण्यात उडी मारली. पाण्याचा मोठा आवाज झाला. क्षणभराने खोल पाण्यातून वर येत तिने वरुन पाहणाऱ्या अनुरागला आणि रियाला थम्ब्स अप केलं आणि त्या विशाल जलाशयात पोहू लागली.

अनुरागने वळून रियाकडे पाहिलं. ती अर्धवट रागावलेल्या, अर्धवट भीतीने भरलेल्या नजरेने त्याच्याकडे पाहत होती. खरंतर, Coracle मधून उतरल्यावर जेव्हा अनुरागने ही cliff jumpingची कल्पना सांगितली तेव्हापासून रिया त्याला विरोधच करत होती. पोहायला जरी येत असलं तरी तिला उंचीची प्रचंड भीती वाटते हे तिने शक्य त्या सर्व प्रकारे सांगून पाहिलं. पण, त्याच्या आणि संहिताच्या उत्साहापुढे तिचा निभाव लागेना. तशीच चरफडत ती त्यांच्यासोबत इथे आली होती. मनात प्रचंड भीती, उंचवरचा तो अवाढव्य पाषाण, खाली चमकनारं निळंशार पाणी.. रिया थरथरत होती.

अनुराग तिच्या जवळ आला,

“कसली भीती वाटतेय तुला?”

“उंचीची.. अर्थात!”

तिच्या शेजारी बसत तो म्हणाला,

"हम्म.. मला पहिल्या भेटीतच कळलं होतं, तू भित्री आहेस."

"एक्सक्यूज मी.." रियाचा चेहरा अजून लाल झाला.

"हो. कधी कधी प्रवाहा सोबत स्वत:ला वाहू द्यायलाही गट्स असावे लागतात. दरवेळी 'मी म्हणतेय तसं', 'मला हवं तसं', 'माझ्या पद्धतीने' वगैरे हट्ट चालत नसतात. ते हट्ट चालवण म्हणजे यश नसतं. कधी कधी स्वत:ला बाजूला ठेवत, पुर्णपणे बाजूला ठेवत, या आयुष्य नावाच्या गोष्टीत स्वत:ला झोकून देता यायला हवं. नाही, वाटतंय तितकं सोपं नाही ते. रिस्क आहे. Uncertainty आहे. पुढचा क्षण कसा असेल याची खात्री नसणं आहे.. पण ते स्वीकारता यायला हवं. आपण जशी कल्पना केलीये तेच आणि तसंच आपल्या सोबत घडेल असं अजिबात नसतं. तसा हट्ट करणं हा शुद्ध बालिशपणा आहे. आणि मला तेच तेवढच हवय म्हणत आयुष्य जगायचच थांबवण हा मूर्खपणा. आणि त्यापायी प्रवाहात उडी मारायला नाही म्हणणं हा शुद्ध भित्रेपणा आहे. तू भित्री आहेस!"

त्याच्या त्या रोखठोक बोलण्याने खजील होत रिया शब्द गोळा करत म्हणाली,

"मी तुझ्याशी लग्नाला नाही म्हणतेय याचा तू असा अर्थ लावतोयस तर?"

त्यावर किंचित हसत तो म्हणाला,

“नाही. तू लग्नाला नाही म्हणतेयस, माझ्याशी लग्नाला नाही म्हणतेयस म्हणून अजिबात नाही. तू ‘जगायलाच’ नाही म्हणतेयस म्हणून मी तुला भित्री म्हणतोय. तुझ्या आयुष्याचं एक चित्र तू मनात तयार केलं आहेस. आणि त्यातल्या प्रत्येक मायनर डिटेलसह ते तुला प्रत्यक्षात यायलाच हवंय. तसं नाही झालं तर काय? या विचारानेही तुझा थरकाप उडतो. तू प्रचंड घाबरतेस. माय डियर, जे जसं समोर येईल ते तसं स्वीकारण्याची हिम्मत ठेव.”

त्याचं बोलणं ऐकून रिया आतून हलली. आपली दुखरी नस कोणीतरी गचकन धरावी असं तिला झालं. तिला पुन्हा तो फायनल इंटरव्ह्युचा दिवस आठवला. लेखी परीक्षेत ती पास झालेली असली तरी पोस्टची खात्री वाटावी इतके तिला पेपर बरे गेले नव्हते. आणि त्यामुळे अर्थातच मुलाखतीवर पोस्ट मिळणार की नाही हे ठरणार होतं. त्या गोष्टीचं आलेलं टेंशन तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं. सिलेक्ट नाही झाले तर काय ही भीती प्रत्येक उत्तरातून ठळक दिसत होती. सगळं येत असून, लाखो विद्यार्थ्यांमधून मुलाखती पर्यन्त पोचून, सगळ्या प्रकारची तयारी करून देखील इंटरव्ह्यु पॅनल समोर तिची झालेली अवस्था ती विसरू शकत नव्हती. आणि त्यामुळेच, केवळ त्यामुळेच तिची

पोस्ट हुकली हे आत कुठेतरी ती जाणून होती. अनुरागच्या बोलण्याने त्याला दुजोरा मिळाला फक्त.

"मी तुला फोर्स करणार नाही. तुझं तू ठरव." असं म्हणून काहीवेळाने अनुराग उठला आणि त्याने पाण्यात उडी मारली.

रिया भानावर आली.

एका वेगळ्याच तंद्रीत, कसलाच विचार न करता त्याच्या मागे तिनेही उडी मारली. वाऱ्यावर स्वत:ला पाण्याच्या दिशेने तिने झोकून दिलं. त्या क्षणी तिचं शरीर तिला कमालीचं हलक वाटलं. क्षणात पाण्याचा मोठा आवाज झाला. त्या निळ्याशार पाण्यात ती खोल गेली आणि मग वर आली.. डोळ्यावरचं पाणी तिने बाजूला केलं. समोर अनुराग होता. त्याने हसून तिच्याकडे पाहिलं. भीतीच्या पलीकडे यश असतं म्हणतात. ती भीती सर केल्याचा विलक्षण आनंद तिच्या चेहऱ्यावर होता. नजरेनेच त्याचे आभार मानून ती फिरली आणि पाण्याच्या प्रवाहासोबत मनसोक्त पोहायला लागली.

अनेगुडीला पोचून दुपारचं जेवण होईपर्यंत आपण पुढे कुठे जातोय हे संहिता आणि अनुराग दोघांनाही माहीत नव्हतं.

सनापूरहून अनेगुडीला पोचेपर्यंत आणि जेवण करतानाही त्यांच्या, कॉर्पोरेट कल्चर अँड इट्स चेंजिंग असपेक्ट्स या विषयावर सेमिनार चालुये की काय असं वाटण्या इतपत कमालीच्या गहन चर्चा रंगल्या होत्या. रिया सगळं एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देत जेवणावर ताव मारत होती. मध्येच नावाला त्यांच्या हो मध्ये हो मिसळत होती. त्या दोघांना त्यांच्या चर्चेमध्ये सोडून बिल भरायला काऊंटरवर गेल्यावर तिने हॉटेल मालकाकडे ओणके किंडी विषयी चौकशी केली. पण त्यांना काही माहीत नाहीसं दिसलं. या गावाजवळ एक प्रागऐतिहासिक ठिकाण आहे आणि त्याची गावातल्या कोणाला कल्पनाही नसावी याचं तिला प्रचंड आश्चर्य वाटलं. तिने मग बाहेर येऊन जराशी चौकशी केली. शेवटी एक हम्पीमधला रिक्षावाला सापडला ज्याला या ठिकाणाविषयी माहिती होती. त्याने पूर्वी कधीतरी एका विदेशी दांपत्याला तिथे नेलं होतं म्हणे. मग तो रिक्षावाला पुढे आणि या तिघांची गाडी मागे अशी त्यांची स्वारी ओणके किंडी मधली जवळपास पाच हजार वर्षांहून जुनी असलेली रॉक पेंटिंग्स पाहण्यासाठी निघाली. एव्हाना सूर्य खूपसा पश्चिमेकडे कलला होता.

“आपण कुठे जातोय नक्की, कळेल का?” समोरच्या रिक्षाच्या मागे आपली गाडी हाकणाऱ्या रियाकडे पाहून संहिताने विचारलं.

“कळेलच तुम्हाला काही मिंटात..” शेजारी बसलेल्या तिच्याकडे एक नजर टाकत रिया उत्तरली.

“ओह.. सर्प्राइज अँड ऑल..” मागे बसलेला अनुराग म्हणाला.

रियाने मान वळवून डोळे बारीक करून त्याच्याकडे पाहिलं.

तिच्याकडे गमतीशीरपणे पाहत तो पुढे म्हणाला,

“एक मिनिट, मला होकार देण्यासाठी एखादी रोमॅंटिक जागा वगैरे निवडली आहेस की काय?”

संहिताने जोरात हसून अनुरागला टाळी दिली. रियाने चिडून दोघांकडे पाहिलं आणि मग अनुरागला म्हणाली,

“वेरी फनी. अनुराग सी, तू कितीही लेक्चर दे, फिलॉसफी झाड, मला ओळखायला लागल्याचा आव आण.. मी लग्न करणार नाहीये!”

“ऊप्स.. दिल के टुकडे हुये हजार.. नाही ॲक्चुअल्ली तुटून तुटून मातीच झालीये आता पार..”

“शट अप..” तिने हसत त्याच्याकडे पाहिलं.

सोनेरी शेतांमधून वाट काढत रिक्शा पुढे जात होती. एका ठिकाणी थोडसं वळून एका छोट्या लोखंडी गेट समोर ती थांबली. रिक्षावाल्याने इकडे-तिकडे पाहिलं आणि मग तो चालत थोडं पुढे गेला. पाच एक मिनिटांनी सोबत एक मध्यमवयीन शेतकरी सदृश इसमाला घेऊन परतला. हे तिघे तोवर गाडीतून उतरले होते. त्या व्यक्तीशी बोलल्यावर त्यांना समजलं की, त्या छोट्या गेटच्या पलिकडची जागा म्हणजेच ओणके किंडी. आणि ती चक्क एक खाजगी मालमत्ता आहे. आणि तो इसम मुंबईत राहणाऱ्या त्या जागेच्या मालकाने नेमलेला माणूस आहे. रिक्षावाल्याला आणि त्या इसमाला त्यांचे ठरलेले पैसे दिल्यावर रिक्षावाला परत गेला आणि त्या रखवालदाराने गेटचं कुलूप उघडून तिघांना आत सोडलं.

आत वाढलेलं गवत, बरीचशी मोकळी जागा आणि थोड्याशा अंतरावर उजवीकडे मोठमोठाले एकावर एक बसलेले दगड दिसत होते.

“कुठे आलोय आपण?” संहिताने पुन्हा विचारलं.

“ही एक प्रेहिस्टोरीक जागा आहे. ज्ञात अंदाजा नुसार जवळपास 5 हजार वर्षांहून जुनी रॉक पेंटिंग्स आहेत इथे. Oldest of art form!”

संहिता आणि अनुरागने बऱ्याचशा कुतुहलाने रियाकडे पाहिलं.

त्या रखवालदाराच्या मागे तिघेही cave paintings च्या दिशेने चालू लागले.

“प्रेहिस्टोरीक प्लेस.. वेल हे मजेशीर आहे.” रियाकडे पाहत अनुराग म्हणाला.

“मजेशीर? काय..” रिया.

“हेच इथे काहीतरी सापडलं म्हणून या जागेला प्रेहिस्टोरीक म्हणायचं. पण, मला वाटतं आपण फिरतोय ती प्रत्येक जागा, आणि इतरही अजून ठिकाणं, आपला देश, पृथ्वीचा बराचसा भाग हे सगळंच प्रेहिस्टोरीक आहे. त्या प्रत्येकाला इतिहास आहे. काहींचा आपल्याला महितीय तर काहींचा नाही इतकाच काय तो फरक.”

अनुरागच्या बोलण्याने रिया विचारात पडली. खरंच आहे की हे. ऑल्मोस्ट एव्री प्लेस इज मोर ऑर लेस प्रेहिस्टोरीक.

मोठ्या मोठ्या दगडांची ती विक्षिप्त छोटीशी ठेंगणी टेकडी चढताना तिघांची बऱ्यापैकी दमछाक झाली. एका भल्यामोठ्या दगडाखाली त्या दगडाच्या कॉन्वेक्स आकारामुळे तयार झालेल्या गुहेसमोर तिघे पोचले. आणि समोरच्या दगडावरच्या त्या लाल रंगात रंगवलेल्या आकृत्या पाहून स्तिमीत झाले. हजारो वर्षांपूर्वीच्या मानवी अस्तित्वाच्या त्या खूणा पाहताना नाही म्हटलं तरी त्यांची मनं थरारली. वेगवेगळ्या प्राण्यांचे आकार, कधी त्यांच्या मागे तर कधी त्यांच्या पुढे असणाऱ्या मानवी आकृत्या.. चौकोनी चौकटीत उभे दोन मानवी देह.. एक ना अनेक चित्रं. मोरासारखे वाटणारे पक्षी.. त्यांची पिसं हातात घेतलेले लोक.. आपण कल्पनाही करू शकत नाही इतक्या प्राचीन काळी, कोणीतरी इथे ही चित्रं चितारुन ठेवली आहेत. काय हेतु असतील त्यामागचे? माहितीचं संकलन, भोवतालाचं वर्णन की व्यक्त होण्याची उत्कट आकांक्षा? त्या आदिम कलाकारांना पुसटशी तरी कल्पना असेल का की आपल्या या कलाकृती हजारो वर्षं जगणार आहेत, उन्ह, वारा, पावसात टिकणार आहेत. कोणत्या तरी काळी त्या पहायला वाट विचारत त्या काळातले लोक इथे येऊन पोचणार आहेत.. रियाच्या मनात विचारांच्या शृंखला सुरू होत्या. प्रत्येक चित्रावरून हात फिरवून ती पाहत होती. जवळून निरखत होती. इतिहासविषयी फारशी ओढ न वाटणाऱ्या संहिताच्या मनाला

देखील ती चित्रं स्पर्शून गेली. अनुराग एका मागून एक फोटोज क्लिक करत होता. इतक्या वेळा हम्पीला येऊन देखील त्याला या ठिकाणा विषयी काहीही माहीत नव्हतं.



बराच वेळ त्या परिसरात फिरून त्यांनी तिथली जवळपास सगळी चित्रं पाहिली. एका गुहेत तर फणा काढलेला नाग चितारला होता. गुहेच्या तोंडावर त्याचा फणा आणि आत जाणाऱ्या कॉनकेव दगडावर शेपूट. त्या ठेवणीमुळे चित्र त्रिमितीय वाटत होतं. तिघेही अवाक झाले.

पण खरं अद्भूत चित्र वेगळंच होतं.

“ओह माय गॉड..” ते दिसल्यावर रिया म्हणाली. आणि मागे असलेल्या त्या दोघांना तिने ते पहायला बोलावलं.

गुहेच्या आतल्या भिंतीवर मगासारखी प्राण्यांची, माणसांची चित्रं होती. आणि त्यांच्या अगदी वर गुहेच्या छतावर आतल्या बाजूने एक गोलाकार आकृती होती. ही पेंटिंग्स पहायला येण्यामागे खरं कारण या विशिष्ट चित्रा विषयी रियाला वाटलेलं कुतूहल होतं. जेव्हापासून तिने त्याविषयी वाचलं होतं तेव्हापासून त्याला पाहण्याचं तिच्या मनात होतं. आणि ती ते आज प्रत्यक्षात पाहत होती. ‘एलियन यूएफओ’, ‘मर्तिक विधी’ आणि अजून काय काय निष्कर्ष त्या चित्रा विषयी काढले गेले होते. पण ठाम मता पर्यन्त कोणीच पोचू शकलं नव्हतं. एखाद्या सॅटलाइट किंवा अंतरीक्ष याना सारखी दिसणारी ती आकृती आश्चर्य वाटायला लावणारी होती. तिघेही पुन्हा पुन्हा त्या चित्राकडे पाहत होते. आणि अचंबित होत होते. इतिहास ही खरच किती अनाकलनीय गोष्ट आहे याची जाणीव त्यांना होत असावी. ते खरंच यान असेल का किंवा अजून काही? यान असेल तर कुठून आलं असेल? कोणी तयार केलं

असेल? इथल्या आदिम लोकांना ते कसं दिसलं असेल? एक न अनेक प्रश्न..



मनात प्रचंड विस्मय घेऊन तिघेही जवळच्या एक दगडावर बसले. सूर्य क्षितिजाकडे झुकला होता. संध्याकाळची वेळ. आणि ते अद्भूत ठिकाण. काही न बोलता तिघेही बराच वेळ तिथे बसून राहिले..

मावळत्या सूर्याकडे पाहत एका मोठ्या दगडावर तिघे बसले होते. एक स्वप्नाने पछाडलेली, एक स्वत:च्या एकटेपणाचा अर्थ शोधणारी, आणि त्यादोघींच्या मध्ये येणाऱ्या क्षणाला हसत सामोरा जाणारा तो. रियाच्या स्वप्नांनी भरलेल्या, जराशा गोंधळलेल्या डोळ्यात स्वत:साठी जागा शोधणारा. ध्यानीमनी नसताना या वळणावर येऊन ठेपलेले तिघे. काही प्रवास माणसाला स्वत:शी कनेक्ट व्हायला मदत करतात. तसं काहीतरी. संहिताला आता तिची सम सापडायला लागली होती. अनुराग ती रियाच्या डोळ्यांत शोधत होता. आणि रिया? तिच्या मनात पराकोटीचं द्वंद्व चालू होतं. तिनेच तयार केलेल्या प्रश्नांशी ती स्वत:च झगडत होती. शेजारी बसलेला अनुराग आणि त्याचं असणं तिला हवहवसं वाटायला लागलं होतं. पण ते मान्य करणं जड जात होतं. अगदी स्वत:पाशी सुद्धा. काही कुंपणं आपणच आपल्या भोवती बांधून घेतो त्यापैकी काहीतरी.

काही वेळाने ती शांतता भंगत रियाच्या फोनची रिंग वाजायला लागली. नंबर अनोळखी होता. तिने फोन रीसीव केला.

“हॅलो..” थोडासा ओळखीचा वाटणारा पुरुषी आवाज.

“हॅलो, कोण बोलतय?” रिया.

“हाय रिया, मी अनिकेत.. संहिताचा मित्र..”

रिया गोंधळली, तिने संहिता कडे पाहिलं. ती सूर्यास्त निरखत दुसऱ्या टोकाला बसली होती.

“ओह हाय.. बोल नं..”

“मला संहिताशी बोलायचं होतं, तिचा फोन लागत नाहीये म्हणून तुला लावला.”

रियाची ट्यूब पेटली. संहिताचा फोन मागच्या 3-4 दिवसांपासून बंद होता.

“ओह ओके.. मी देते तिला फोन. एक मिनिट हा..”

रिया उठून संहिता पाशी आली आणि खुणेनेच अनिकेतचा कॉल असल्याचा सांगितलं. संहिता गोंधळली. तिने तसाच फोन कानाला लावला.

रिया अनुराग जवळ येऊन बसली. अनुरागने काय झालं म्हणून विचारलं. रियाने खांदे उडवले.

“हॅलो..” संहिता.

“अगं कुठेयस तू?? फोन बंद का आहे आणि? कालपासून ट्राय करतोय मी. फ्लॅटला पण कुलूप आहे. तिथेही जाऊन आलो. ठिके ना सगळं?”

अनिकेतने एकदम प्रश्नांचा भडिमार केला. संहिता अजून गोंधळली.

“मी ठीक आहे. तू का फोन लावत होतास पण?”

“आधी आहेस कुठे ते सांग.” अनिकेत.

“हो सांगते पण झालंय काय..”

“काय झालय? तुझ्या दोन बॉस सकट स्टाफ पैकी बऱ्याच जणांचे कॉल्स येतायत मला दोन दिवसांपासून. काही न सांगता तू तीन दिवसांपासून गायब आहेस असं कळलं. त्यांनी कॉनटॅक्ट करण्याचे खूप प्रयत्न केले पण झाला नाही. आपल्याविषयी माहीत होतं सगळ्यांना. सो मला काही महितीय का म्हणून विचारत होते सगळे. आणि मग हे सगळं ऐकून..”

“काय.. हे सगळं ऐकून काय?” संहिता.

“..मलाही काळजी वाटायला लागली तुझी. फोन बंद. घरी जाऊन आलो. ते पण बंद. शेजाऱ्यांना काही माहीत नाही. शेवटी जुन्या सिम मधून रियाचा नंबर शोधून काढला.”

त्याचं बोलणं ऐकून संहिताला आतून खूप छान वाटायला लागलं. ती काय मिस करत होती ते लगेच तिला जाणवलं.

“काळजी वाटते तुला अजून..” लटक्या उपरोधाने ती म्हणाली.

“काळजी? छे. अजिबात नाही. तुझे ऑफिस वाले पैसे देतायत तुला शोधण्याचे. म्हणून शोधतोय.” थोडा आणखी चिडून अनिकेत म्हणाला.

“हाहा.. मला एवढा भाव मिळतोय? सिरियसली?” ती मोठयाने हसली.

“कुठे आहेस आणि काय झालय सांगशील आता?” अनिकेत.

“हम्पी. हम्पी मध्ये आहे.”

“हम्पी? तिथे काय करतेयस?”

“पळून आलोय मी आणि रिया..”

“पळून?”

“हाहा हो... इट्स अ लॉन्ग स्टोरी..”

“ओह.. काळजी करण्यासारखं नाहीये ना काही?”

“नाही.”

“आणि ऑफिसचं काय? चिडलेयत सगळे. जॉब सोडायचा विचार आहे?”

“हो.. resignation बरोबर घेऊनचं जाणार आहे त्या वर्माची भेट घ्यायला.”

“हम्म.. तू अशक्य आहेस. अजिबात बदलली नाहीयेस.”

“अशक्य मी आहेच. पण बहुतेक बदलायला लागलेय आता.”

“?”

“कळेल तुला आल्यावर..” मावळणाऱ्या केशरी सूर्याकडे पाहून संहिता म्हणाली, “भेटशील ना?”

अनिकेत जरासा शांत झाला. आणि मग म्हणाला,

“ये लवकर”

संहिताने फोन ठेवला. तिच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद होता.

ती फोन घेऊन रियापाशी आली. संहिताचा चेहरा पाहून रियाला अंदाज आला. अनुराग मात्र गोंधळला होता. पण तो गप्प राहिला.

“ऑल ओके?” रियाने विचारलं.

“येस.. मोर दॅन ओके.” ती छान हसत उत्तरली. रिया मग समजून शांत राहिली.

“आपण पळून आलो ना सो ऑफिस मधले लोक चौकशी करत होते..” संहिता पुढे म्हणाली.

“तुम्ही पळून आलाय?” अनुराग आश्चर्य वाटून म्हणाला.

यावर रिया आणि संहिता दोघी एकमेकींकडे बघून हसल्या. आणि घडला प्रकार त्याला समजाऊन सांगता सांगता तिघांचा परतीचा प्रवास सुरू झाला.

आता गाडी अनुराग चालवत होता. रिया त्याच्या बाजूला आणि संहिता धावणारा रस्ता पाहत मागे बसली होती.

त्या दोघींचं तडकाफडकी निघून येणं, प्रवास, त्याआधीचा घटनाक्रम सारं रियाकडून ऐकताना अनुराग अजून अजून तिच्याकडे ओढला जात होता. नंतर नंतर तर तिचं बोलणं त्याला फारसं ऐकुच येईना. इतका तो तिच्या किती सांगू आणि किती बोलू म्हणणाऱ्या डोळयांमध्ये गुंतून गेला.

काहीवेळाने ती जराशी शांत झाल्यावर तो म्हणाला,

“अनेगुडीला नको, हम्पीलाच मुक्काम करू आपण. उद्या दुपारची फ्लाइट आहे माझी हुबळीहून.”

“तू जातोयस?”

नाराजीच्या सुरात रिया पटकन बोलून गेली. आणि मग ते लक्षात आल्यावर एकदम शांत झाली.

अनुराग हलकेच हसला आणि म्हणाला,

“हो. वीकएंड संपला ना. जावं लागेल. मला नाही सोडायचाय माझा जॉब.”

“ओह हम्म..” हसण्याचा प्रयत्न करत रिया म्हणाली.

त्यानंतर तिघे शांतच राहिले. हम्पी येईपर्यंत.

अनुरागच्या हॉटेल समोर त्याने गाडी थांबवली. रिया आणि तो खाली उतरले. रिया उगाच रेंगाळली.. तिच्याकडे पाहत अनुरागच म्हणाला,

“सो, इट्स ए बाय देन?”

रियाची आतल्या आत प्रचंड घालमेल सुरू झाली.

पण काही न सुचून ती त्याची नजर टाळून, “येस..” असं काहीतरी म्हणाली.

अनुराग जरासा घुटमळला. पण मग काही न म्हणता तो वळला आणि आत निघून गेला. हातातून काहीतरी सुटत

असल्यासारखं रियाला वाटायला लागलं. पण काही न बोलता ती सरळ ड्रायविंग सीटवर जाऊन बसली आणि तिने गाडी स्टार्ट केली.

संहिता तिच्याकडे पाहत होती. न राहवून ती म्हणाली,

“ही इज अ नाइस गाय रिया..”

पण ते ऐकून न ऐकल्यासारखं करत रिया गाडी चालवत राहिली. नेहमीपेक्षा जास्त वेगाने.

दोघी हॉटेलवर परतल्या. भूक तशी नव्हतीच फारशी. फ्रेश होऊन संहिताने डायरी उघडली. आणि रिया छताकडे पाहत बेडवर आडवी झाली. बराचवेळ या कुशीवरून त्या कुशीवर करत राहिली. पण तिला झोप येईना. आणि डोक्यातले विचारही सरेनात. इतक्यात तिचा फोन वाजला. तिने वळून पाहिलं. ‘text message from Anurag’ स्क्रीनवर नोटिफिकेशन पॉप अप होत होतं.

तिने क्षणार्धात फोन unlock केला आणि मेसेज उघडला.

“6 AM sharp at kodandrama temple ghat, HAMPI”

ती क्षणभरासाठी प्रचंड रोमांचित झाली. मग गालातल्या गालात हसली. आणि मग सकाळ होण्याची वाट पाहत कुशीवर वळली.

....

काही माणसांचा नुसता आवाज ऐकला तरी बरं वाटायला लागतं. अनिकेत त्यातलाच. किती दिवसांनी आज बोलले त्याच्याशी. खूप हलकं वाटतंय.

आज पुन्हा नव्याने विचार करावासा वाटतोय सगळ्याचा. सुरुवात अर्थात जॉब स्विच करण्यापासून. Resume अपडेट केला पाहिजे. ठरवलंय आता, एखाद्याचं कॅरक्टरवर येणं जीव गेला तरी सहन करायचं नाही कधी.

*World is full of some detestable people, who, by their scabrous behaviour, make it an impossible place for women to live in.. and I as a woman must now learn how to deal with it.*

संहिता,

हम्पी.

.....

रियाला आज अलार्मची गरज भासली नाही. कोणी न उठवता ती अगदी वेळेवर उठली. फ्रेश झाली. आणि गाढ झोपलेल्या संहितासाठी चिठ्ठी लिहून मंदिराच्या दिशेने निघाली.

सकाळी सहा-सव्वा सहाच्या सुमारास कोदंडराम मंदिराच्या घाटावर वाहणारी तुंगभद्रा पाहत अनुराग उभा होता. एक-दोन पुजाऱ्यांचा पायरव सोडला तर वातावरण अगदी शांत होतं. हम्पी हळू-हळू जागं होऊ लागलं होतं. पाठमोऱ्या उभ्या अनुरागला रियाने दुरूनच ओळखलं. हळूच त्याच्याशेजारी जाऊन ती उभी राहिली. दोघांनी एकमेकांकडे पाहिलं. एक आल्हाददायक स्मित दोघांच्या गाली उमटलं. काही न बोलता कोपऱ्यावर त्याच्या इशाऱ्याची वाट पाहत उभ्या डोंगीवाल्याला त्याने हात केला. तो लागलीच त्याची डोंगी वल्हवत हे दोघे उभे होते तिथे आला. ते पाहून रिया आतून खूप आनंदली. पण काही बोलली नाही.

अनुराग डोंगीत उतरला. मागे वळून त्याने रियाला हात दिला. तिने क्षणभर त्याच्याकडे पाहिलं. आणि मग काही न बोलता त्याचा हात धरून तीही डोंगीत उतरली. दोघे खाली बसले. डोंगीवाल्याने नाव वल्हवायला सुरुवात केली आणि ते नदीवर तरंगू लागले.

क्षणातच रियाला काल आणि आजच्या सफरीमधला फरक जाणवला. कालचा अनुभव कितीही सुरेख असला तरी बोलून चालून शेवटी तो तलावच. साठलेला किंवा खरंतर साठवलेला. पण आज? आज ही वाहणारी जीवंत नदी होती.. प्राचीन, पुरातन तुंगभद्रा! त्यात सकाळची नीरव शांतता. दैवी वाटावं असं दृश्य आणि वातावरण.. सूर्योदयाच्या अगदी आधीची वेळ, अस्फुट पण आशेने पुरेपूर भरलेल्या पुसट होत जाणाऱ्या अंधाराने व्यापलेली. घाटासोबत मागे पडत चाललेलं मंदिर, नदीच्या कुशीत शिरणारी त्यांची सुरेख नाव, काठाला असलेले अजस्त्र दगड, मधूनच दिसणारी मंदिरं.. सगळं इतकं इतकं सुंदर वाटत होतं रिया स्वत:ला विसरून गेली. तिच्या चेहऱ्यावरचा ओसंडून वाहणारा आनंद आणि समाधान अनुराग टिपत होता.

काहीवेळाच्या शांततेनंतर अनुराग नदीच्या प्रवाहाकडे पाहत बोलू लागला..

"मला आठवतय त्यादिवशी मी ऑफिस मध्ये होतो. चार-पाच महिन्यांपूर्वीची गोष्ट आहे. प्रेझेंटेशनची तयारी चालू होती. इतक्यात मला बाबांचा फोन आला. 'एक स्थळ आहे. मंडळी ओळखीची आहेत. तुला मुलीचा फोटो आणि डिटेल्स पाठवलेयत. पाहून घे. आणि कळव.' मी फोन ठेवला. त्याक्षणी खरंतर तो मला माझ्या कामात व्यत्यय वाटला होता. पण फोन कट केला आणि वरचं नोटिफिकेशन दिसलं. 'baba has sent an image'. पाहूया तरी म्हणून मी तो ओपन केला. आणि खरं सांगतो, त्या फोटोकडे पाहतच राहिलो. नाही. तो सुंदर होता वगैरे म्हणून नाही. आजकाल सगळ्याच मुलींचे फोटो सुंदर दिसतात. पण, तो फोटो क्लिक झाला होता आत कुठेतरी. नंतर प्रेझेंटेशन झालं.. कामं सुरुच होती.. पण डोक्यात तो फोटो ठाण मांडून बसलेला. वेळ मिळाल्यावर, डिटेल्स वाचले. 'रिया सामंत. सो अँड सो अँड सो qualifications.. ऊंची.. गोत्र.. etc.' मग रीतसर तुझी प्रोफाइल पाहिली, वाचली. का माहित नाही, तू वेगळी वाटलीस."

रिया त्याचं बोलणं ऐकत होती.. तो पुढे बोलू लागला..

"तुला खरं सांगू, मुलगी अशी हवी, तशी हवी, करियरीस्टिक हवी, घर सांभाळणारी हवी, असे असे इंटेरेस्ट्स हवेत असं माझं

सुरुवाती पासूनच काही नव्हतं. मुलगी पाहिल्याबरोबर क्लिक व्हायला हवी बास. तारा जुळल्या सारख्या वाटल्या पाहिजेत. मग बाकीच्या गोष्टी काय जुळतात आपोआप किंवा जुळवून घेण्याची अनिवार इच्छाशक्ति तरी होते. तुझा फोटो पाहिल्यावर तसं वाटलं होतं. पुढे मग मी इंट्रेस्ट कळवला पण तुझ्या घरून असं समजलं की तू एक्झॅम झाल्यावर ठरवणारेस. सो मग, माझ्या घरच्यांनी दुसरी स्थळं पहायला सुरुवात केली. एक-दोघींना मी भेटलो देखील. पण, तू काही मनातून हलत नव्हतीस. तेव्हाच ठरवलं होतं, एकदा भेटायचच. त्यात मग काही दिवसांपूर्वी तुझ्याघरून निरोप आणि तुझा नंबर मिळाला..”

त्याने तिच्याकडे पाहिलं. ती जराशी हसली आणि तिने नजर नदीवर वळवली.

“त्या दिवशी फोनवर तू फिरकी घेतेयस हे कळलं होतं मला. पण राग येण्याऐवजी कुतूहलच जास्त वाटलं. तुझ्या घरी फोन करून कन्फर्म केलं, तू नक्की हम्पी मध्येच आहेस की नाही ते. आणि मग सरळ निघून आलो.. काय होईल, तू कशी react होशील, काही कल्पना नव्हती. पण तू नॉर्मल react झालीस. आणि मग तुझं लग्न न करण्या मागचं कारण समजल्यावर दोन गोष्टी घडल्या. एक, तुझी तुझ्या स्वप्नांप्रती असलेली निष्ठा दिसली.

आवडली. आणि दोन, तुझ्या भिरभिर डोळयांमधली भिती, आणि प्रामाणिकपणाही जाणवला. फोटो पाहून तुझ्याविषयी जे वाटलं होतं तेच भेटल्यावरही वाटलं. आणि मागच्या दोन दिवसात ते प्रकर्षाने वाटतच राहिलं. तुला माझ्याविषयी नक्की काय वाटतं ते माहीत नाही. तुझ्या वागण्यातून तू त्याचा फारसा अंदाज येऊही देत नाहीस..

मी आज इथे तुला बोलावलं, हे सगळं तुझ्याशी बोलतोय ते केवळ या सगळ्या गोष्टी मनात ठेऊन मला निरोप घ्यायचा नव्हता. मग मी पूर्ण प्रयत्न केले नाहीत असं मला वाटत राहिलं असतं..''

त्याने त्याची नजर आता तिच्यावरून नदीवर वळवली. आणि तिने नदीवरून त्याच्यावर.. तो सगळं खूप मनापासून बोलतोय हे तिला जाणवत होतं. त्याच्या त्या शांत, संयत बोलण्या-वागण्याने तिच्या मनातले सारे संभ्रम आता हळूहळू गळून पडू लागले होते.

नावाड्याने नाव एका विशाळ दगडाखाली नेली. त्या मोठ्या दगडाचा अर्धा भाग काठावरच्या दगडांत रूतलेला आणि अर्धा पाण्यावर आला होता. अधांतरी. पाणी आणि दगडामध्ये पुरुष-दीड पुरुष अंतर. खाली पाणी, वर भलामोठा दगड अशी ती जागा. रियाला अतिशय गार वाटलं.

बाहेर येता येता ती बोलायला लागली,

“अनुराग.. मला हे असं तुझ्या सारखं छान छान बोलायला जमत नाही. पण, इतकंच म्हणेन की, मलाही आवडायला लागलंय तुझ्या सोबत असणं..”

आणि कालच्या संभाषणाचा धागा जोडत, त्याच्या डोळयांत पाहत म्हणाली,

“..आणि आणखी एक उडी मारुन पहायलाही आवडेल मला..”

त्याने चमकून तिच्याकडे पाहिलं. त्याला समजलं ती कोणत्या उडी विषयी बोलतेय ते. हा त्याच्यासाठी सुखद धक्का होता..

“खरंच?” तो आनंदातिशयाने म्हणाला.

तिने गोड हसत मान हलवली.

"हो, स्वीकारायचं ठरवलंय, जे वाटतंय ते. स्वप्नं तर आहेतच. पण, त्यांच्या मागे धावताना सोबत कोणीतरी आहे हे फीलिंग छान आहे खूप.. I would love to feel it.. and to let myself fall in love too.."

त्याने खोलवर तिच्या डोळयांत पाहिलं. यावेळी तिथे त्याला भीती दिसली नाही. compassion दिसलं. आत्मविश्वास दिसला.

एवढ्यात दगडांआडून सूर्य हलकेच वर आला. सारी तुंगभद्रा केशरात न्हाऊन निघाली. आणि मग तिच्याकडे पाहणाऱ्या अनुरागचं लक्ष रियाने उगवत्या मोहक सूर्याकडे वळवलं..

“This trip was best of all..”

घाटावर परतताना अनुराग म्हणाला.

“हम्म.. ” रियाने हसून सहमती दर्शवली.

बोलत बोलत दोघे गाडीपाशी येऊन पोचले.

“so.. मग कधी परतताय तुम्ही दोघी?” अनुराग ने विचारलं.

“बघू आमचं ठरलं नाहीये अजून. एक-दोन दिवसात मे बी..” रिया म्हणाली.

“हम्पी टु पुणे.. लॉन्ग डिस्टन्स इट इज..”

“हो.. पण मजा येते अशा रोड ट्रिप्स मध्ये.. ट्रॅवल इज द बेस्ट थेरपी. स्वानुभवातून पटलंय मला आता हे.” रिया उत्साहाने म्हणाली.

“येस.. इंडीड इट इज..” तिच्याकडे पाहत तो म्हणाला.

“ऐक नं..” रिया जराशी घुटमळली.

“बोल नं.” अनुराग.

“आपण हे सगळं घरी सांगण्याची घाई नको करायला.. असं मला वाटतंय.”

तिच्याकडे पाहत जरासा विचार करून अनुराग म्हणाला,

“ते लगेच एंगेजमेंट आणि लग्नाच्या मागे लागतील म्हणून?”

तिच्या मनातलं त्याने बरोबर ओळखलं होतं. रियाने हसून त्याच्याकडे पाहिलं.

“हो.. म्हणजे मला असं वाटतंय की we should know each other more.. आणि दोन-एक महिन्यात माझी नेक्स्ट prelims exam पण आहे. I need to focus on that now..”

“yes yes.. off course.. Take your time.” अनुराग शांतपणे म्हणाला.

रियाने हसून त्याच्याकडे पाहिलं.

आणि मग ती पुण्यात परतल्यावर भेटायचं ठरवून दोघांनी एकमेकांचा निरोप घेतला.

वाऱ्यावर अल्लद तरंगणारं हलकं हलकं मन घेऊन रिया हॉटेलवर परतली.

तिला पाहताच संहिता मिष्किलपणे मोठ-मोठयाने गुणगुणू लागली.

“..आजकल पांव जमींपर नही पडते मेरे.. बोलो देखा है कभी तुमने मुझे उडते हुये..?..”

रिया त्यावर हसत, जाऊन बेडवर आडवी पडली.

“काय काय झालं? सगळं सांग मला.. विथ एव्री डीटेल..” संहिता प्रचंड उत्सुकतेने म्हणाली.

तिच्याकडे पाहत हाताची उशी करून रिया म्हणाली,

“हम्म.. सांगते. पण आधी तू सांग. तुझ्या आणि अनिकेत मध्ये काय सीन चालूये नक्की. काल त्याचा फोन येऊन गेल्यापासून पाहतेय, नुसती गुलाबी गुलाबी दिसतेयस.”

त्यावर गालातल्या गालात हसत संहिता खाली बसली.

“काय सांगू रिया.. सगळी उत्तरं अगदी तिथेच होती बघ. मी उगाच स्वत:च क्रिएट केलेल्या अंधारात चाचपडत होते. मला माझ्या प्रॉब्लेम्सच्या पलिकडचं काही दिसत नव्हतं. त्या सगळ्या पासून थोडं दूर आल्यावर, त्रयस्थपणे साऱ्याकडे पाहिल्यावर सगळं लख्ख दिसायला लागलंय आता.”

पुन्हा आडवी होत रिया बोलायला लागली,

“exactly यार.. आपण उगाच अवघड करून ठेवतो सगळ्या गोष्टी. आपल्या समजूतींचं क्लाऊड तयार करून जगतो आपण आपल्याभोवती. तेच तेवढंच खरंय असं वाटायला लागतं काही काळाने. आपलं जग संकुचित आणि दिशा रुंद व्हायला लागतात. आणि मग त्या आपल्या बबल च्या पलिकडचं अनंत शक्यतांनी भरलेलं अवकाश दिसेनासं होत जातं.. दिशा संपल्या सारख्या, क्षितिज हरवल्या सारखं वाटायला लागतं.

पण, मुळात तसं नसतंच काही. गरज असते ती केवळ आपण आपल्या कोशातून बाहेर येण्याची.. मग सगळं लख्ख होत जातं. क्षितिज विस्तारतं. दिगंत खुणावतो..”

“हम्म.. खरं आहे.” संहिताने होकार भरला. आणि मग पुन्हा रियाकडे पाहत म्हणाली,

“बाय द वे.. संत अनुराग चे मौलिक विचार आहेत का हे?”

“हाहा.. नाही. संत अनुरागचा मौलिक ‘इफेक्ट’ आहे हा..” डोळे मिचकावत रिया उत्तरली.

“म्हणजे तू? म्हणजे तुम्ही..??” संहिता excite झाली.

तिच्याकडे पाहत रियाने मान हलवली आणि म्हणाली,

“हो.. now you are free to tell this ‘Hampi story’ to our future kids..”

“what? खरंच?.. I told you. I told you.. छुपी रुस्तूम आहेस तू. This is grand yar.. more than happy for you both..” संहिता आनंदाने म्हणाली.

“and I’m happy for you Samhita..” रिया संहिता कडे पाहत म्हणाली.

दोघींनी मग एकमेकांच्या डोळ्यांतला तो नव्याने गवसलेला अनोखा आनंद हिप्पी आयलंडवर स्कूटीची सफर करून celebrate केला. दोघी भरपूर भटकल्या.. रस्ता चुकल्या.. थकल्या.. हरवल्या.. निसर्गाच्या कुशीत जाऊन स्वत:चीच पुन्हा नव्याने गळाभेट घेऊन परतल्या..

दोघींना आता ‘घर’ बोलावत होतं. मनाला हवी ती विश्रांती मिळाली होती. ताजेतवाने उन्मेष मनात घेऊन, आयुष्याला भिडण्यासाठी दोघी आता उत्सुक होत्या.

ठरल्याप्रमाणे मग दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी हम्पीचा भरल्या मनाने निरोप घेतला आणि परतीचा प्रवास सुरू केला.. नवे अनुभव आणि विस्तारलेलं क्षितिज सोबत घेऊन खुणावणाऱ्या दिगंताच्या दिशेने..

विराम

@संजीवनी देशपांडे

*(कथा पुर्णपणे काल्पनिक असून कथेतील ठिकाणं मात्र खरी आहेत.*

*मी हम्पी प्रत्यक्षात पाहिलेलं नाही. सगळी वर्णने गोळा केलेल्या माहितीवर विसंबलेली आहेत. त्यामुळे, मला शक्य तितकी अचूकता राखण्याचा मी प्रयत्न केलेला असला तरी काही तपशील मागे-पुढे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. )*

## पुस्तक म्हणजे मैफल

फ़ेसबुक, whatsapp, किंवा अनेक नवीन माध्यमांत वाचन होतंच. फ़ेसबुक चं नावच मुळी ’बुक’ आहे. मधेच एखादी लकेर, नंतर कुठे विनोद, अचानक कोणी तरी आक्रस्ताळं राजकीय भाष्य करणार आणि ते संपतं न संपतं तो एखाद्या मृत्यूची बातमी वा लग्नाचा वाढदिवस. या माध्यमांतूनही ज्ञान, भावना, यांचा खेळ चालतो; नाही असं नाही. पण तो क्षणिक असतो. ओझरता असतो. एखादी सुंदर लकेर मन मोहून टाकते खरेच. पण मैफलीचा गंध जसा दिर्घकाळ दरवळत रहातो तसे होत नाही.

आपल्या मनाला, आपल्या बुद्धीला वरच्या दर्जावर नेण्यासाठी पुस्तके आवश्यक असतात. मग ती छापील असो वा ई. आपले मन आणि बुद्धी यांना दर्जेदार खुराक द्या. पुस्तके वाचत रहा. ई साहित्य ईपुस्तके विनामूल्य देते त्यामागे एक उद्देश आहे. एक मन, एक बुद्धी जेव्हा वरच्या पायरीवर जातं तेव्हा ती व्यक्ती वरच्या दर्जाला जाते. जेव्हा समाजातील असंख्य लोक वरच्या पायरीवर जातात तेव्हा समाजच प्रबुद्ध होतो.

वाचत रहा. पुस्तके वाचत रहा.

www.esahity.com